तर्कतीर्थ
आणि
अंतर्नाद
यांचा वेध घेणारा
अंक

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
३० मार्च २०२४
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ७२)

'समग्र तर्कतीर्थ' या
वाङ्मय प्रकल्पाचे संपादक
**सुनीलकुमार लवटे**
यांची मुलाखत

'अंतर्नाद' मासिकाचे
मालक, प्रकाशक, संपादक
**भानू काळे**
यांची मुलाखत




Unlock your
Digital Curiosity
with
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
नव्या
जनरेशनसाठी
नव्या
डिजिटल स्किल्स्
Robotics
3D Printer
Mobile App
Cyder Security
Virtual Reality
Coding
Big Data
Augmented Reality
Internet of Things
Artificial Intelligence
प्रवेशासाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा. www.mkcl.org

संस्थापक, संपादक : **साने गुरुजी**

Date of issue
**30 मार्च 2024**
वर्ष 76 / अंक - 32
**संपादक : विनोद शिरसाठ**
सहयोगी संपादक मंडळ :
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

व्यवस्थापक आणि अक्षररचना : सुरेश माने
मुखपृष्ठ मांडणी : गिरीश सहस्रबुद्धे
मुद्रितशोधन : आरती सुमित

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे. प्रिंटर्स प्रा. लि. 1416 सदाशिव पेठ, पुणे 411030 येथे छापून, साधना साप्ताहिक, 431 शनिवार पेठ, पुणे 411030. येथे प्रसिद्ध केले.
Ph. 020-24451724 /25 / Mob. 7028257757
weeklysadhana@gmail. com
www. weeklysadhana. in
साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)
Ph. No. : 020-24459635

**वार्षिक वर्गणी**
एक वर्षांसाठी : 1100 रुपये
दोन वर्षांसाठी : 2100 रुपये
तीन वर्षांसाठी : 3000 रुपये

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म.ऑ. /डी.डी./ चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा शेजारील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र. 60025586634, IFSCMAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे 2 येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला ई-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## अनुक्रम

**4. तर्कतीर्थ आणि अंतर्नाद यांच्यावरील अंक कशासाठी ?**
– संपादकीय

**7. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते तरी कोण ?**
**– सुनीलकुमार लवटे**
संवादक : विनोद शिरसाठ
शब्दांकन : प्राजक्ता धुमाळ

**19. समग्र तर्कतीर्थ वाङ्मय प्रकल्पात काय आहे ?**
**– सुनीलकुमार लवटे**
संवादक : विनोद शिरसाठ
शब्दांकन : प्राजक्ता धुमाळ

**37. 'अंतर्नाद ' सुरू करण्यापूर्वीचा मी**
**– भानू काळे**
संवादक : विनोद शिरसाठ
शब्दांकन : रेणुका कल्पना

**51. 'अंतर्नाद'चे संपादन करताना...**
**– भानू काळे**
संवादक : विनोद शिरसाठ
शब्दांकन : रेणुका कल्पना

**निवेदन :**

30 मार्चचा हा अंक अधिक पृष्ठसंख्येचा आहे. त्यामुळे यानंतरचा म्हणजे 6 एप्रिलचा अंक प्रकाशित होणार नाही. 13 एप्रिल पासून नियमितपणे अंक प्रसिद्ध होत राहतील.

संपादकीय

# तर्कतीर्थ आणि अंतर्नाद यांच्यावरील अंक कशासाठी?

विद्यमान भारतातील राजकीय-सामाजिक आघाडीवर कमालीची अस्वस्थता आहे. देश एकाधिकारशाहीकडे वाटचाल करीत आहे. समाजधुरीण हतबलतेची भावना अनुभवीत आहेत. अघोषित आणीबाणी हा शब्द मागील काही वर्षांत सर्रास वापरला गेल्यामुळे, त्याचा मूळ अर्थ गुळमुळीत झाला आहे, मात्र विद्यमान भारतातील केंद्रीय राजवट त्या मूळ अर्थाला वारंवार जागवीत आहे. मात्र राजकीय-सामाजिक आघाडीवर खूप अनागोंदी असते तेव्हा, ऊर्जासंचय करण्यासाठी, पुढील वाट शोधण्यासाठी मुळाशी जावे लागते. अर्थातच त्यासाठी साहित्य संस्कृतीकडे वळावे लागते, ज्ञानमार्गाचा शोध घ्यावा लागतो. त्याच प्रक्रियेचा भाग म्हणून तर्कतीर्थ आणि अंतर्नाद या विषयावर हा अंक जुळवून आणला आहे. प्रस्तुत अंकात दोनच व्यक्तींच्या दीर्घ मुलाखती आहेत, प्रत्येक मुलाखत दोन भागात घेतली आहे. मुळात ऑडिओ-व्हिडिओ स्वरूपात या मुलाखती घेतल्याने, त्या ऐवजाला वेगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र या दोन्ही व्हिडिओ मुलाखती घेण्याचे ठरत असतानाच, या दोन मुलाखतींचा ऐवज एकत्र करून साधनाचा एक संपूर्ण अंक काढता येईल असा अंदाज होता. तो अंदाज अपेक्षापेक्षा अधिक बरोबर ठरला.

सुनीलकुमार लवटे यांची ओळख किती विविध अंगी आहे, हे मुलाखतीच्या प्रास्ताविकात सांगितले आहे. पण त्यांनी मागील पाच वर्षांत पूर्णत्वास नेलेला समग्र लक्ष्मणशास्त्री जोशी हा वाङ्मय प्रकल्प अचंबित व्हावे असाच आहे. तर्कतीर्थांच्या विखुरलेल्या साहित्याचे संपादन करून, त्यांनी 18 खंड सादर केले आहेत. कमीत कमी तीनशे पाने आणि जास्तीत जास्त नऊशे पाने असे हे खंड आहेत. एकूण छापील पानांची संख्या दहा हजारांपेक्षा अधिक आहे. अकराशेपेक्षा अधिक युनिट्स (लेख, स्फुट लेख, मुलाखती, भाषणे, पत्रे, नोंदी इत्यादी) आहेत. मुळात हे सर्व विखुरलेले साहित्य मिळवणे, त्यांचे संकलन करणे, वर्गीकरण करणे, त्याला मागचे-पुढचे संदर्भ शोधणे व जोडणे, तळटीपा लिहिणे, आणखी उत्खनन करून अज्ञाताची व गूढाची उकल करणे, विवेचन विश्लेषण करून प्रस्तावना लिहिणे, लेखन व पुनर्लेखन करणे, आराखडे तयार करणे आणि ते विस्कटून पुन्हा जुळवणे आणि वैचारिक घुसळण करून संचित बाहेर काढणे इतकी सारी प्रक्रिया या प्रकल्पाच्या संपादनात होती. मग पुढचे काम टाईप करून घेणे, प्रुफे वाचून घेणे, पुन्हा पुन्हा वाचून दुरुस्त करणे, गरज पडेल तिथे पुनर्लेखन करणे. कमालीचं सर्जनशील व आनंददायी आणि तेवढेच कष्टाचे व थकवणारे हे काम असते. नवे काही सापडले, गूढ उकलले याचा आनंद आणि काही धागे जुळत नाहीत, कारणमीमांसा हाती लागत नाही; अशा जाणिवेने अपूर्णतेची व अस्वस्थतेची जाणीव दुसऱ्या बाजूला असा हा प्रकल्प. मागील पाच वर्षे ते हेच काम व याच प्रकारे करत आले आहेत. त्यांची कार्यक्षमता, तत्परता व योजकत्व तर त्यांना ओळखणाऱ्या अनेकांप्रमाणे आम्हालाही माहीत होतीच. परंतु या प्रकल्पात त्यांच्या सर्व क्षमतांचा कस कधी नव्हे इतका लागला असणार. कदाचित त्यांच्यासारख्या क्षमता नसणाऱ्या माणसाने हा प्रकल्प हाती घेतला असता तर मधूनच सोडला असता किंवा इतक्या भव्यदिव्य प्रकारे पूर्णत्वास गेला नसता. अशी अवाढव्य कामे आतापर्यंत पाच-दहा जणांच्या समित्यांनी केल्याची उदाहरणे आहेत. पण एकट्या व्यक्तीने असा व इतका मोठा प्रकल्प, इतक्या उत्तम प्रकारे व इतक्या कमी कालावधीत करण्याचे उदाहरण (बाबा भांड यांनी केलेला सयाजीराव गायकवाड एक अपवाद वगळता) गेल्या पाव शतकातील महाराष्ट्रात तरी नाही.

1901 ते 1994 असे 93 वर्षांचे आयुष्य वाट्याला आलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सार्वजनिक

कार्य सात दशकांचे होते आणि त्यांचा मृत्यू होऊन तीन दशके उलटली आहेत. 1923 मध्ये त्यांना तर्कतीर्थ पदवी मिळाली, आता आपण 2024 मध्ये आहोत. तर या संपूर्ण शतकाचा मागोवा घेण्यासाठी तर्कतीर्थांनी केलेले काम प्रथमच समग्रपणे उपलब्ध होत आहे. या 18 खंडांतून काय व किती भांडार आता उपलब्ध झाले आहे त्याची झलक, सुनीलकुमार लवटे यांच्या मुलाखतीच्या उत्तरार्धात वाचायला मिळते. आणि तर्कतीर्थ मुळात होते तरी कोण, या प्रश्नाचे उत्तर मुलाखतीचा पूर्वार्ध वाचल्यावर थोडेबहुत कळेल. तर्कतीर्थांना महाराष्ट्राने कायम आदराने वागवले, प्रकांडपंडित म्हणून ओळखले, ज्ञानसूर्य वगैरे संबोधले. मात्र ज्यांनी कोणी त्यांना पाहिले त्यांना ही मुलाखत वाचून आणि हे खंड नजरेखालून घातल्यावर तीव्रतेने जाणीव होईल ती हीच की, आपण तर्कतीर्थांना नीट समजून घेतले नाही आणि त्यांच्या सहवासाचा उपयोग पुरेसा करून घेतला नाही. अनेक अभ्यासकांना इतका जास्त व इतका महत्त्वाचा ऐवज आजपर्यंत अक्षरशः गाडलेला राहिल्याचे दुःख होईल. तर्कतीर्थांच्या बाबतीत महाराष्ट्र कृतघ्न राहिला का, असा प्रश्न या मुलाखतीमध्ये आम्ही सुनीलकुमार लवटे यांना विचारला. मात्र तसा आरोप महाराष्ट्रावर करायला ते तयार नाहीत. याचे कारण बहुदा, त्यांनी हा प्रकल्प पूर्णत्वास नेऊन महाराष्ट्राला तर्कतीर्थांच्या ऋणातून मुक्त केले हेच असावे.

या 18 खंडांचा उपयोग माध्यमांना, विद्यापीठांना, साहित्य क्षेत्रांतील धुरीण, सामाजिक क्षेत्रातील कर्त्या-करवित्यांना, संशोधन करणाऱ्या संस्थांना खूप मोठ्या प्रमाणात होऊ शकेल. अर्थातच त्यांनी त्यासाठी इच्छाशक्ती दाखवली पाहिजे. किंबहुना त्या घटकांचे लक्ष वेधण्यासाठीच ही अशी व इतकी दीर्घ मुलाखत प्रस्तुत अंकात सादर केली आहे. या खंडांचा अभ्यास केला तर अभ्यासक-संशोधकांना किती तरी वाटावळणे दिसतील, अनेक गुंते सुटतील, अंधारलेल्या वाटा उजळतील, नव्या दिशा खुणावतील. आणि म्हणून या कामासाठी संपूर्ण महाराष्ट्र सुनीलकुमार लवटे यांचा कायमचा ऋणी राहील. त्यांनी जन्माला येऊन आयुष्यात एवढे एक काम केले असते तरी त्यांना महाराष्ट्राच्या साहित्य संस्कृती वर्तुळाने मानाचे स्थान कायम दिले असते.

तर्कतीर्थ यांचा उल्लेख प्राचीन व आधुनिक यांच्या संगमावर उभा असलेला पूल किंवा दुवा हे वाक्यही अतिपरिचयामुळे मुळातला अर्थ गमावून बसले आहे. पण मूळ अर्थ लक्षात घेता अशा दुव्यांची गरज पूर्वी कधी नव्हे इतकी आज जास्त जाणवते आहे. बहुविद्याशाखीय किंवा आंतरविद्याशाखीय अभ्यासाची चर्चा पूर्वीपासून आतापर्यंत कायम होत आली आहे, आणि आताच्या नव्या शैक्षणिक धोरणाचा तर गाभा-घटक तोच सांगितला जात आहे. त्यामुळे ज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रातील लहानथोरांना तर्कतीर्थांचे समग्र वाङ्मय प्रकल्पातून काही ना काही वेचक-वेधक व रोचक मिळेल, त्यांच्या विचारांच्या कक्षा रुंदावतील, कल्पनांचे क्षितिज विस्तारेल. स्वतः सुनीलकुमार लवटे या प्रकल्पातून अधिक अंतर्मुख व अधिक नेमके झाले असावेत. ज्ञानसागराचा परिप्रेक्ष्य पाहायला मिळाल्यावर आणि पाच वर्षे त्यामध्ये बुड्या घेण्याची व डुंबण्याची संधी मिळाल्यामुळे आयुष्याचे सोने झाले अशी भावना त्यांच्या मनात येत असेल तर कोणालाही आश्चर्य वाटू नये.

अंकातील दुसरी मुलाखत म्हणजे भानू काळे यांची, तीही दोन भागांत घेतली आहे. 1995 नंतरचे पाव शतक त्यांनी 'अंतर्नाद' हे मासिक मोठ्या निष्ठेने चालवले. 'सांस्कृतिक समृद्धीसाठी' आणि 'चोखंदळ वाचकांसाठी' ही त्यांची घोषवाक्यं होती. त्यांनी हे काम किती नियोजनपूर्वक व प्रामाणिकपणाने आणि पारदर्शकता राखून व गुणवत्तेचा आग्रह धरून केले आहे, हे त्यांच्याशी या ना त्या नात्याने थोडाफार संबंध आलेल्या सर्वांनाच माहीत असते. मात्र या मुलाखतीमधून त्याचा नेमका अर्थ कळेल. अशी व इतकी विस्तृत मुलाखत त्यांची अंतर्नादच्या वाटचालीबद्दल प्रथमच झाली आहे, मात्र याहून अधिक सखोल व विस्ताराने त्यांनी ती वाटचाल "एका मासिकाचा उदयास्त" या पुस्तकात शब्दबद्ध केली आहे. याच आठवड्यात ते पुस्तक 'मौज' प्रकाशनाकडून आले आहे. ते पुस्तक लिहून त्यांनी अंतर्नादच्या वाटचालीला खऱ्या अर्थाने पूर्णत्व आणले आहे.

पाव शतकात प्रकाशित झालेल्या अंतर्नादच्या अंकांची संख्या 250 दरम्यान आहे, परंतु ते अंक आखीव रेखीव आहेत. साधेपणातील सौंदर्य म्हणजे अंतर्नाद असेच त्या अंकांबद्दल म्हणता येत असे. प्रामुख्याने ते वाङ्मयीन मासिक होते. त्यात शहरी जीवनाची प्रतिबिंबं जास्त दिसत होती. पण त्यांनी सांगितलेली अंतर्नाद सुरू करण्यापूर्वीची त्यांची वाटचाल बरीचशी रोचक आहे. त्यांच्या दोन्ही कादंबऱ्या राजकीय म्हणता येतील अशाच विषयांभोवती आहेत.


Date of Posting : 25-3-2024

त्यांनी ‘हिम्मत’ या इंग्रजी नियतकालिकात दशकभर काम केले. मात्र फारसे राजकीय विषय अंतर्नादने हाताळले नाहीत, याचे कारण (आणीबाणीच्या काळात त्यांचा झालेला भ्रमनिरास) या मुलाखतीतून पुढे आले आहे.

भानू काळे यांनी अंतर्नाद ही एक प्रकारची मोहीमच राबवली. प्रकाशक, मालक, संपादक या तिन्ही आघाड्या सांभाळल्या. त्यांनी अंतर्नाद पुढे चालवायला हवे होते, असे अनेकांना वाटत होते. त्यांनी स्वतः त्याला संस्थात्मक रूप द्यायला हवे होते, असे अनेकांनी बोलून दाखवले. काही लोक पुढे आले आणि अंतर्नाद पुढे चालू ठेवण्याची तयारी दाखवली होती. पण त्यांनी स्वतः ज्या पद्धतीने ते चालवले तसे अन्य कोणी दिसत नसल्याने, त्यांनी ते बंद करणे पसंत केले. यासंदर्भात त्यांच्यावर काही टीका होणेही स्वाभाविक होते. त्यांनी ते कोणाच्या तरी हाती सोपवले असते तर साहित्य संस्कृतीचे भले झाले असते, असे म्हणायला सोपे असते. मात्र ज्या सचोटीने व निष्ठेने त्यांनी एक स्वप्न पाहिलेले असते आणि वाढवलेले असते, त्याची वाताहात पाहणे हे कमालीचे क्लेशदायक असते.

नियतकालिके वाचतच ते लहानाचे मोठे होत गेले, घडत गेले; एवढेच नाही तर नियतकालिकांमधूनच गंभीर वैचारिक पुस्तके पुढे आली हे त्यांनी अधोरेखित केले आहे. त्यातून ते नियतकालिकांकडे इतरांपेक्षा अधिक गांभीर्याने पाहात होते हेच सूचित होते. शिवाय मासिकाची जी बलस्थाने त्यांनी ओळखली ती पाहता, त्यांच्या त्या भूमिकेचा सन्मान राखला पाहिजे. ‘डावीकडेही नाही आणि उजवीकडेही नाही, केवळ सरळ’ असा एक संपादकीय लेख त्यांनी लिहिला तेव्हा अनेकांनी त्याचे स्वागत केले होते, मात्र काहींनी त्यावर कठोर टीकाही केली होती; त्यांना गोलमाल संबोधले होते. धड ना इकडचे ना तिकडचे अशीही संभावना काहींनी केली. पण घरातून मिळालेला कम्युनिष्ठांचा वारसा, आणीबाणीच्या काळात केलेली पत्रकारिता आणि ऐन उमेदीच्या काळात लिहिलेल्या दोन कादंबऱ्या राजकीय विषयांवर, हे सर्व पाहता पक्षीय राजकारणाबाबत काहीशी तटस्थता किंवा अलिप्तता हे त्यांचे मानसही समजून घेतले पाहिजे.

मराठी साहित्य व्यवहारात पाव शतक हस्तक्षेप केल्यानंतर ते आता निवृत्त झाले आहेत. त्यांनी स्वतःच त्या 25 वर्षांतील सुरुवातीच्या 17 वर्षांना आनंदाची व उत्कर्षाची असे म्हटले आहे. 2013 नंतरची दहा-बारा वर्षे मात्र त्यांनी उताराची असे संबोधले आहे. 2013 हा टर्निंग पॉईंट ठरला असावा. तेव्हा मराठीतील चाळीस नियतकालिकांच्या संपादकांची एक दिवसभराची बैठक पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये भरली होती. त्या परिषदेनंतर त्यांचा मासिक चालवण्यातला रस संपला असे त्यांनी म्हटले आहे. त्या परिषदेला प्रस्तुत संपादकही (तेव्हा कार्यकारी संपादक) उपस्थित असल्याने त्या परिषदेचे संपूर्ण चित्र आजही नजरेसमोर आहे, भानू काळे यांच्याप्रमाणेच अनेकांची त्यावेळी निराशा झाली असावी. महाराष्ट्र आणि मराठीतील वाचक यांना अशा प्रकारची गंभीर वैचारिक नियतकालिके हवी आहेत का? असा प्रश्न सर्वांच्याच मनात आला असावा. त्या संपूर्ण दिवसभराच्या बैठकीनंतर मराठीतला साहित्य व्यवहार व नियतकालिकांचा व्यवहार कोरडवाहू शेतीसारखाच आहे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

आता ते निवृत्तीचे जिणे जगत आहेत, मात्र अंतर्नादमधून आलेल्या निवडक साहित्याचे दहा-बारा खंड तरी सहज होऊ शकतील. त्या खंडांचे संपादन करण्याचे काम त्यांनीच करायला हवे. शिवाय ते संपूर्ण 25 वर्षांचे अंक आताच्या काळात डिजिटलाईज करून वेबसाईटवर अपलोड करायला हवेत.

दोन्ही व्हिडिओ मुलाखती घेऊन झाल्यावर आणि त्यांचे शब्दांकन-संपादन करून या अंकात प्रसिद्ध करताना आम्हाला सोळा वर्षांपूर्वी गोविंदराव तळवलकर यांनी अमेरिकेतून भारतात परत आल्यावर (2007) दिलेल्या एका भाषणाची आठवण झाली. ती त्यांची शेवटची भेट ठरली. त्या भेटीमध्ये त्यांनी पुण्यातील भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत ‘दृष्टीआडची अमेरिका’ या विषयावर एक तासाचे भाषण दिले होते. (ते व्याख्यान शब्दांकन करून आम्ही साधनामध्ये प्रसिद्ध केले आहे.) त्या भाषणाचा समारोप करताना ते म्हणाले होते, ‘‘अमेरिकेचे खरे सामर्थ्य तिथल्या लष्करी ताकदीत नाही, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या बळामध्ये नाही, आर्थिक सत्तेमध्येही नाही; अमेरिकेचे खरे सामर्थ्य तिथल्या बौद्धिक वातावरणात आहे!’’ राजकीय-सामाजिक व्यवहाराचा परिचय असणारा कोणताही सुजाण माणूस, त्या विधानाशी असहमत होण्याची शक्यता नाही. आणि म्हणूनच सुनीलकुमार लवटे आणि भानू काळे यांनी महाराष्ट्रातील बौद्धिक वातावरणासाठी दिलेले योगदान, त्यांना कृतज्ञतेचा सलाम करावा असेच आहे!

◆◆

# तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्रीजोशी होते तरी कोण?

## सुनीलकुमार लवटे

संवादक : विनोद शिरसाठ / शब्दांकन : प्राजक्ता धुमाळ



सुनीलकुमार लवटे मागील 50 वर्षे सार्वजनिक जीवनात आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला किती आयाम आहेत, ही संख्या बरीच सांगता येईल. तरीही त्यातले सहा-सात आयाम मला महत्त्वाचे वाटतात. ते शिक्षक, प्राध्यापक होते, हा एक भाग. त्यांनी स्वतंत्र लेखन विपुल प्रमाणात केलंय. मोठ्या प्रमाणात अनुवाद केलेले आहेत. सामाजिक कार्यकर्ते तर ते आहेतच. बरीच ग्रंथ संपादनं त्यांच्या नावावर आहेत. त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने संग्रहालये (Museum) उभारली आहेत. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यांची ओळख

एक संयोजक म्हणून विशेष वाटते. ‘योजकत्व दुर्लभस्य’ असं एक संस्कृत सुभाषित सांगितलं जातं, ते मला प्रकर्षाने आठवतं. मी त्यांना मागची किमान 10-15 वर्षं जवळून ओळखत आहे. त्यांचं काम जवळून पाहत आहे.

अगदी अलीकडच्या दोन दशकभरातील महत्त्वाचं म्हणजे वि. सं. खांडेकर यांचं असंग्रहित आणि अप्रकाशित लेखन यांविषयीच्या संपादनाचा प्रकल्प. आणि दुसरं, डॉ. नरेंद्र दाभोलकरांची डझनभर पुस्तकं मराठीमधून हिंदीमध्ये अनुवादित करण्याच्या प्रकल्पाचं संपादन आणि संयोजन त्यांनी केलं आहे. त्यांचं एक विशेष महत्त्वाचं पुस्तक - आत्मकथन - ‘खाली जमीन वर आकाश.’ या कशाबद्दलही त्यांना प्रश्न विचारणार नाही. एका अतिशय महत्त्वाच्या प्रकल्पाचं संपादन मागची पाच वर्षे ते करत आले आहेत. ते म्हणजे ‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं समग्र वाङ्मय’. तब्बल 18 खंड, साडेदहा हजार पानं आणि अकरा हजारांपेक्षा अधिक युनिट्स असा हा एकूण प्रकल्प आहे. आजची मुलाखत याविषयी असणार आहे.

**प्रश्न :** लवटे सर आपण समग्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या प्रकल्पाकडे नंतर वळूच, परंतु लक्ष्मणशास्त्री जोशी यांना तुम्ही कधी पाहिलंत, कधी ऐकलंत? त्यांचा जो थोडा-फार सहवास तुम्हाला लाभला असेल, त्यातून तुमचं आकलन नेमकं कसं आकाराला आलं?

- तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांना माझ्या तरुणपणापासून ते त्यांच्या मृत्यूपर्यंत ऐकत, पाहत, वाचत आलेलो आहे. साधारणपणे मला समज आली 1970-71 ला. त्या काळात माझी वैचारिक घडण होत होती. राष्ट्र सेवा दल, साधना, आंतरभारती अशा विचार प्रवाहांत साने गुरुजी, वि.स. खांडेकर, एस.एम. जोशी, ना.ग. गोरे, यदुनाथ थत्ते या सर्वांना मी वाचत, ऐकत, मोठा झालो. मी पदवीधर झालो आणि शिक्षक झालो, पण तर्कतीर्थांना मी पहिल्यांदा ऐकलं ते प्राध्यापक झाल्यावरच. त्या काळात महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक जीवनाचा कोणताही मोठा समारंभ तर्कतीर्थांच्या उपस्थितीशिवाय आणि त्यांच्या व्याख्यानाशिवाय समृद्ध झाला असं महाराष्ट्राला वाटायचं नाही. त्यांना ऐकणं म्हणजे स्वतःला विस्तारित करणं, नव्या समजाकडे नेणं, नवी दृष्टी आणि विचार घेणं असं होतं. माझं वाचन त्या काळात कमी होतं. पण त्यांना ऐकताना आपण काहीतरी दिव्य-भव्य ऐकत आहोत असं वाटण्याचा माझ्या जीवनातला तो काळ होता.

लक्ष्मणशास्त्री जोशी हे ‘तर्कतीर्थ’ या एकाच नावाने महाराष्ट्रात ओळखले जायचे. खरं म्हणजे ती त्यांची पदवी होती, पण तीच त्यांची ओळख झाली होती. तर तर्कतीर्थ म्हटलं की, खरं तर त्या काळात भारतात आणि महाराष्ट्रात अनेक तर्कतीर्थ होते. पण तर्कतीर्थ म्हटलं की, एक सूत्रवाक्य यायचं ते म्हणजे, लक्ष्मणशास्त्री जोशी! हे सूत्रवाक्य त्यांनी भारताला आणि महाराष्ट्राला आपल्या विद्वत्प्रचुर लेखनाने, व्याख्यानांनी आणि प्रबोधनाने दिले अशी माझी धारणा आहे.

**प्रश्न :** अशा या तर्कतीर्थांचा जन्म 1901 मधील आणि मृत्यू आहे 1994 चा. 93 वर्षांचं आयुष्य त्यांना लाभलं. वयाच्या 23 व्या वर्षी त्यांना तर्कतीर्थ ही पदवी मिळाली. पुढची 70 वर्षे हा माणूस महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये अगदी ‘केंद्रभागी’ म्हणावा अशा स्वरूपात कार्यरत राहिला. त्यांची ओळख ‘प्राचीन आणि आधुनिक’ या दोन्हींच्या संगमावर उभा असलेला आणि प्राचीन व आधुनिक यांना जोडणारा दुवा अशी सातत्याने करून दिली जाते. आता हा सगळा प्रकल्प तुम्ही पूर्ण केलाय याबद्दल आपण बोलणारच आहोत. परंतु तुमच्या मनात या तर्कतीर्थांची आता या क्षणी काय प्रतिमा आहे?

- वर्तमानात आपण सगळे ज्या एका अरिष्टातून जात आहोत, त्याला आपण व्यापक अर्थाने सांस्कृतिक अरिष्ट (खरं म्हणजे ते धार्मिक अरिष्ट आहे.) म्हणू. असंच अरिष्ट गेल्या शतकामध्ये, विशेषतः टिळकांच्या मृत्यूनंतर गांधी पर्व सुरू झालं, त्या काळातदेखील या देशामध्ये होतं. तो काळ म्हणजे साधारणपणे 1923-25 ते 1950. भारत आणि महाराष्ट्र यांच्या जडणघडणीमध्ये ‘धर्म आणि समाज सुधारणांचा तो काळ’ होता. त्याची बैठक महात्मा फुले, आगरकर, टिळक इत्यादींनी त्या पूर्वीच्या शतकामध्ये सुरू केलेली होती. पण तर्कतीर्थ तेव्हा उदयोन्मुख होत होते, त्या काळामध्ये त्यांचं जे आकलन होतं ते अशा कोणत्याही पूर्वसुरींच्या प्रभावामुळे नव्हतं. वाचनातून जी उपजत

प्रज्ञा त्यांच्यामध्ये विकसित झाली, दृष्टी विकसित झाली; त्यातून ते पुरोगामी, विवेकवादी आणि बुद्धिवादी बनले.

त्यांचे गुरू नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती, वाईला प्राज्ञपाठशाळा नावाची संस्कृत पाठशाळा चालवायचे. ती त्या काळातली राष्ट्रवादी शिक्षण देणारी शाळा होती. विद्यार्थी हा देशाचं स्वातंत्र्य पेलणारा, देशाला स्वातंत्र्य देणारा असला पाहिजे, अशा धारणेने तिथे शिक्षण दिलं जायचं. उदाहरण म्हणजे वि. गो. विजापूरकर नावाचे कोल्हापूरचे गृहस्थ – तिथल्या राजाराम महाविद्यालयात प्राध्यापक होते. आगरकर, टिळक यांच्या प्रभावातून त्यांनी 'समर्थ विद्यालय' नावाची राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा कोल्हापूरला सुरू केली होती. त्यांना असं वाटायचं की, आपले विद्यार्थी या देशाला स्वातंत्र्य मिळवून देतील. तशा प्रकारची शिकवण ते द्यायचे. त्यांचं सगळं काम पाहून ब्रिटिशांना मिरच्या झोंबायच्या. म्हणून ब्रिटिशांनी कोल्हापूर संस्थानला कळवलं की, तुमच्या संस्थानात ही शाळा चालता कामा नये. मग त्यांनी कोल्हापूर संस्थानातील शाळेचा बाड-बिस्तारा गुंडाळला, ते मिरज संस्थानात आले. मिरज संस्थानाला पण ब्रिटिशांनी नामोहरम करून सोडलं. मग ते तळेगावला आले. तिथे त्यांच्यावर शस्त्र बाळगणे, षडयंत्र रचणे, अशी कलमं लावून ती शाळा बंद करण्यात आली. प्रा. विजापूरकरांच्या पुढे प्रश्न असा होता, की मी ज्या प्रकारचा ध्येयवाद शिक्षणातून निर्माण करू इच्छितो; ते शिक्षणच जर दिलं जाणार नसेल, तर ती शाळा चालवायची कशाला? म्हणून त्यांनी अशा प्रकारची शाळा असलेल्या 'प्राज्ञ' पाठशाळेमध्ये आपले सगळे विद्यार्थी आणि शिक्षक आणले. समर्थ विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी प्राज्ञ पाठशाळेत आल्यामुळे एक संस्कृत पाठशाळा 'राष्ट्रीय पाठशाळा' झाली. म्हणजे तर्कतीर्थांचा कायाकल्प कुणी केला, तर मी असं म्हणेन, समर्थ विद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी. मला तो रोमांचकारी काळ वाटतो.

एकीकडे गांधीवादाचा विकास होत होता, दुसरीकडे समाजवादाचा विकास होत होता. पहिलं महायुद्ध ते दुसरं महायुद्ध असा तो काळ महाराष्ट्राच्या जागृतीचा होता. सामाजिक जागृती असेल, धार्मिक जागृती असेल, सांस्कृतिक जागृती असेल, विवेकवादी जागृती असेल, अनेक आघाड्यांवर लोक काम करायचे. तर्कतीर्थांना त्या काळात असं वाटायचं की, 'धर्म परिवर्तन' हे 'समाज परिवर्तनाचं' साधन आहे. म्हणून ते आणि त्यांचे गुरुजी छोटे छोटे प्रयत्न करायचे. उदा. वाईतली 1923 ची घटना अशी आहे की, वाईत एक छोटी ब्राम्हण सभा होते. सभेपुढचा विषय हा की ज्ञातीत विवाह करावा का? म्हणजे काय तर कऱ्हाडे ब्राम्हणांनी चित्पावन ब्राम्हणांशी विवाह करावा का? हा त्या वेळचा ऐरणीवरचा प्रश्न. आज अशा प्रश्नांचं आपल्याला हसू येतं, पण तो काळ किती कर्मठ होता, याचं ते उदाहरण आहे. अशा सभांमध्ये तर्कतीर्थ आणि केवलानंद सरस्वती जायचे आणि सांगायचे की, 'अहो तुम्ही चित्पावन, कऱ्हाडे, देशस्थ, कोकणस्थ असे फरक काय घेऊन बसलात? सगळ्यांचं रक्त एकच आहे, सगळ्यांचा वर्ण एकच आहे, सगळ्यांची संस्कृती एकच आहे. तर मग मिश्र विवाह झाले म्हणून काय बिघडलं?'

तर्कतीर्थांनी असं लिहिलंय की, 'मी 1923 ते 1930 ही सात वर्षे अनेक ब्राम्हण सभांमध्ये गेलो.' सोनगीरला धुळ्याच्या जवळ, गुजरातच्या बॉर्डरवर

*आजही तुम्ही महाराष्ट्राला असं विचारलं की, तर्कतीर्थांनी काय लिहिलं? तर दोन पुस्तकांशिवाय तिसरं पुस्तक सांगता येत नाही. एक 'वैदिक संस्कृतीचा विकास', त्याला साहित्य अकादमीचा पहिला पुरस्कार मिळाला आहे आणि ते अनेक भाषांमध्ये – इंग्रजी, हिंदी आणि संस्कृतमध्ये भाषांतरित झालंय. दुसरं, 'हिंदुधर्माची समीक्षा.' ही दोन्ही पुस्तकं 'आधुनिकता आणि प्राचीनता' यांच्या समन्वयाचं काम करणारी आहेत. 'हिंदुधर्माची समीक्षा' या 1941 ला प्रकाशित झालेल्या पुस्तकात त्यांची 1940 ची भाषणे आहेत. तो त्यांचा मार्क्सवादी होण्याचा काळ होता. एक सनातनी संस्कृत पंडित मार्क्सवादी होतो. हीसुद्धा आश्चर्यकारक गोष्ट आहे.*

अशीच एक मोठी धर्मसभा झाली. या सभेला तर शंकराचार्य उपस्थित होते. त्या सभेत पण तर्कतीर्थांनी असं सांगितलं की, 'प्रायश्चित्ताचा विचार आपण अत्यंत उदारमतवादाने केला पाहिजे.' त्या काळामध्ये अनैतिक संबंधांतून जन्माला आलेली मुलं, ज्यांनी मिश्र विवाह केले अशांची अपत्ये ही पाप समजली जायची. पापातून मुक्ती मिळवण्यासाठी आई-वडिलांना तर प्रायश्चित्त घ्यावंच लागायचंच, पण त्या अपत्यांनाही पापी मानलं जायचं. तेव्हा तर्कतीर्थ असं म्हणायचे की, 'तुम्ही यांना धर्मामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करता, पण ते प्रयत्न म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर. तुम्ही सांगता ती प्रायश्चित्त परवडणारी नाहीत, तर तुम्ही उदारमतवादाने प्रायश्चित्तात सवलत का देत नाही?' तर त्या काळचा पुरोहित समाज प्रायश्चित्तात सवलत द्यायलाही तयार नव्हता. त्यामुळे 1930 च्या दरम्यान तर्कतीर्थांना असं वाटायला लागलं की, आपण ज्या सनातनी समाजवर्गाला जागं करू पाहतो, त्यांना शब्दप्रामाण्याशिवाय धर्म मंजूर नाही. मग त्यांनी असं ठरवलं की, आपण दगडावर डोकं आपटण्यापेक्षा आपला मार्ग बदलावा. आणि मग ते धर्म आणि समाज चळवळीकडून राष्ट्रीय चळवळीकडे आले.

**प्रश्न** : त्यांची प्रकांड पंडित म्हणून असलेली ओळख आणि त्यांनी केलेलं प्रचंड काम महाराष्ट्राला माहिती आहे. मात्र तरीही हा माणूस प्रकांड पंडित आहे म्हणजे नेमका कसा? आणि प्रचंड काम आहे म्हणजे नेमकं किती? याचा परिचय महाराष्ट्रातल्या भल्याभल्या लोकांना नव्हता आणि आजही नाही. अशा या तर्कतीर्थांचं समग्र वाङ्मय करण्याचा विचार तुमच्या मनामध्ये पहिल्यांदा कधी आला? तर असं दिसतं की, डिसेंबर 2018 मध्ये तुम्ही हा प्रस्ताव साहित्य संस्कृती मंडळाकडे दिला होता. त्याला मंजुरी मिळून ते काम तुमच्याकडे 2019 जानेवारीला आलं. 2019 ते 2023 ही पाच वर्षे तुम्ही त्यावर काम केलंत. तर 'समग्र तर्कतीर्थ' करण्याची गरज आहे असं तुम्हाला का वाटलं?

– 2018-19 च्या काळात एका निमित्ताने, लॉकडाऊनपूर्वी मी 'तर्कतीर्थ' वाचायला घेतला होता. त्याचं कारण असं होतं की, त्या काळामध्ये वर्तमान शासनाचा उदो-उदो होत होता. नवं येणारं सरकार सनातनी विचारांचंच असेल अशी चिन्हं दिसत होती. म्हणून '100 वर्षांपूर्वी अशा विचारांबद्दल समाज काय विचार करत होता?' असा प्रश्न मनात आला. मग या निमित्ताने 'तर्कतीर्थ' वाचायला घेतले. विशेषतः त्यांची दोन पुस्तकं. आजही तुम्ही महाराष्ट्राला असं विचारलं की, तर्कतीर्थांनी काय लिहिलं? तर दोन पुस्तकांशिवाय तिसरं पुस्तक सांगता येत नाही. एक 'वैदिक संस्कृतीचा विकास', त्याला साहित्य अकादमीचा पहिला पुरस्कार मिळाला आहे आणि ते अनेक भाषांमध्ये – इंग्रजी, हिंदी आणि संस्कृतमध्ये भाषांतरित झालंय. दुसरं, 'हिंदुधर्माची समीक्षा.' ही दोन्ही पुस्तकं 'आधुनिकता आणि प्राचीनता' यांच्या समन्वयाचं काम करणारी आहेत. 'हिंदुधर्माची समीक्षा' या 1941 ला प्रकाशित झालेल्या पुस्तकात त्यांची 1940 ची भाषणे आहेत. तो त्यांचा मार्क्सवादी होण्याचा काळ होता. एक सनातनी संस्कृत पंडित मार्क्सवादी होतो. हीसुद्धा आश्चर्यकारक गोष्ट आहे.

मघाशी मी ज्या राष्ट्रीय चळवळीचा उल्लेख केला, त्यात तर्कतीर्थांनी क्रांतिकारी काम केलं. संगमनेर, नगर या परिसरांमध्ये तरुण कार्यकर्त्यांची शिबिरं घेतली, त्यांना राष्ट्रीय चळवळ समजावून सांगितली. कळवण, बागलाण, नामपूर, मांगी-तुंगी हा धुळे-नाशिक जिल्ह्यातला परिसर आहे. त्या जिल्ह्यांमध्ये तर्कतीर्थांनी पन्नास हजार आदिवासींचा मोर्चा 'जंगल सत्याग्रह' म्हणून काढलेला आहे. त्या परिसरातील दीडशे पोलीस पाटलांचे राजीनामे लिहून घेऊन ते ब्रिटिशांना सादर केले. असा हा मनुष्य! त्यांनी बागलाणला बार्डोली पद्धतीचा सत्याग्रह केला. या अभ्यासाच्या निमित्ताने मी ब्रिटिश इंटेलिजंस रिपोर्ट वाचत होतो. त्यात असं लिहिलेलं आहे की, 'This can be treated as Mini Bardoli.' त्या रिपोर्टमध्ये तर्कतीर्थांचं वर्णन असं आहे, 'Renowned Sanskrit Scholar becoming revolutionary in India.' हा माणूस त्या काळामध्ये शस्त्र बाळगायचा, शस्त्र पुरवठा करायचा.

हे सगळं त्यांच्यात आलं कुठून? ते धुळ्याच्या तुरुंगात असताना द्वा. भ. कर्णिक यांच्याशी त्यांचा संपर्क आला. कर्णिक हे पुढे महाराष्ट्र टाइम्सचे संपादक झाले. तत्पूर्वी 'संग्राम' दैनिकांचे संपादक होते. स्वतंत्र महाराष्ट्राची वैचारिक घडण ज्या दैनिकाने

केली आणि महाराष्ट्र टाइम्सचा पाया ज्यांनी घातला असे ते संपादक. ते पूर्वीच्या त्या काळात दिल्लीमध्ये केसरीचे प्रतिनिधी म्हणूनही राहायचे. त्यांचा संपर्क कम्युनिझमशी आला. कम्युनिस्ट छोटी पत्रकं काढायचे आणि ती सर्वसामान्यांपर्यंत वितरित करायचे; अशी त्यांची पद्धत होती. कोणताही विचार जनसामान्यांपर्यंत पोहचत नाही, तोपर्यंत क्रांती होत नाही अशी त्यांची धारणा होती. ही पत्रकं चोरून धुळ्याच्या तुरुंगात यायची. द्वा.भ. कर्णिक ती आणायचे. त्यांचे बंधू वसंतराव कर्णिक (हे पुढे रॉयवादी झाले.) यांच्यामार्फत



राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांच्या हस्ते 'पद्मभूषण' स्वीकारताना (1976)

ही पत्रकं आली आणि ती तर्कतीर्थांनी वाचली. तेव्हा तर्कतीर्थांना साक्षात्कार झाल्यासारखे वाटले. त्यांनी एक लेख लिहिलेला आहे, 'मी रॉयवादी का झालो?' त्यात त्यांनी लिहिलंय, 'कोणताही नवा विचार मला प्रक्षुब्ध करतो.' मी मार्क्सवाद वाचला आणि प्रक्षुब्ध झालो. म्हणजे 'माझ्या जुन्या जाणिवा एकदम अणुविभाजनासारख्या भौमितिकरीत्या विभाजित झाल्या आणि मी नव्या विचाराकडे आकर्षित झालो.' सहा महिन्यांच्या तुरुंगवासामध्ये त्यांनी मार्क्सवाद वाचला, कम्युनिस्ट मॅनिफेस्टो वाचला, 'दास कॅपिटल' वाचला. तेव्हा त्यांची अशी धारणा झाली की, या देशात परिवर्तन केवळ गांधी मार्गाने होणार नाही; ते झालं तर शस्त्रानेच होऊ शकेल, ते झालं तर जनतेच्या समित्यांनीच होऊ शकेल. म्हणजे एकीकडे विनोबा धुळ्याच्या जेलमध्ये गीतेची प्रवचनं सांगायचे आणि साने गुरुजी ते लिहून काढत होते, त्याच काळात तर्कतीर्थ त्याच तुरुंगात लोकांना मार्क्सवाद समजावून सांगायचे.

साधारणपणे नोव्हेंबर 1932 ला जेलमधून सुटून बाहेर आल्यानंतर त्यांच्या असं लक्षात आलं की, हा विचार आपण पसरवला पाहिजे. त्या काळामध्ये कर्णिक बंधूंच्या माध्यमातून ते मानवेंद्र रॉय यांच्या संपर्कात आले. मानवेंद्र रॉय भारतात आले, त्यापूर्वी त्यांनी आठ कम्युनिस्ट देशांमध्ये क्रांती केलेली होती. त्यामध्ये मेक्सिको, रशिया, जर्मनी होते. 13 वर्षांचा तरुण क्रांतीसाठी भारतातून विदेशात पळून जातो; आंतरराष्ट्रीय मार्क्सवादाच्या संस्थापकांपैकी एक बनतो आणि भारतात वेश, नाव बदलून डॉ. महमूद बनून येतो. त्यावेळी भारतावर राष्ट्रीय काँग्रेसचा प्रभाव प्रचंड होता. त्यांनी काँग्रेसचं सदस्यत्व स्वीकारलं. साने गुरुजींनी यशस्वी केलं, त्या फैजपूर काँग्रेस अधिवेशनामध्ये (1937) रॉय यांचं अत्यंत प्रभावी भाषण झालं होतं.

भारतात समाजवादाचा उगम कुठे झाला हे तुम्ही शोधायला लागला, तर असं लक्षात येईल की भारतातील समाजवादाची ज्योत फैजपूर काँग्रेसमध्ये पेटली. त्याचं कारण, मानवेंद्र रॉय! त्यांनी काँग्रेसच्या त्या अधिवेशनात असं मांडलं, की 'केवळ अहिंसेने भारताला स्वराज्य मिळेल, याबद्दल मी साशंक आहे. जगातल्या ज्या ज्या देशांमध्ये क्रांती झाली, ती शस्त्रांनीच झालेली आहे. भारतामध्ये सत्तेचा पराभव होईल, तर तो शस्त्रांनीच होईल, शास्त्राने होणार नाही.' त्यावेळी नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण ही सगळी मंडळी रॉय यांच्या विचारांची होती. तेव्हा नेहरू, पटेल आणि गांधींनी रॉय यांना बोलावून असं सांगितलं की, 'आप में और हम में दृष्टिकोन का बुनियादी फरक है। काँग्रेस के मंच पर हम क्रांति की बात कभी नहीं करेंगे। हम परिवर्तन की ही बात करेंगे।' या सगळ्या समाजवादी मंडळींना हे लक्षात आल्यानंतर, त्यांनी काँग्रेसमधून फुटून समाजवादी पक्ष निर्माण केला, तसंच रॉय यांनी 'रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षा'ची स्थापना केली. या पक्षाची अशी धारणा होती की, जनतेच्या समित्या तयार झाल्या पाहिजेत, जनतेने उठाव करून क्रांती केली पाहिजे. हा काळ 1936-40 चा आहे.

तेव्हा रॉय यांना असं वाटायचं की, लोकसमित्या व्हायला पाहिजेत. 1975 दरम्यान जयप्रकाश नारायण समग्र क्रांतीमध्येही लोकसमित्यांबद्दल बोलायचे. आज आपण देशाकडे पाहतो, तेव्हा असं लक्षात येईल की, परत एकदा तिसऱ्यांदा लोकसमित्यांकडे गेल्याशिवाय परिवर्तन होणार नाही. या पार्श्वभूमीवर माझ्या मनात समग्र लक्ष्मणशास्त्री करण्याचा विचार आला.

**प्रश्न** : तुम्ही तर्कतीर्थांच्या ज्या दोन पुस्तकांचा सुरुवातीला उल्लेख केला, त्यामुळे प्रभावित होणं, देशाचं नवं सरकार - त्यातली एकूण परिस्थिती आणि त्याच पार्श्वभूमीवर तर्कतीर्थांच्या एकूण आयुष्याची वाटचाल, त्यांचं चरित्र, त्यांच्या आयुष्यातली इतकी नाट्यमय (dramatic) वळणं हे सगळं कुठंतरी तुमच्या मनामध्ये घोळत होतं. परिणामी या माणसाचं समग्र वाङ्मय आपण संपादित करावं असं वाटलं आणि तुम्ही हा प्रस्ताव 'साहित्य संस्कृती मंडळा'कडे दिला. त्यानंतर तुम्ही प्रत्यक्ष सुरुवात कशी केली? साधनं जमवण्यासाठी, लोकांशी संपर्क करण्यासाठी आणि हे संपादन आकाराला येण्यासाठीची प्रक्रिया काय होती?

- खरं म्हणजे हा प्रकल्प इतका मोठा होईल, अशी मला अजिबात कल्पना नव्हती. 'अंधारात गोळ्या मारणे', अशी म्हण आपल्याकडे आहे. खरं आहे ते. अंधारात गोळ्या मारल्याशिवाय संशोधन निर्माण होत नाही. हा प्रकल्प करायचा म्हणून मी प्राज्ञ पाठशाळेमध्ये गेलो, तेव्हा मला असं सांगण्यात आलं की, 'त्यांची ही दोन-तीन पुस्तकं आहेत आणि दोन-तीन छोट्या

संस्कृत पुस्तिका आहेत.' त्या त्यांनी मला दिल्या. ते वाचल्यानंतर शोध घ्यायला लागलो. 'अस्पृश्यता मीमांसा' नावाचा 17-18 पानांचा संस्कृत प्रबंध मिळाला. अकरावीला माझं संस्कृत असल्यामुळे मला संस्कृत कळतं. ते वाचल्यानंतर माझ्या लक्षात आलं, तर्कतीर्थांनी हे महात्मा गांधींसाठी लिहिलं. 1932 ला महात्मा गांधी तुरुंगात होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवडणुकीमध्ये स्वतंत्र मतदारसंघांचा आग्रह करत होते. महात्मा गांधी त्याविरोधात होते, 'राखीव मतदार संघ घ्या', असं म्हणत होते. त्यातून 'पुणे करार' निर्माण झाला, हा इतिहास सर्वांना माहीत आहे. लोक असं स्थूल मानाने म्हणतात की, पुणे करारात गांधी पराभूत झाले आणि आंबेडकर जिंकले. मी या दोन्ही नेत्यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करून तुम्हाला असं सांगेन की, हे दोन्हीही महान नेते एकमेकांमुळे अधिक प्रगल्भ झालेले आहेत.

थोडं विषयांतर होईल, पण 'गांधीजींचं उपोषण कसं सुटलं' याचं एक स्वतंत्र डॉक्युमेंटेशन व्हायला पाहिजे. '24 तासांत उपोषण सुटलं नाही, तर We will loose Gandhi' असे डॉक्टरांचे म्हणणे होते. गांधीजींना कोण सांगणार असा प्रश्न होता. त्या काळात भारतामध्ये एकच माणूस त्यांना हे सांगू शकत होता, ते होते 'रवींद्रनाथ टागोर'. लोकांनी त्यांना गळ घातली, 'तुम्ही महात्मा गांधींना समजवा.' त्यांनी गांधींना तार पाठवली. त्या तारेतून ते गांधींना सांगतात, 'तुम्ही अलीकडे ऊठसूट उपोषण करता. वारंवार उपोषण करून तुमच्यात नैतिक अहंकार आलेला आहे. हा बरा नव्हे. व्यक्ती देशापेक्षा मोठी नसते. देशाची भावना लक्षात घेऊन तुम्ही उपोषण सोडावं.' मग महात्मा गांधी उपोषण सोडायला तयार होतात. या उपोषणाने, त्या तारेने आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आग्रहाने गांधीजींचं हृदय परिवर्तन झालं. या उपोषणानंतर त्यांनी राजकीय संन्यास घेण्याचे ठरवले. त्यांनी 'जमनालाल बजाज' यांना सांगितलं की, 'तुमच्या वर्ध्याला असे गाव शोधा, ज्या गावाला जायला रस्ता नसेल, ज्या गावात वीज नसेल, ज्या गावात पाण्याचा नळ नसेल आणि त्या गावात सर्व वस्ती हरिजनांची असेल.'

'सेगाव' नावाचं गाव, ज्याला आज आपण 'सेवाग्राम' म्हणतो, ते गाव निवडून बजाज यांनी गांधींजींना कळवलं. गांधीजी म्हणाले, 'मी प्रत्यक्ष गाव पाहणार, मग ठरवणार.' गांधीजी वर्ध्याहून टांग्याने सेगावला येऊन खात्री करून घेतात आणि मीरा म्हणजे मिस स्लेडना शंभर रुपये देऊन म्हणतात, 'इथून पुढे आयुष्यभर आपण इथे राहायचं आहे. शंभर रुपयांत कुटी बांध.' आज ज्याला आपण 'बापूची कुटी' म्हणतो, ती त्या वेळची शंभर रुपयांतली झोपडी आहे. गांधीजींच्या अटी आहेत की, 'झोपडीचं बांधकाम साहित्य याच भागातलं असलं पाहिजे. मजूर इथलेच असले पाहिजेत आणि इतक्याच पैशांत ती झोपडी बांधली पाहिजे.' गांधीजींना समजून घ्यायचं म्हणून किती छोट्या छोट्या गोष्टी लोकांनी लिहिल्या आहेत! तर गांधींना समजून घेतल्याशिवाय आंबेडकर समजत नाहीत! तर्कतीर्थ तर अजिबात समजत नाहीत, अशी माझी धारणा आहे.

प्राज्ञ पाठशाळेमध्ये 'अस्पृश्यत्व मीमांसा' नावाचं छोटं संस्कृत पुस्तक मी पाहिलं, त्याचीच ही पार्श्वभूमी आहे. पुणे करारानंतर महात्मा गांधी इथे आले आणि त्यांनी ठरवलं की, मी केवळ आणि केवळ सामाजिक काम करणार. त्याची सुरुवात अस्पृश्यता निर्मूलनाने करणार.

*मी कितीतरी लेखक आणि राजकीय नेत्यांबद्दल असं सांगेन की, त्यांच्या साहित्याची समग्र सूची आपल्याकडे नाही; तर्कतीर्थांचीही नाही. त्यांची प्राथमिक चरित्रे होती, तसेच समकालीन लोकांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्ये छोटे छोटे नर्मबिंदू होते की, इथे व्याख्यान झालं. मग तो काळ- त्या काळातली वर्तमानपत्रे शोधायची आणि ते भाषण शोधून काढण्याचा प्रयत्न करायचा. असं करत मी सगळे लेख, मुलाखती, भाषणं, प्रबंध, त्यांनी केलेले पोथ्यांचे कॅटलॉग, भारतीय घटनेचं भाषांतर हे सर्व तर मिळवलंच. पण शंभर वर्षांमध्ये तर्कतीर्थांच्या साहित्यावर ज्या ज्या लोकांनी लिहिलं - ते मी शोधायला लागलो.*

1932-35 मध्ये गांधीजी अत्यंत कर्मठ, सनातनी होते. त्यांनी दोन प्रकारच्या धर्मपंडितांना येरवड्याच्या जेलमध्ये बोलवलं. अत्यंत सनातनी धर्मपंडित आणि अत्यंत पुरोगामी धर्मपंडित. ते सनातन्यांना विचारायचे की, 'आपल्या धर्मामध्ये अस्पृश्यता निर्मूलनाला वाव आहे का? आणि त्याची काही प्रमाणं आहेत का?' पुरोगाम्यांना विचारायचे की, 'मला असा पुरावा द्या, जेणेकरून मी अस्पृश्यता निर्मूलन करू शकेल.' त्या दोघांचं ऐकल्यानंतर गांधीजी या निर्णयाला आले की, आपले सगळे पाणवठे जात-धर्म मुक्त झाले पाहिजेत. आपली सगळी मंदिरं जात-धर्म मुक्त झाली पाहिजेत आणि हे अस्पृश्यता निर्मूलनाशिवाय शक्य नाही. आणि त्याला धर्माचा आधार आहे, याची खात्री झाल्यावर 'हरिजन'चा पहिला अंक 11 फेब्रुवारी 1933 ला (माझं स्मरण बरोबर असेल तर) निघाला. तो पहिला अंक तर फारच क्रांतिकारी आहे, एकीकडे बाबासाहेब आंबेडकरांवर लेख आहे. दुसरीकडे पुरोगामी धर्मपंडितांचं 'Pandit's opinion on untouchability' आहे. त्यात बा.न. राजहंसांचा एक लेख आहे. तो पहिला अंक अस्पृश्यता निर्मूलनाच्या मूलभूत मांडणीचा आहे. त्यात सगळ्या पुरोगामी धर्म पंडितांनी असं सांगितलंय की, 'आपले पाणवठे, आपल्या शिक्षण संस्था, आपला समाज आणि मंदिरं ही सर्वांसाठी खुली झाली पाहिजेत. अस्पृश्यता निर्मूलनासाठी धार्मिक आधार घेऊन काम केलं, तर ते होईल.' त्याचं प्रमाण म्हणजे हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींचा प्रबंध 'अस्पृश्यत्व मीमांसा' (1934) आहे. या प्रबंधामध्ये अस्पृश्यता निर्मूलनाच्या धार्मिक आधारांची चर्चा आहे. आपण समग्र तर्कतीर्थमध्ये नुसता हा संस्कृत निबंध देऊन थांबलो नाही, त्याचं मराठी भाषांतर दिले आहे. सर्व सामान्य माणसाला कळालं पाहिजे की, गांधीजींचा आग्रह काय होता.

**प्रश्न** : तुम्ही समग्र तर्कतीर्थ करायचं ठरवल्यावर त्यासाठी साधनं गोळा करणं, लोकांच्या भेटी-गाठी करणं ही प्रक्रिया काय होती?

– ही प्रक्रिया 'सुतावरून स्वर्ग गाठणे' अशी होती. आपल्या महाराष्ट्रीय आणि भारतीय समाजामध्ये जतन साक्षरता नाही आणि संशोधनाची शिस्तही नाही. मी कितीतरी लेखक आणि राजकीय नेत्यांबद्दल असं सांगेन की, त्यांच्या साहित्याची समग्र सूची आपल्याकडे नाही; तर्कतीर्थांचीही नाही. त्यांची प्राथमिक चरित्रे होती, तसेच समकालीन लोकांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्ये छोटे छोटे नर्मबिंदू होते की, इथे व्याख्यान झालं. मग तो काळ-त्या काळातली वर्तमानपत्रे शोधायची आणि ते भाषण शोधून काढण्याचा प्रयत्न करायचा. असं करत मी सगळे लेख, मुलाखती, भाषणं, प्रबंध, त्यांनी केलेले पोथ्यांचे कॅटलॉग, भारतीय घटनेचं भाषांतर हे सर्व तर मिळवलंच. पण शंभर वर्षांमध्ये तर्कतीर्थांच्या साहित्यावर ज्या ज्या लोकांनी लिहिलं – ते मी शोधायला लागलो. सध्या एक वरदान आपल्या सगळ्यांना आहे – गुगल, आपण त्याचा नीट वापर करत नाही. अगदी कालचीच गोष्ट सांगतो. काल मी गुगलवर शोधत होतो, डॉ. पा. वा. काणे आणि तर्कतीर्थ. तर माझ्या लक्षात आलं की, 'वैदिक संस्कृतीच्या विकासा'चं संस्कृत भाषांतर आहे. असे सगळे शॉक, ज्याला मी सोशल शॉक म्हणतो किंवा रिसर्च शॉक म्हणू, हे बसत गेले.

तर्कतीर्थांनी त्या काळामध्ये जगभर भाषणं केलेली आहेत. ती आपल्याकडे कुठेच नाहीत. विदेशी लोकांनी जो तर्कतीर्थ जपलेला आहे, तसा आपण जपू शकलो नाही. एक उदाहरण सांगतो. साधारणपणे 1972 मध्ये तर्कतीर्थांनी पॅरिसच्या प्राच्य विद्या परिषदेमध्ये एक निबंध लिहिलेला होता. 'The Cosmic state and collective Kingship of Vedic Gods' त्यात सांगितलं होतं की, 'लौकिक जगामध्ये जशी राजाची सत्ता असते, तसा देव सृष्टीमध्येही एक राजा असतो आणि त्याची सत्ता असते.' त्याचा शोध लावून त्यांनी तो निबंध लिहिलेला होता. मी फ्रान्सच्या नॅशनल लायब्ररीला एक मेल लिहिला होता. त्याच दिवशी त्यांचं उत्तर आलं. 'If you are interested, we will serve the essay, speech he has read in oriental congress.' मी दुसऱ्या दिवशी त्यांना 'येस' म्हटलं. तिसऱ्या दिवशी त्यांनी सांगितलं की, 'Do you want it free or with cost?' मी म्हटलं, 'With cost'. त्यावर ते म्हणाले, 'We will take a minimum cost as you are scholar.' त्यांनी अत्यंत अल्पदरात, झेरॉक्सच्या पैशांमध्ये तो निबंध पाठवला. आपल्याकडे मात्र मी डॉलर्सच्या किंमतीनी संदर्भ मिळवले आहेत. आपल्याकडे संदर्भाकडे 'वारसा'

म्हणून पाहिलं जातं, तिथे ‘ओपन सोर्स’, ‘पब्लिक डोमेन’ म्हणून पाहिलं जातं. महाराष्ट्राने आणि भारतीय समाजाने केव्हा तरी ज्ञानाकडे ‘सामाजिक संपत्ती’ अशा उदारमतवादाने बघायला हवं. अशा उदारमतवादामुळे हे साहित्य मी मिळवू शकलो. मी नम्रपणे असं सांगेन, की लॉकडाऊनच्या काळामध्ये सगळ्या ग्रंथालयांनी मला हवी ती साधनं पाठवली, पुरवली. मी त्या सर्वांचा ऋणी आहे.

**प्रश्न** : सगळ्या म्हणजे महाराष्ट्रातल्या कुठल्या ग्रंथालयांनी?

– शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय, कोल्हापूरचं करवीर नगर वाचन मंदिर, मुंबईचं मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, पुण्याचं नगर वाचन मंदिर, राज्य मराठी ग्रंथालय, बदलापूरचं ग्रंथसखा या सगळ्या ग्रंथालयांनी मला कोरोना काळामध्ये मेलवर साधनं पाठवली आहेत. मी असे मित्र शोधून काढले, ज्यांना माझ्यासारखं वेड आहे. ‘रवींद्र घोडराज’ नावाचे एक मित्र विश्वकोशात आहेत, त्यांना सांगायचा अवकाश की ते शोधून द्यायचे. बदलापूरला ग्रंथसखा असलेले ‘श्याम जोशी’ आहेत किंवा ग्रंथालय संचालक ‘दत्ता क्षीरसागर’, ज्यांना मी नुसतं वर्तमानपत्र सांगावं आणि त्यांनी शोधून द्यावं. हे श्रेय माझं एकट्याचं नसून अशा हजार हातांचं आहे. खरं म्हणजे हा संयुक्त सहयोग प्रकल्प आहे.

**प्रश्न** : तर्कतीर्थांना जाऊन आता तीन दशके झाली आहेत. त्यांचं सार्वजनिक आयुष्य सत्तर वर्षांचं होतं. त्यांच्या हयातीमध्ये आणि त्यांच्या मृत्यूनंतरही हा सगळा ऐवज विखुरलेल्या स्वरूपात गोडाऊनमध्ये पडलेला, वापरात नसलेला असा आहे. हा सगळा जेव्हा वर येत

वाई येथील विश्वकोश कार्यालयात तज्ज्ञांची बैठक



होता, तुम्ही तो नजरेखालून घालत होता, वाचत होता, जुळवणी करत होता; तेव्हा तुम्हाला कितीतरी नवीन शोध लागले असतील, उदा. हे आजच्या काळाशी जास्तच संबंधित आहे. हे सगळं पाहत, वाचत असताना आपला महाराष्ट्र तर्कतीर्थांच्या बाबतीत जरा कृतघ्न आहे, असं काही तुम्हाला वाटलं का?

– कृतघ्न आहे असं मी म्हणणार नाही, पण समकाल हा नेहमी सनातनी असतो. मी तुम्हाला दोन छोटी उदाहरणं देतो. बाबरी मशीद पाडली गेली, त्या वेळची तर्कतीर्थांची एक मुलाखत आहे. त्यात ते म्हणतात, 'रामजन्मभूमीला आधार नाही.' आत्ता जे रामाचं मंदिर आहे, तिथेच राम जन्माला आला, याला ऐतिहासिक आधार नाही. त्याच दरम्यान मंडल आयोगाबद्दल त्यांचं असं म्हणणं होतं की, 'मंडल आयोग जातीय जाणिवा उदार करत नाही, तर कर्मठ करतो आहे.' इतक्या वर्षांनी पाहतो की, आज आपण धार्मिक व जातीय, जाणिवांच्या कडेलोटावर आपण उभे आहोत, (व्यक्तिगत सांगायचं झालं तर मला जात नाही, धर्म नाही.पण  लोक माझीही जात शोधतात याला काय करू या?) म्हणून मला वाटतं तर्कतीर्थांचं समग्र वाङ्मय वर्तमान महाराष्ट्राला आणि भारताला परत एकदा प्रबोधनकाळाकडे (Renaissance) नेईन.

**प्रश्न** : ठीक आहे, तुम्ही म्हणताय की महाराष्ट्र कृतघ्न नाही, पण त्यांच्या हयातीतही आणि त्यांच्या मृत्यूनंतर तीस वर्षांनीही ते सर्व विखुरलेल्या स्वरुपात ठेवलंय. मला स्वतःला असं वाटतं की, त्यांचे जे इतर चाहते असतील, त्यांचे अनुयायी असतील किंवा संपादन करणारे महाराष्ट्रातले अन्य विद्वान असतील, संस्था असतील, त्यांनी ते जर केलं असतं; तर याचा अधिक उपयोग झाला असता. दुसरं, मला असंही वाटतं की, ज्या माणसाने विश्वकोश केले, धर्मकोश केले, साहित्य संस्कृती मंडळाच्या मार्फत अनेक महत्त्वाची पुस्तकं आणली, त्या माणसाने स्वतःचं लेखन विखुरलेलं ठेवलं आहे. त्यांनीही स्वतःवर अन्याय केला, हेळसांड केली आणि महाराष्ट्रानेही कृतघ्नपणा दाखवला.

– तर्कतीर्थांच्या अगोदर मी खांडेकरांचा प्रकल्प पूर्ण केला आहे. मला असं लक्षात येतं की, अशा प्रकारची मोठी माणसं स्वतःच्या लेखनाबद्दल निरिच्छ असतात. आज आपण वर्तमानाला 'डॉक्युमेंटेशन एज' म्हणतो. त्या काळामध्ये अशी प्रगल्भता नव्हती, की आपली कुंडली आपणच तयार करायची, आपलं प्रोफाईल आपणच तयार करायचं, आपलं चरित्र आपणच लिहायचं. आत्मचरित्र लिहिण्याला 'आत्मश्लाघा' हा शब्द आहे. आत्मश्लाघा, आत्मप्रशंसा ही अत्यंत खालच्या दर्जाची गोष्ट आहे, असं मानण्याचा तो काळ होता. त्यामुळे विचारी माणसं स्वतःबद्दल निरिच्छच होती. खांडेकरांची 36 पुस्तकं मी संपादित केली. ही स्थिती केवळ त्यांच्या निरिच्छतेमुळे जशी होती, तशीच त्या काळामध्ये असलेल्या साधनांच्या कमतरतेमुळेही होती. त्यानंतर अनेक ध्येयवादी वर्तमानपत्रं आणि नियतकालिकं अल्पावधीत म्हणजे ज्याला आपण सामाजिक गर्भपात म्हणू, अशी गेली. कितीतरी अंक – म्हणजे तर्कतीर्थांनी ज्या ज्या वर्तमानपत्रांमध्ये, साप्ताहिकांमध्ये लिहिलं – 'संग्राम', 'प्रमोद', 'चित्रा', 'युगांतर' यांचा एकही अंक मिळत नाही. आपल्याकडे जतन साक्षरता नाही; जी ब्रिटिशांमध्ये, फ्रेंचांमध्ये मला दिसते.

**प्रश्न** : ही साक्षरता आपल्याकडे सर्वात जास्त जपली, महात्मा गांधींनी. त्यांनी बारीकसारीक चिटोऱ्या, त्याच्यातली माहिती, पत्रं, सर्व जतन केलंय. महात्मा गांधींचा आदर्श त्यांच्यासमोर होताच की. महात्मा गांधींचे शंभर खंड आहेत. त्यात पन्नास हजार पानं आहेत. महात्मा गांधींइतके फोटोग्राफ्सही जगातील एकाही नेत्याचे नसतील. तर्कतीर्थांचे तर स्वतःचे साधे फोटोग्राफ्सही मिळत नाहीयेत.

– आपल्याकडे जतन साक्षरता नाही, हा एक भाग आहे. दुसरं, तर्कतीर्थांच्या बुद्धिमत्तेची एक दहशत महाराष्ट्राने सतत वागवलेली आहे. छोटी छोटी उदाहरण सांगतो. नरहर कुरुंदकरांची, तर्कतीर्थांची, आगरकरांची समीक्षा फार कमी लोकांनी केली. बुद्धिजीवी आणि बुद्धिवादी किंवा बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकवादी लोकांबाबत समीक्षा पुरेशी झाली नाही. म्हणजे आपल्याकडे वैचारिकतेचंच वावडं असल्याचा प्रघात आहे; त्या काळातही आणि आत्ताही. 'ललित म्हणजे साहित्य' अशी जी धारणा आहे, त्यातून हे सांस्कृतिक वैयर्थ निर्माण झालेलं असावं, असं मला वाटतं.

**प्रश्न** : कुरुंदकरांनी तर असं म्हटलेलंच आहे की, 'माझ्यावर टीका-टिप्पणी करायची असेल,

माझ्या साहित्याची वा विचारांची समीक्षा करायची असेल, तर तुम्हाला मी ज्या विषयांवर लेखन केलंय, बोललोय, त्यामध्ये अधिक खोलात जावं लागेल.’ मग तर्कतीर्थांबाबत, त्यांनी हाताळलेल्या विषयांबाबत, अधिक खोलात जाणारी माणसं महाराष्ट्रात नव्हती. म्हणून ती चिकित्सा झाली नाही, असं म्हणायचं आहे का?

– खोलात गेली नाहीत, याची कारणं अशी की, पन्नास वर्षांपूर्वीचा काळ हा एका अर्थाने प्रखर व्यक्तिपूजेचा काळ होता. आज वर्तमानात आपण कोणावरही टीका करतो. त्या काळामध्ये प्रगल्भ व्यक्तींबद्दल आदराचा एक भाग होता. त्या संकोचापोटी, संस्कारापोटी लोकांनी टीका केली नाही. टीका आहे, पण त्या अत्यंत माफक स्वरूपाच्या आहेत. कठोर टीका तर्कतीर्थांच्या वाट्याला आली असं मला दिसत नाही.

**प्रश्न** : समग्र वाङ्मय प्रकल्पातील एक खंड ‘तर्कतीर्थांची साहित्य समीक्षा’ यावर आहे, त्याबद्दल आपण उत्तरार्धात बोलूच. पण पूर्वार्धातील जे शेवटचे काही प्रश्न आहेत, त्यात तर्कतीर्थांनी धर्मकोशाचं,

*साहित्य संस्कृती मंडळ आणि विश्वकोशाची स्थापना झाली, तेव्हा यशवंतराव चव्हाण साहेबांनी साहित्य संस्कृती मंडळाच्या नागपूर येथील उद्घाटनाच्या भाषणात असं सांगितलं की, ‘साहित्य आणि संस्कृती हा राजकारण्यांचा प्रांत नाही. तो केवळ आणि केवळ साहित्यिक आणि विद्वानांचा प्रांत आहे. राज्य सरकार त्यासाठी साधनं पुरवेल. पण त्यात चुकूनही अनवधानाने हस्तक्षेप करणार नाही.’ हे स्वातंत्र्य दिल्यामुळे तर्कतीर्थ आणि त्यांचे सहकारी अशा प्रकारची मांडणी करू शकले. आज आपण इतक्या वर्षांनी त्या मंडळांकडे, त्यांच्या कामांकडे पाहतो, त्यातून आपणास काय अधोरेखित होताना दिसतं? आज महाराष्ट्राला परत एकदा हस्तक्षेपमुक्त ज्ञान व्यवस्थेची गरज आहे.*

डावीकडून– खासदार किसनवीर, यशवंतराव चव्हाण, तर्कतीर्थ (वाई)



साहित्य संस्कृती मंडळाचं आणि विश्वकोशाचं केलेलं काम, यांची वैशिष्ट्यं तुम्हाला जाणवली?

– तर्कतीर्थांच्या कोश वाङ्मयाचा प्रारंभ हा प्राज्ञ पाठशाळेमध्ये झाला. तिथे धर्मचिकित्सेच्या संदर्भामध्ये विचार केला गेला. त्या काळामध्ये पां. वा. काणे यांनी जे धर्मशास्त्र लिहिलं – इंग्रजीमध्ये आणि नंतर मराठीमध्ये त्याचे दोन खंड आले. धर्मशास्त्रामध्ये असं एक परिमाण आहे की, 'कोणत्याही धर्माचा अभ्यास हा कालानुक्रमे केल्याशिवाय धर्म परिवर्तनाचा अभ्यास करता येत नाही.' त्यामुळे केवलानंद सरस्वतींना असं वाटलं की, धर्मामध्ये 'व्यर्थ आणि ग्राह्य' अशी विभागणी आपल्याला करता आली पाहिजे. जे ग्राह्य आहे आणि पुढच्या काळामध्ये ज्याचं मार्गदर्शन होऊ शकतं, त्याची कालानुक्रमे मांडणी करता आली पाहिजे. धर्मकोश दुसरं-तिसरं काही नसून वैदिक वाङ्मयातील वर्तमानाला उपयुक्त सामग्रीचा कालगत इतिहास आहे. तर्कतीर्थांच्या काळात साधारण वीस भाग तयार झाले, पण त्यामध्ये 'व्यवहार कांड' नावाचा जो खंड आहे; (याचे एकूण तीन भाग आहेत.) त्यामध्ये राज्यशास्त्र, रीतिशास्त्र, रूढीशास्त्र, परंपराशास्त्र यांबद्दल विस्ताराने लिहिलेलं आहे. त्या लोकांची अशी धारणा होती की, हे आपलं प्राचीन वैभव आहे. वैदिक साहित्य म्हणजे 'बीत गई, बात गई' असं नाही.

एक उदाहरण सांगतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली. त्यावेळी तर्कतीर्थ महाडला उपस्थित होते. मनुस्मृती जाळल्यानंतर तर्कतीर्थांनी मनुस्मृतीची राख एका पुडीमध्ये बांधून घेतली.

**प्रश्न :** याचा संदर्भ कुठल्या खंडात आहे?

– याचा संदर्भ पत्रसंग्रह खंडातील 'मान्यवरांशी पत्रव्यवहार' या भागात आहे. ते काही दिवसांनी मुंबईला बाबासाहेब आंबेडकरांना वेळ ठरवून भेटायला गेले. हे पत्रव्यवहारामध्ये लिहिलेलंही आहे. ते म्हणाले की, 'तुम्ही मनुस्मृती जाळली, त्याच्याशी मी सहमत आहे. पण मनुस्मृती वाचून व अभ्यासून जाळली असती, तर मी समजू शकलो असतो. कोणत्याही धर्मग्रंथामध्ये सगळंच टाकाऊ आणि निकामी असत नाही. मी सध्या धर्मकोशाचा अभ्यास करत आहे. त्यामुळे मी तुम्हाला असं अधिकाराने सांगेन की, कोणतंही वाङ्मय हे पूर्णपणे टाकाऊ असत नाही. मी ही राख आणलेली आहे. तुमच्या कपाळाला लावतो.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतके उदारमतवादी होते की, ते म्हणाले 'लावा आणि मला समजावून सांगा.' तर्कतीर्थांनी मनुस्मृतीमध्ये काय ग्राह्य आहे, काय अग्राह्य आहे हे सांगितलं आणि ते त्यांना आवडलं.

**प्रश्न :** धर्मशास्त्र किंवा धर्मकोश याबद्दलचं कुतूहल निर्माण होण्यासाठी किंवा अधिक वाढण्यासाठी तुम्ही सांगितलेलं आत्ताचं एक उदाहरण पुरेसं आहे. आता आपण विश्वकोशाकडे वळू या. तर्कतीर्थांच्या काळात 15 खंड आलेले आहेत. ते तुम्ही नजरेखालून घातले आहेत, तर 15 खंडांचं जे काम झाले आहे, ते कसं आहे?

– महाराष्ट्र राज्य 1960 मध्ये स्थापन झालं. त्या वेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना एका पत्रकाराने मंत्रीमंडळ रचना बघून असा प्रश्न विचारला होता की, 'हे राज्य मराठ्यांचे की मराठीचे?' चव्हाण साहेबांनी एका क्षणाचाही विलंब न लावता सांगितलं, 'हे राज्य मराठीचे आहे!' त्यांनी घोषणा केली की, 'मराठीच्या विकासासाठी हे राज्य सरकार स्वतंत्र भाषा संचालनालय सुरू करेल. भविष्यकाळात मराठी ज्ञानभाषा व्हावी म्हणून प्रयत्न करेन. मराठ्यांचा इतिहास म्हणजे शिवाजी महाराजांचा इतिहास, इतिहासाची साधनं गोळा करून विधिवत पद्धतीने लिहिला जावा, असा प्रयत्न महाराष्ट्र सरकार करेल.' या तीनही गोष्टी त्यांनी नंतर केल्या. 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ची स्थापना 19 नोव्हेंबर 1960 ला त्यांनी केली आणि त्याची जबाबदारी तर्कतीर्थांवर सोपवली. तर्कतीर्थांनी 1960-62 ला महाराष्ट्राच्या ज्ञानरचनेचा एक आराखडा तयार केला. त्या आराखड्यामध्ये त्यांनी दोन गोष्टी सांगितल्या.

मराठी भाषा आणि साहित्य समृद्ध व्हायचं तर आज आपण मराठी 'अभिजात' व्हावी याचा आग्रह धरतो आणि पाठपुरावाही करत आहोत, ही चांगली गोष्ट आहे. पण मराठी अभिजात तेव्हा होते, जेव्हा सगळ्या ज्ञानभाषांचे प्रवाह मराठीमध्ये येतात. तर्कतीर्थांनी त्यासाठी त्यावेळी जे इंग्रजी लिहिणारे स्कॉलर्स होते आणि जे मूळ मराठी भाषिक होते, अशांना सांगितलं की, 'तुम्ही इंग्रजी लिहिता ही चांगली गोष्ट आहे. पण तुम्ही मराठी मातृभाषी आहात, तर तुम्ही ते मराठीत


Date of Posting : 25-3-2024

का लिहित नाहीत?' असं म्हणून तर्कतीर्थांनी त्या काळामध्ये सगळ्या ज्ञान-विज्ञानाची शास्त्रं मराठीत आणली. त्यामध्ये आयुर्वेद, प्लास्टिक, सिमेंट, भौतिकशास्त्र, संगीतशास्त्र अशी कितीतरी शास्त्रं आहेत. जगातले अभिजात आणि नोबेल मिळालेले ग्रंथ मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. त्यांची अशी धारणा होती की, मराठी भाषा अभिजात आणि समृद्ध तेव्हाच होईल, जेव्हा विविध ज्ञान-विज्ञानाच्या शाखा मराठीत येतील.

नंतर 1962 मध्ये त्यांनी मराठी विश्वकोशाचा संकल्प सोडला. त्यांच्यापुढे Encyclopedia of Britannica होता. Britannica च्या दर्जाचा मराठी विश्वकोश तयार झाला पाहिजे. (साधनानेच माझं 'भारतीय भाषा आणि साहित्य' नावाचं पुस्तक प्रकाशित केलेलं आहे. त्याचा अभ्यास करून मी तुम्हाला सांगेन की, मराठीमध्ये सर्व भाषांचे प्रवाह अजूनही आलेले नाहीत. सर्व भाषांतील श्रेष्ठ रचना आजही आलेल्या नाहीत.) तर्कतीर्थांनी त्या काळामध्ये असं पाहिलं की, मराठीमध्ये संज्ञापन शाखा विकसित झाली पाहिजे. म्हणजे प्रत्येक गोष्टीची व्याख्या झाली पाहिजे आणि त्या व्याख्यांचा विस्तार झाला पाहिजे. म्हणून विश्वकोशामध्ये कोणत्या ज्ञान शाखेला किती पानं द्यायची हे त्यांनी अभ्यास करून लिहिलेलं आहे. Britannica मध्ये ज्या शास्त्रांचा उल्लेखही नाही, अशी अनेक शास्त्रं मराठी विश्वकोशात दिसतात. त्यानंतर त्यांनी असं पाहिलं की, ज्ञान-विज्ञान ही शाखा तंत्रज्ञानापर्यंत आली पाहिजे. माझ्या मते, मराठी विश्वकोश हा वेद ते वेब (Web) असा पट मांडणारा आहे.

मी सांगत होतो की, ज्ञानाकडे आपण किती निरिच्छ पद्धतीने पाहायचो. तर्कतीर्थांनी पदनाम कोश तयार केला. त्या वेळचे मराठीतील आघाडीचे नेते आचार्य प्र.के.अत्रे यांनी एका साहित्य संमेलनामध्ये 'हा पदनाम कोश नसून हा बदनाम कोश आहे' असं सांगितलं.

डावीकडून- केंद्रीय मंत्री काकासाहेब गाडगीळ, तर्कतीर्थ, राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद, केवलानंद सरस्वती (1954, दिल्ली)



त्याला तर्कतीर्थांनी तिथेच उत्तर दिलेलं आहे.' पण त्या काळामध्ये वाद-विवाद व्हायचे; वितंडवाद व्हायचे नाहीत. आज आपण वितंडाकडे गेलो आहोत. विचारप्रवाहांच्या ज्या शैली वेदांतामध्ये सांगितल्या आहेत, त्यामध्ये वितंड ही एक वादाची शैली आहे. तर मतभिन्नतेचा स्वीकार करून 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ही जी परंपरा आहे, ही तर्कतीर्थांनी विश्वकोशाच्या माध्यमातून विकसित केलेली दिसली.

**प्रश्न :** आपण धर्मकोशाबद्दल बोललो. विश्वकोशाचे 15 खंड तर्कतीर्थांच्या काळात संपादित झाले आहेत...

– याशिवाय 'मीमांसा कोश'चे 7 खंड आहेत. त्याचे संपादन त्यांचे गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांनी सुरू केले होते, पण त्याची निर्मिती तर्कतीर्थांनी केली. मूलभूत ज्ञानशाखेचा विकास, मराठी भाषा आणि साहित्य यांचा ज्ञानमाध्यम म्हणून पाया कुणी घातला असेल तर तो तर्कतीर्थांनी. श्री.व्यं. केतकरांनी, वि.का.राजवाडेंनी त्याची पायाभरणी केली, हे मला मान्य आहे, पण त्याचा विकास मात्र तर्कतीर्थांनीच केलेला आहे.

**प्रश्न :** ज्ञानाचं संवर्धन असो किंवा विकास असो, त्यासाठी कोश वाङ्मय हे अगदी पायाभूत मानलं जातं. हे सर्व चालू असतानाच साहित्य संस्कृती मंडळाचे ते वीस वर्षं अध्यक्ष होते. (1960-80) या काळात जवळपास 200 पुस्तकं प्रकाशित झाली. त्या पुस्तकांचे विषय त्यांचे लेखक किंवा त्याचे अनुवाद, त्यांच्या तर्कतीर्थांनी लिहिलेल्या प्रस्तावना आणि त्यांचा दर्जा पाहिला, तर त्यात तर्कतीर्थांचं योगदान असणार. तर त्या वीस वर्षांच्या त्यांच्या कालखंडाबद्दल तुम्ही काही अभ्यास केला असेल, तो काय स्वरूपाचा होता आणि त्यातून काय कळलं?

– त्याचं श्रेय केवळ तर्कतीर्थांना देणं बरोबर होणार नाही. त्यांचे काही समकालीन सहकारी होते. तर्कतीर्थांनी वेगवेगळ्या ज्ञानशाखांसाठी समित्या नेमल्या होत्या. उदाहरणार्थ, आपण फ्रेंच लिटरेचर घेऊ, तर त्यांनी फ्रेंच भाषा जाणणारे तज्ज्ञ एकत्र केले. त्यांना सांगितलं की, 'फ्रेंच भाषेत सर्वोत्कृष्ट काय आहे ते सांगा, आपण ते मराठीत आणू'. इंग्रजीतील तज्ज्ञांना सांगितलं की, 'इंग्रजी भाषेत सर्वोत्कृष्ट काय आहे, ते मराठीत आणा.' तसेच इंजिनिअरिंगमधील तज्ज्ञांना सांगितलं, 'सर्वोत्कृष्ट काय आहे, ते सांगा.' विश्वकोश लिहिण्याच्या आधी नोंदींचं शास्त्र तर्कतीर्थांनी विकसित केलेलं आहे. 'विश्वकोश परिचय' नावाचा जो ग्रंथ आहे, तो माझ्या दृष्टीने महाराष्ट्रातला 'स्टायलिस्टीक' वर लिहिला गेलेला पहिला ग्रंथ आहे. त्यापूर्वी आपण स्टायलिस्टीकच्या दृष्टीने विचार केला नव्हता. शास्त्रोक्त पद्धतीने संज्ञापन, शास्त्रोक्त पद्धतीने विषयाची मांडणी. त्याबाबत ते किती काटेकोर होते, हे कळतं. एक शब्द आहे – अब्रा का डब्रा. 'पाचशे शब्दांत त्याची नोंद लिहिली जावी. अभियांत्रिकी शास्त्र किमान तीनशे पृष्ठांमध्ये त्याची नोंद व्हावी.' म्हणजे व्याप्ती लक्षात घेऊन तर्कतीर्थांनी पृष्ठांची मांडणी केली आहे. हे माझ्या दृष्टीने ज्ञान व्यवस्थेचं काम आहे. त्याला फार चांगला शब्द आहे इंग्रजीत– 'ब्ल्यू प्रिंट', त्याला रा.ग.जाधवांनी 'रचनाकल्प' असा शब्द मराठीत आणलेला आहे. तर्कतीर्थांनी महाराष्ट्राला कितीतरी मराठी शब्द दिले. 'महाराष्ट्राला विश्वकोशाची देणगी कोणती' असं विचाराल, तर 'मराठीला प्रातिभाषिक समृद्धी विश्वकोशाने आणि विश्वकोशाच्या सहकाऱ्यांनी दिली', अशी माझी धारणा आहे.

**प्रश्न :** साहित्य संस्कृती मंडळाचं जर हे काम पाहिलं, तर योग्य सहकारी निवडणं, त्यांच्यासाठी एक फ्रेम तयार करून देणं, त्यांना सतत प्रेरित करणं हे सगळं उत्तम योजकत्व असल्याशिवाय शक्य नाही. त्यांचं ते काम खूप महत्त्वाचं आहे.

– त्याला आणखी एक जोड आपण दिली पाहिजे. साहित्य संस्कृती मंडळ आणि विश्वकोशाची स्थापना झाली, तेव्हा यशवंतराव चव्हाण साहेबांनी साहित्य संस्कृती मंडळाच्या नागपूर येथील उद्घाटनाच्या भाषणात असं सांगितलं की, 'साहित्य आणि संस्कृती हा राजकारण्यांचा प्रांत नाही. तो केवळ आणि केवळ साहित्यिक आणि विद्वानांचा प्रांत आहे. राज्य सरकार त्यासाठी साधनं पुरवेल. पण त्यात चुकूनही अनवधानाने हस्तक्षेप करणार नाही.' हे स्वातंत्र्य दिल्यामुळे तर्कतीर्थ आणि त्यांचे सहकारी अशा प्रकारची मांडणी करू शकले.

आज आपण इतक्या वर्षांनी त्या मंडळांकडे, त्यांच्या कामांकडे पाहतो, त्यातून आपणास काय अधोरेखित होताना दिसतं? आज महाराष्ट्राला परत एकदा

हस्तक्षेपमुक्त ज्ञान व्यवस्थेची गरज आहे.

**प्रश्न** : यशवंतराव चव्हाणांचा तर्कतीर्थांवर विश्वास होता. ते दोघेही रॉयवादी होते. मित्र होते. नेहमीच्या बैठकीतले होते. यशवंतरावांचं व्यक्तिमत्त्वही अभ्यासू, सुसंस्कृत होतं आणि त्यांचा खंबीर पाठिंबा मिळाला म्हणून तर्कतीर्थ काम करू शकले ही वस्तुस्थिती आहे.

– हे जे मूलतः, 'लीडर मस्ट बी ए गुड रीडर' सूत्र आहे, किंवा 'लीडर ऑफ रीडिंग कपॅसिटी' आहे ते म्हणजे यशवंतराव चव्हाण साहेब. त्यांच्या अधिकृत विदेश दौऱ्यांमध्ये तीन तास पुस्तकालयासाठी दिले जायचे. ते पुस्तकालयांमध्ये पुस्तकं खरेदी करायचे, वाचायचे. मराठीला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला की, त्याचा पहिला वाचक ते असायचे. त्याचं एक उदाहरण मी सांगेन. रणजीत देसाईंना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला तेव्हा पुरस्कार घेण्यापूर्वी ते चव्हाण साहेबांना भेटायला गेले. साहेबांनी साहित्य पुरस्कृत रचना काढून त्यांच्या हातात दिली, ती अधोरेखित केलेली होती. तेव्हा रणजीत देसाई म्हणाले, 'ज्या देशाला आणि ज्या प्रांताला असा वाचक मुख्यमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री मिळतो, तो देश खरा समृद्ध देश!'

**प्रश्न** : मी असा एक संदर्भ पूर्वी वाचला होता, तो या खंडांमध्ये आहे का किंवा तो तुम्हाला सापडला आहे का किंवा तो खरा आहे का? 1960 च्या दरम्यान यशवंतरावांनी तर्कतीर्थांच्या समोर असा एक प्रस्ताव ठेवला होता की, 'तुम्ही एक तर राज्यसभेवर तरी या किंवा विश्वकोश व साहित्य मंडळाचं हे काम तरी घ्या.' त्यांनी राज्यसभेच्या ऐवजी हे काम हाती घेतलं. हा संदर्भ बरोबर आहे का?

– बरोबर आहे. खरं म्हणजे त्यांना चॉईसच होता की, तुम्ही राज्यसभेवर जाता का महाराष्ट्रात राहता? ते म्हणाले, 'मी दिल्लीला जाऊन काय करू? माझं नातं मराठीशी आहे.' त्यांना मंत्रीमंडळात येण्याचीही ऑफर होती.

**प्रश्न** : ते राज्यपालही होऊ शकले असते, कदाचित राष्ट्रपतीच्या ठिकाणीही जाऊ शकले असते.

– नेहरूंच्या काळात, यशवंतरावांच्या काळात साहित्य अकादमीचे पहिले सचिव 'प्रभाकर माचवे' होते. त्यांची निवड नेहरूंनी तर्कतीर्थांसारखीच केलेली आहे. साहित्य अकादमीची स्थापना ही नोबेल अकॅडमीच्या पद्धतीने व्हावी असं नेहरूंना वाटायचं. म्हणून ते सर्व भारतीय भाषांची जाण असणारी व्यक्ती पाहत होते. त्यांना अनेक लोकांनी सांगितलं की, 'वर्तमानात एक-दोन व्यक्ती सर्व भारतीय भाषांची जाण असणाऱ्या आहेत.' तशी उच्चार आणि व्यक्तक्षमता विनोबांकडे आहे. पण साहित्य आणि समीक्षा क्षमता एकाच व्यक्तीकडे आहे, प्रभाकर माचवे. नेहरूंनी त्यांना विनंती केली, 'मी अशी एक संस्था स्थापतो, त्याचे तुम्ही सचिव व्हाल का?' तर ते म्हणाले, 'व्हाल का, असं विचारता आहात हा माझा गौरव आहे. मी आयुष्यभर हे काम करेन.' आणि आयुष्यभर त्यांनी भारतीय भाषांच्या समन्वयाचं काम केलं. आज तुम्हाला साहित्य अकादमीची जी विश्वासार्हता, साहित्य संस्कृती मंडळाचं जे पावित्र्य आहे, ते पायाभूत कार्य त्या अध्यक्ष आणि सचिवांनी केले. साहित्य संस्कृती मंडळाचे एके काळी सचिव होते - सेतू माधवराव पगडी - अशी मोठी माणसं या संस्थांना मिळाली.

**प्रश्न :** नेहरूंचा सगळा कालखंड आणि पुढची काही वर्षे म्हणजे 1960 ते 1980. त्यात जर तर्कतीर्थांनी विश्वकोश, वाई हे आपलं कार्यक्षेत्र न ठरवता, राज्यसभेवर जायचं ठरवलं असतं तर? त्यावेळी सर्वपल्लींपासून ते झाकीर हुसेनांच्यापर्यंतचे अनेक स्कॉलर्स पाहता– तर्कतीर्थांनी जर राज्यसभा निवडली असती, तर कदाचित लवकरच मंत्रीमंडळ, राज्यपाल, उपराष्ट्रपती, कदाचित राष्ट्रपती या दिशेने त्यांचा प्रवास होऊ शकला असता...

– हो, राजेंद्र प्रसादांचे आणि तर्कतीर्थांचे जवळचे संबंध होते. महात्मा गांधीजींचे आणि त्यांचे इतके जवळचे संबंध होते की, महात्मा गांधीजींच्या मुलाच्या लग्नाचं पौरोहित्य त्यांनी केलंय. इतकं असताना हा मनुष्य राजकारणाकडे साधन म्हणून पाहत नाही. राजकारणाला परिवर्तनाचं माध्यम मानतो. एक गोष्ट आपण दुरुस्त केली पाहिजे की, तर्कतीर्थांनी ज्ञानक्षेत्र निवडलं; पण राजकीय संन्यास नाही घेतला. वेळोवेळी प्रत्येक प्रश्नावर त्यांनी राजकीय मतं व्यक्त केलेली आहेत.

म्हणजे 'Let us come to be differ.' 'मतभिन्नतेसह आपण एकत्र येऊ आणि काम करू,' ही जी वैचारिक प्रगल्भता त्यावेळी राजकारणामध्ये होती,

त्याचं पुनरुज्जीवन आज परत होण्याची गरज आहे.

**प्रश्न :** शेवटच्या प्रश्नाच्या उत्तरातून एक प्रोव्होकेटिव्ह मुद्दा असा पुढे येऊ शकतो की, महाराष्ट्रातील अशा व्यक्ती ज्या राष्ट्रपती किंवा उपराष्ट्रपती झाल्या नाहीत, त्यामध्ये तर्कतीर्थ हे नाव आहे असं जर आपण म्हटलं, तर कुणालाही आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. असे हे तर्कतीर्थ, सुरुवातीच्या काळात त्यांचे गुरू होते केवलानंद सरस्वती. त्यानंतर त्यांच्यावरचा प्रभाव एका बाजूला मार्क्स, दुसऱ्या बाजूला गांधी आणि पुढच्या काळामध्ये रॉय. तर या चार व्यक्तींचा असलेला प्रभाव आणि स्वतःचं व्यक्तिमत्त्व, यातून आकाराला आलेले लक्ष्मणशास्त्री जोशी. आता तुम्हाला कसे दिसतात?

– मला असं वाटतं की, तर्कतीर्थांचे सहाध्यायी जसे विनोबा होते, तसे श्री. शं. नवरेही होते. ज्या नवऱ्यांनी अनेक वर्तमानपत्रांचं संपादनही केलं आणि मुंबईला श्रद्धानंद महिलाश्रमाचे ते अनेक वर्षे सचिवही होते. त्या काळची सगळी विद्वान मंडळी ही कर्मशील होती. त्या काळचा कोणताही प्रबोधक हा वाचावीर नव्हता; कृतिवीर होता, असं या सगळ्यांचं चरित्र अभ्यासताना तुमच्या लक्षात येईल. मला स्वतःला तर्कतीर्थांबद्दल असं वाटतं की, ते प्रासंगिक रॉयवादी होते, वेदांती होते, गांधीवादी होते, काँग्रेसी होते, मार्क्सवादी होते; पण सर्व काळात ते स्वतंत्र होते. म्हणजे त्यांचे मार्क्सवादाशी मतभेद होते. गांधीवादाशी मतभेद होते. ते प्रकटपणे आपले मतभेद त्या त्या व्यक्तींसमोर व्यक्त करायचे. म्हणून मी मघाशी म्हटलं की, 'Let us come together to be a differ.' मतभेदासह एकमेकांना स्वीकारणं आणि एकमेकांच्या मताचा आदर करुन नव्या उदारमतवादी विचारांकडे जाणं हा तर्कतीर्थांच्या विचारांचा खरा प्रवाह आहे.

**प्रश्न :** त्यांनी स्वतःचं वर्णन 'परिवर्तनवादी शास्त्री' असंच केलेलं आहे, ते तुमच्या खंडामध्ये आलेलं आहे. तुमच्या मुलाखतीचा हा जो पूर्वार्ध आहे, त्यात शेवटचा प्रश्न मला असा विचारायचा आहे की, पाच वर्षे तुम्ही तर्कतीर्थांच्या वाङ्मयामध्ये अनेक वेळा बुड्या घेतलेल्या आहेत. अनेकदा तुम्ही चकित– भयचकित झाला असाल, थक्क होऊन गेला असाल. तर पाच वर्षांपूर्वीचे सुनीलकुमार लवटे, जे सत्तरीच्या उंबरठ्यावर होते आणि आता पाच वर्षांनंतरचे पंचाहत्तरीतले सुनिलकुमार लवटे यांच्यामध्ये काय बदल झाला?

– या प्रकल्पातील एका खंडाच्या प्रस्तावनेचं शीर्षक आहे, 'भयचकित नमावे तुजला...' मी नगण्य झालो, मला माझ्या अज्ञानाची जाणीव झाली. तर्कतीर्थांनीच एका लेखात लिहून ठेवलेलं आहे की, 'आपण ज्ञानसत्तावादी, ज्ञानतपस्वी वगैरे म्हणतो, पण असे काही असत नाही. मुळात ज्याला तुम्ही ज्ञानसमाज आणि ज्ञानसाम्राज्य म्हणता, ते वास्तव ज्ञानसाम्राज्याचा एक शतांश हिस्साही नाहीत.' त्यासाठी त्यांनी दाखला दिलेला आहे, 'मी जगातले सगळे कोश वाचलेले आहेत. ते वाचत असताना एकदा एक कोश माझ्या हातात आला आणि माझा सगळा अहंकार दूर झाला. त्या कोशाचं नाव होतं, Encyclopedia of ignorance - अज्ञाताचा विश्वकोश.' त्या अज्ञाताच्या विश्वकोशामध्ये जगातल्या पन्नास शास्त्रज्ञांनी पन्नास विद्या शाखांमधील लेख लिहिले आहेत. आपापल्या विद्या शाखेत माणसाला काय काय माहीत नाही याची जंत्री त्यात दिलेली आहे. उदा., झोपेबद्दल त्यात एक निबंध आहे आणि असं सांगितलंय की, मानसशास्त्राला अजून झोपेची उकल झालेली नाही. आणि पुढे असं लिहिलंय, 'मनुष्य ज्ञानाचा जो अहंकार बाळगतो, तो सगळा अहंकार त्याच्या अज्ञानानेच निर्माण झालेला आहे. तो दूर व्हायचा असेल, तर उर्वरित अज्ञानाचं साम्राज्य प्रकाशात आलं पाहिजे.' माझा प्रयत्न हा एका अज्ञानी साम्राज्यात प्रकाश पाडण्याची एक छोटी कृती आहे.'

––

हा सुनीलकुमार लवटे यांच्या दीर्घ मुलाखतीचा पूर्वार्ध आहे. या मुलाखतीमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी कोण होते आणि त्यांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन करताना काय अडचणी आल्या, कोणते बोध झाले, कोणते शोध लागले, याबद्दल अगदी हिमनगाचं टोक म्हणावं, इतकंच आलं आहे. प्रत्यक्षात या अठरा खंडांमध्ये काय काय आहे, ते उत्तरार्धात येईल....

# समग्र तर्कतीर्थ वाङ्मय प्रकल्पात काय आहे?

## सुनीलकुमार लवटे

संवादक : विनोद शिरसाठ / शब्दांकन : प्राजक्ता धुमाळ



विश्वकोश कार्यालयात तर्कतीर्थ

**प्रश्न :** समग्र तर्कतीर्थ या अठरा खंडांच्या प्रकल्पातील पहिल्या खंडात तर्कतीर्थांनी विश्वकोशमध्ये केलेल्या नोंदी आहेत. त्या दीडशेहून अधिक नोंदी अवाचनीय असतील किंवा दुर्बोध असतील, असा अनेकांचा समज होण्याची शक्यता आहे; तर त्या नोंदींचं काय वैशिष्ट्यं तुम्हाला जाणवतं?

– तर्कतीर्थांनी स्वतःला नोंदींची एक शिस्त लावून घेतली आहे. ती अशी की, प्रारंभीच्या काळात त्या नोंदींचं ते संज्ञापन करतात. उदाहरणार्थ, अंतयात्रा. अंतयात्रा कशाला म्हणतात हे सर्वसाधारण माणसाला कळेल, असं ते स्पष्ट करतात. त्यानंतर अंतयात्रेची परंपरा केव्हापासून आहे इथपासून ते वर्तमानात

अंतयात्रा कशी काढली जाते, हे ते स्पष्ट करतात. हे एक उदाहरण म्हणून सांगतोय. हा विस्तार त्या नोंदींमध्ये नाही, पण तर्कतीर्थांच्या subconscious मध्ये आहे. पूर्वी अंतयात्रा निघायची, तर 'राम नाम सत्य है' असा एक घोषा अंतयात्रेमध्ये सतत असायचा. पण महात्मा गांधींच्या मृत्यूनंतर 'राम नाम सत्य है' हा घोषा बंद झाला आणि 'रघुपती राघव राजाराम' हे सुरू झालं.

काळाचं भान आपल्या नोंदींमध्ये ठेवण्याची एक लकब आणि शैली तर्कतीर्थांच्या नोंदींमध्ये दिसेल. त्या नोंदी त्या विषयाची पार्श्वभूमी सांगतात, इतिहास सांगतात आणि वर्तमानाचं रूपदेखील सांगतात. म्हणून त्या सार्वकालिक ठरतात, अशी माझी धारणा आहे. भाषेबद्दल म्हणाल, तर त्यांची वाक्यं अत्यंत सुटसुटीत आहेत. त्यांनी रचनाशास्त्रामध्ये, परिचय ग्रंथामध्येच असं लिहिलंय की, 'हा कोश एकाच वेळी सर्व विषय संग्राहक कोश आहे.' सर्व विषय संग्राहक कोशाचं वैशिष्ट्य असं आहे की, त्याचे वाचक सर्व स्तरांतले असतात. म्हणजे सर्वसाधारण वाचकही असतो, अज्ञही असतो आणि सुज्ञही असतो. तर ती नोंद अज्ञाला ज्ञान देणारी पाहिजे आणि सुज्ञाला प्रगल्भ करणारी पाहिजे. असा एक मेळ घालत सगळ्या नोंदी त्यांनी लिहिलेल्या दिसतात.

**प्रश्न :** तर्कतीर्थांनी लिहिलेल्या या 159 नोंदी आहेत आणि त्या विश्वकोशाच्या वेगवेगळ्या खंडांमध्ये विखुरलेल्या आहेत. मात्र समग्र तर्कतीर्थच्या या प्रकल्पाच्या पहिल्या खंडामध्ये एकत्र केल्या आहेत. त्यामुळे कोणाही जिज्ञासू वाचकांना आता ती चांगली सोय झाली आहे.

– नुसत्या एकत्रित केल्या नाहीत, तर अकारविल्हे दिलेल्या आहेत. ही पण एक विश्वकोशाची किंवा ज्ञानशाखेची शिस्त आहे. आपण शब्दकोश पाहतो की, (A) आधी असतो आणि Z शेवट असतो. तुमच्या मनातला शब्द नक्की कोणत्या क्रमाने असेल त्याचं एक भान येतं. म्हणजे अ शेवटी नाही बघायचा आणि क्ष पहिला नाही बघायचा, हे शास्त्रज्ञानही विश्वकोश सर्वसामान्यांना देतो.

**प्रश्न** : हा झाला पहिला खंड, जो विश्वकोशातल्या नोंदींचा आहे. दुसरा, तिसरा, चौथा नि पाचवा हे चार खंड हे भाषणांचे खंड आहेत. दुसऱ्या खंडात लक्ष्मण शास्त्रींनी 'व्यक्ती आणि विचार' यावर केलेली भाषणं आहेत. तिसऱ्या खंडात 'धर्मा'च्या संदर्भात केलेली भाषणं आहेत. चौथ्या खंडात 'साहित्या'च्या संदर्भात केलेली भाषणं आहेत आणि पाचव्या खंडामध्ये 'संस्कृती'च्या संदर्भात केलेली भाषणं आहेत. ही विभागणी तुम्ही जरा सोयीनुसार केली आहे. काही भाषणं दोन्ही–तिन्हींचा संगम म्हणता येतील अशी आहेत. तर हे चार खंड म्हणजे तर्कतीर्थांनी महाराष्ट्रात आणि देश–विदेशात केलेल्या भाषणांचं एकत्रीकरण आहे. त्यांची हजारो भाषणं आहेत, तुम्ही त्यातली दोनशे भाषणं या खंडांमध्ये आणली आहेत. या भाषणांमधून दिसलेले तर्कतीर्थ आपल्याशी संवाद करतात, त्यांचा आवाज ऐकू येतो, असं काही जाणवतं?

– तो अनुभव नक्की येतो. वि.स.खांडेकर आणि तर्कतीर्थ हे महाराष्ट्रातले असे दोन सांस्कृतिक वक्ते आहेत, जे बोलताना, सर्व स्तरांतील लोकांना आपल्याबरोबर घेऊन जातात. खांडेकरांची तर मी अनेक भाषणं वाचली. 'हे मी तुम्हाला सांगतो', असं म्हणत ते श्रोत्याला आपल्यामध्ये समाविष्ट करून घेतात. तर्कतीर्थ बोलताना श्रोत्यांमध्ये एक जिज्ञासा निर्माण करतात, त्यांना आपल्यामध्ये सामावून घेतात. तर्कतीर्थांचं कुठलंच भाषणं हे तशा अर्थाने सामान्य भाषण होत नाही. ज्याला आपण प्रेषितांची प्रवचने म्हणतो, अशा स्वरूपाचं ते बोलणं आहे. अनेक लोकांनी तर्कतीर्थांच्या भाषणांबद्दल असं लिहिलंय की, त्यांची कितीही भाषणं ऐकली तरी आपली ज्ञानपिपासा संपत नाही. एकाच विषयावरची अनेक भाषणं ते देतात, तेव्हा त्यातलं प्रत्येक भाषण स्वतंत्र असतं. पहिल्या भाषणाचा प्रभाव दुसऱ्या भाषणावर असत नाही. सर्व विषय आकलनाची प्रचंड शक्ती त्यांच्यात होती. ती त्यांनी स्वतःच्या वाचनातून, चिंतनातून विकसित केली होती. पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे म्हणजेच ज्याला आपण प्राच्यविद्या म्हणतो त्याचे ते जितके पंडित होते, तितके आंग्लविद्या पंडितही होते. आंग्ल युगातील सर्व ज्ञान–विज्ञान शाखा आणि वादांचा अभ्यास त्यांनी केला होता. त्यामुळे केवळ भारतविद्येचं विवेचन त्यांच्या भाषणांमध्ये कधी आलं नाही. सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्राचीन, आधुनिक आणि समकालाबद्दल समीक्षा केल्याशिवाय त्यांचं एकही भाषण पूर्ण होत नाही.

तर्कतीर्थ मानायचे की, जेव्हा एखादी जुनी गोष्ट सांगता, तेव्हा तिचा संदर्भ वर्तमानाशी जोडल्याशिवाय त्याला अर्थ राहत नाही. नाहीतर मग ते कीर्तन होतं. कीर्तन न होता ते प्रवचन झालं पाहिजे. प्रवचन हे प्रबोधक असलं पाहिजे. प्रबोधनातून ऐकणारा श्रोतृ समाज प्रगल्भ झाला पाहिजे. अशी मांडणी करत ते भाषण द्यायचे. त्यामुळे त्यांनी आपल्या आयुष्यात जवळजवळ दोन हजार भाषणं दिल्याची नोंद माझ्याकडे आहे. त्यातली अवघी दोनशे भाषणं या चार खंडांमध्ये देऊ शकलो. कारण, भाषणांच्या तितक्याच अधिकृत संहिता माझ्या हाती लागल्या. हे भाषण संग्रह करताना मी स्वतःलाच अशी शिस्त लावून घेतली, की ज्याच्या पूर्ण लिखित संहिता आहेत, तीच भाषणं आपण घ्यायची आहेत. ज्याची वृत्तं आहेत, किंवा संक्षेपाने आहेत अशी भाषणं आपण घेतलेली नाहीत. अर्थात, त्यांचा एक स्वतंत्र संग्रह करायला पाहिजे. मला या गोष्टीचं मोठं आश्चर्य वाटतं की, तर्कतीर्थ पानाच्या टपरीच्या उद्घाटनालाही जातात आणि पान-सुपारीवर बोलतात. प्राच्यविद्येमध्ये जातात आणि तिथे ते नुसतं संस्कृतबद्दल बोलत नाहीत, तर जगातील प्राच्यविद्या काय आहे, स्पॅनिशमध्ये काय आहे, ग्रीकमध्ये काय आहे यावर बोलतात. ग्रीक मिथक काय आहे आणि भारतीय मिथक काय आहे हे समजावून सांगतात. त्यामुळे त्यांचं प्रत्येक भाषण श्रवणीय आणि विचार करण्यास भाग पाडणारं व्हायचं.

आपण भाषणांचे चार खंड केलेले आहेत, त्यातला पहिला खंड विचार आणि तत्त्वज्ञानाचा आहे, त्यात आणखी दोन भाग केलेले आहेत- स्वातंत्र्यपूर्व काळातील भाषणं आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भाषणं. असं विभाजन करण्याचं कारण असं की, त्यांचं स्वातंत्र्यपूर्व काळातील आकलन आणि स्वातंत्र्योत्तर काळातील आकलन यामध्ये जमीन-अस्मानाचं अंतर दिसेल. स्वातंत्र्यपूर्व काळातील भाषणांमध्ये सनातनी विचारांचं द्वंद्व त्यांच्या मनात दिसतं. स्वातंत्र्योत्तर काळातील सगळी भाषणं मात्र फ्रान्समध्ये झालेल्या पुनरुज्जीवनच्या (Renaissance) सावलीतली दिसतात; त्यामुळे त्या भाषणांना एक विश्वव्यापकता आलेली दिसते. त्यांची धर्मावरची काही भाषणे आहेत. उदा., हिंदुधर्मसमीक्षा, सर्वधर्मसमीक्षा, शीख पंथ आणि इतिहास आणि अशी छोटी छोटी भाषणं आहेत. ती वाचताना असं लक्षात येईल की, हिंदू धर्माची मार्क्सवादातून समीक्षा, सर्वधर्मसमीक्षेमध्ये सर्व धर्मांचा तुलनात्मक अभ्यास, शीख धर्म हा धर्म नाही- पंथ आहे अशी मांडणी ते करतात. कोणतीही मांडणी करताना पुराव्यानिशी, सप्रमाण विवेचन करणं हा त्यांच्या भाषणांचा एक परिपाठ असल्याचा दिसेल. त्यांची जी साहित्यविषयक भाषणं आहेत, ती प्रामुख्याने साहित्य संमेलनातील आहेत. ती वाचत असताना आपल्या असं लक्षात येईल की, साहित्य म्हणजे केवळ ललित नाही, ललितेतर साहित्याला एक वेगळं परिमाण आहे आणि त्याची समाजाला मोठी गरज आहे; वैचारिक संपन्नतेशिवाय समाज प्रगल्भ होत नाही, अशी एक धारणा घेऊन ते लिहितात. मी एक उदाहरण तुम्हाला सांगेन.

तर्कतीर्थ 1954 ला साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले, तेव्हा काही लोकांनी असा प्रश्न विचारला की, 'त्यांनी कादंबरी, कथा, कविता कुठे लिहिल्या आहेत?' तर याला त्यांचे एक मित्र - प्रा. गोवर्धन पारीख यांनी सुंदर उत्तर दिलंय. 'असे प्रश्न विचारणाऱ्या लोकांनी हा गैरसमज दूर करून घ्यावा की केवळ ललित म्हणजे साहित्य नव्हे. खरं तर साहित्याची वरची पातळी कशात प्रतिबिंबित असते, तर ती वैचारिकतेत आहे.' तर्कतीर्थांनी ललित साहित्य लिहिलं नाही. यावर आक्षेप घेणाऱ्यांना त्यांनी समजावलं आहे की, ललित साहित्याचा आग्रह, अभिमान हा सर्जनशीलतेचा माफकपणा (Mediocrity) आहे. म्हणून तर्कतीर्थांनी त्या काळामध्ये 'नवभारत' हे मासिक चालवलं. त्या मासिकाचं वैशिष्ट्यंच असं होतं की, तर्कतीर्थांच्या पूर्वी त्यामध्ये कथा, कविता यायच्या, पण तर्कतीर्थांनी घेतल्यावर त्याचं स्वरूप पूर्णतः वैचारिक केलं. तर विचार व्यवहाराशी बांधिलकी हे तर्कतीर्थांच्या सर्व साहित्य व्यवहाराचं एक सूत्र होतं, असं मला त्यांची भाषणं वाचताना लक्षात येतं.

**प्रश्न** : आता तुम्ही उल्लेख केलात, त्याप्रमाणे त्यांची ही भाषणं पान टपरीच्या उद्घाटनाचीही आहेत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्येही आहेत. साहित्य संमेलनामधील आहे आणि धर्म परिषदांमधीलसुद्धा आहेत. त्यातली काही भाषणं ही अतिशय लहान म्हणजे दोन, तीन, चार परिच्छेदांची आणि काही भाषणं अगदी

55 ते 60 पानांची. इतकी विविधता त्यामध्ये आहे. अशाच प्रकारची विविधता या प्रकल्पातील सहाव्या खंडात आहे; तो खंड म्हणजे वेगवेगळ्या निमित्ताने झालेल्या त्यांच्या मुलाखती - वर्तमानपत्रातील, टीव्हीवरच्या किंवा व्यक्तींच्या संदर्भातील असतील. तर भाषणांकडून आपण मुलाखत खंडांकडे आलो, तर या मुलाखतींमधील विविधता आणि त्यांचं वैशिष्ट्यं काय?

– मुलाखतींचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य असं आहे की, समकालीन प्रश्नांवरचं भाष्य असं स्वरूप आहे. तर्कतीर्थ काळाला तोडून कधीच जगले नाहीत. मला नेहमी असं वाटतं की, ज्यांना आपण सोशल लीडर म्हणतो किंवा थॉट लीडर/थॉट प्रोसेसर म्हणतो किंवा समाजातील वैचारिक शिलेदार म्हणतो, अशा सर्व लोकांनी हे समजून घेतलं पाहिजे की, आपली मतं व्यक्त करत असताना समाजातील सर्व प्रश्नांवर भाष्य करता आलं पाहिजे. लोक असं म्हणतील की, कुणीही सर्वज्ञानी असत नाही. सर्वज्ञानी नसला तरी तो सर्वस्पर्शी असू शकतो, याचं भान तर्कतीर्थांच्या मुलाखती देतात. त्यांच्या मुलाखती अनेकदा वादग्रस्त ठरलेल्या आहेत, विशेषतः मंडल आयोगावरची त्यांची मुलाखत. सकाळमध्ये आलेली ही मुलाखत इतकी वादग्रस्त झाली होती की (आपण साधनेमध्ये बसलो आहोत), नरेंद्र दाभोलकरांनी वाईमध्ये त्यांची प्रेतयात्रा काढली होती. तर्कतीर्थांवर, त्यांच्या वाद-वक्तव्यांवर कितीदा तरी त्यांच्या मूळगावी - वाईमध्ये अनेक वर्षे बहिष्काराचं शस्त्र उपसण्यात आलं होतं. कशाचीही पर्वा न करता आपल्या विचार विवेकाशी बांधील राहून, प्रसंगी एकांतवास सहन करून, तर्कतीर्थांनी आपलं वैचारिक स्वातंत्र्य जपलेलं आहे. वैचारिक स्वातंत्र्याचं व्यवच्छेदक उदाहरण म्हणजे त्यांच्या मुलाखती.

**प्रश्न** : त्यांच्या मुलाखती वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. वेगवेगळी निमित्तं आहेत. पण प्रश्न विचारणारा आणि उत्तरं देणारे या दोन्हींमध्ये, विशेषतः मुलाखतींमध्ये उत्तरं देताना त्यांची काही वैशिष्ट्यं - उदाहरणार्थ, त्यात सेन्स ऑफ ह्युमर, तत्परता किंवा हजरजबाबीपणा अशी काही वैशिष्ट्ये जाणवली?

– अलीकडच्या काळात, तुम्ही टीव्हीवर कॉफी विथ करण असा एक मुलाखतींचा कार्यक्रम पाहत असाल, त्यात रॅपिड फायर प्रश्न असतात. वस्तुनिष्ठ प्रश्न आणि वस्तुनिष्ठ उत्तर - उदा. देव मानता का? - नाही. इतकं स्वच्छ विचारांचं अधिष्ठान तर्कतीर्थांनी आपल्या मुलाखतीतून स्पष्ट केलेलं आहे. कुणाचाही मुलाहिजा न ठेवता उत्तर देण्याचं धाडस - courage of conviction त्यांच्यात होतं. मला असं वाटतं की, ज्ञानी माणसाची लिटमस टेस्ट काय, तर आपल्या विचारांशी प्रामाणिक राहणं. पर्वा, परिणाम यांचा विचार न करता तर्कतीर्थ मुलाखती देत राहिले. त्यामुळे महाराष्ट्राने त्यांच्या मुलाखती वाचल्या आणि सोडल्या असं कधी झालं नाही.

दुसऱ्या बाजूला, त्यांच्या मुलाखतींच्या प्रतिमुलाखती आलेल्या आहेत. म्हणजे त्यांच्या मुलाखतींवर वाद-विवाद झालेले आहेत. अगदी साधी गोष्ट सांगतो, तर्कतीर्थांनी विश्वकोशाचा परिचय ग्रंथ प्रकाशित केला. त्या परिचय ग्रंथावर महाराष्ट्रामध्ये तीन महिने वाद-विवाद चालले होते. तर्कतीर्थ इतके उदारमतवादी होते की, त्यांनी टीका करणाऱ्यांच्या टीकाही छापल्यात आणि आपली उत्तरंही छापलीत. एक मुलाखत तर 'केसरी'मध्ये त्यांनी खुलासेवजा उत्तरे देणारी पाठवली होती. 'केसरी'ने ती संक्षिप्त करून छापली. तर्कतीर्थांनी नवभारतमध्ये परत मूळ छापली आणि खाली लिहिलं, 'यात अधोरेखित केलेल्या ओळी 'केसरी'च्या संपादकांनी गाळलेल्या होत्या.' ही विचारांबद्दलची प्रतिबद्धता तर्कतीर्थांनी आपल्या सगळ्या ज्ञान व्यवहारांमध्ये जपलेली आहे. म्हणून त्या मुलाखतींचं असाधारण महत्त्व आहे.

वर्तमानात मी पाहतो, अलीकडच्या मुलाखती फार गुळमुळीत असतात. राजकीय असू देत, सामाजिक असू देत, साहित्यिक असू देत. मला असं वाटतं की, प्रत्येकाने आपलं विचार वैशिष्ट्य स्वीकारून समाजासाठी confrontation करण्याचं धारिष्ट्य दाखवलं पाहिजे. जोपर्यंत आपण विचारांबद्दल प्रतिबद्ध असत नाही, तोपर्यंत समाजामध्ये परिवर्तन येणार नाही.

**प्रश्न** : या समग्र वाङ्मय प्रकल्पामध्ये पुढचे तीन खंड - खंड क्रमांक सात, आठ आणि नऊ हे लेखसंग्रह आहेत. त्यांचंही विभाजन तुम्ही तीन प्रकारांमध्ये केलेलं आहे. सातवा खंड राजकीय आणि तात्त्विक, आठवा सांस्कृतिक आणि नववा खंड आहे तो संकीर्ण. या

सगळ्या लेखांमध्ये आशयाबरोबरच विषयाची आणि मांडणीचीही विविधता आहे. खूप लहान ते खूप मोठे असे लेख आहेत. या तीन खंडांमधून त्यांच्या लेखांची व्याप्ती कळते. अगोदर आपण जे बोललो – नोंदी, भाषणं आणि मुलाखती या तिन्हींपेक्षा त्यांनी स्वतः लिहिलेलं हे लेखन आहे. या लेखसंग्रहाबद्दल तुम्हाला काय सांगता येईल?

– तर्कतीर्थांनी जे लेख लिहिले आहेत, त्यात तात्त्विक, सांस्कृतिक, व्यक्तिलेख आणि ऐतिहासिक विषय आहेत. एक माणूस समाजाबद्दल किती व्यापक आणि उदार असू शकतो, ते यातून जाणवते. या लेखांमध्ये पन्नास व्यक्तिलेख आहेत. या व्यक्ती त्यांच्या विचारांच्या नव्हत्या, ओळखीच्या नव्हत्या. त्यांनी गांधी, नेहरू, स्टॅलिन, मार्क्स, सावरकर, यशवंतराव चव्हाण, मारूतराव कन्नमवार, अत्रे, पु.लं., सेनापती बापट, योगी अरविंद आणि मानवेंद्र रॉय यांच्याबद्दलही लिहिलंय. वैचारिक सोवळं न पाळता सर्वांना आपलं

*तर्कतीर्थांनी आत्मकथा लिहिली नाही आणि ते चरित्राबद्दलही स्वतःला आरक्षित समजायचे, पण त्यांनी वेळोवेळी स्वतःबद्दल आत्मपर असे साधारण पंधरा लेख लिहिले आहेत – उदा. माझं वेदवाचन, मी रॉयवादी का झालो? पत्नी वारल्यानंतर त्यांनी सत्यवती बाईंबद्दल जे लिहिलं आहे ते – त्यां लेखांचं संपादन केलं, तर ते त्यांचं छोटं आत्मचरित्रच ठरेल. मला महाराष्ट्रातले दोन असे वैचारिक पुरुष दिसतात, ज्यांनी आपल्या पत्नीबद्दल अत्यंत उदारपणे पण वस्तुनिष्ठपणे लिहिलं – नरहर कुरुंदकर आणि तर्कतीर्थ. त्या दोघांनी पत्नीचं महत्त्व कळल्यानंतर, पत्नीबद्दलची अंतर्मुखता आल्यानंतर जे लिहिलेलं आहे, ते वर्तमानातील सगळ्या लोकांनी वाचलं पाहिजे.*

















मानणं आणि त्यांच्याबद्दल समभावाने लिहिणं, ही माझ्या दृष्टीने वैचारिक उदारतेची एक लिटमस टेस्ट आहे.

तर्कतीर्थांनी आत्मकथा लिहिली नाही आणि ते चरित्राबद्दलही स्वतःला आरक्षित समजायचे, पण त्यांनी वेळोवेळी स्वतःबद्दल आत्मपर असे साधारण पंधरा लेख लिहिले आहेत – उदा. माझं वेदवाचन, मी रॉयवादी का झालो? पत्नी वारल्यानंतर त्यांनी सत्यवती बाईंबद्दल जे लिहिलं आहे ते – त्यां लेखांचं संपादन केलं, तर ते त्यांचं छोटं आत्मचरित्रच ठरेल. मला महाराष्ट्रातले दोन असे वैचारिक पुरुष दिसतात, ज्यांनी आपल्या पत्नीबद्दल अत्यंत उदारपणे पण वस्तुनिष्ठपणे लिहिलं – नरहर कुरुंदकर आणि तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी. त्या दोघांनी पत्नीचं महत्त्व कळल्यानंतर, पत्नीबद्दलची अंतर्मुखता आल्यानंतर जे लिहिलेलं आहे, ते वर्तमानातील सगळ्या लोकांनी वाचलं पाहिजे. आपल्या पत्नीला गृहीत न धरता तिला मित्र, सहकारी, सहयोगिनी आणि प्रतिष्ठित जीवनसाथी म्हणून मानण्याचा एक वस्तुपाठ तर्कतीर्थांनी आपल्या या लेखामधून दिलेला आहे. याच लेखाचा उत्तरार्ध नंतरच्या 'स्मृती आणि गौरव' या लेखामध्ये आहे.

'व्यक्ती स्वतःबद्दल लिहितो, तेव्हा विसंगतीचं अंतर कमी असेल, तर तो मनुष्य पारदर्शी समजावा.' या कसोटीवर तर्कतीर्थ पारदर्शी होते, असं मला वाटतं. त्यांच्या मुलाने, सुनेने, नातीने, मित्रांनी आणि सहकाऱ्यांनी लिहिलेले तर्कतीर्थ आणि तर्कतीर्थांनी स्वतःबद्दल सांगितलेलं यामध्ये फार कमी अंतर दिसेल. त्यांनी अनेक भाषांतरे केलेली आहेत. प्रवासवर्णनं लिहिली आहेत. पण प्रवासवर्णन म्हणजे 'आयफेल टॉवरवरून मला पॅरिस कसा दिसला' हे लिहिलेलं नाही; तर पॅरिसची संस्कृती कशी दिसली, रशियामध्ये धर्म परिषदेला गेल्यावर तिथलं शिक्षण कसं दिसतं याबद्दल लिहिलेलं आहे. त्यांना रशियामध्ये असं विचारण्यात आलं होतं की, 'तुम्हाला हॉटेलमध्ये राहायला आवडेल की होस्टेलमध्ये?' ते म्हणाले, 'होस्टेलमध्ये.' होस्टेलमध्ये गेल्यावर ते म्हणाले, 'मला मुलं आणि मुली दोन्ही सेक्शन्समध्ये जाण्याची परवानगी द्यावी.' त्या काळामध्ये मुला-मुलींची होस्टेल्स स्वतंत्र होती. तर्कतीर्थांनी असं सांगितल्यानंतर रशियाने होस्टेलमधील भिंती काढल्या आणि मुला-मुलींना कॉमन ॲक्सेस दिला. एक माणूस छोट्या छोट्या सूचना करून कसा क्रांती करू शकतो याचा वस्तुपाठ म्हणूनही तर्कतीर्थांकडे पाहिलं पाहिजे.

तर्कतीर्थांच्या ज्ञान मांडणीला झागोरच्या परिषदेमध्ये standing ovation मिळतं, ज्यात रशियामधील सर्व धर्मशास्त्र पंडित आलेले असतात. हे आपल्या हिंदू धर्मशास्त्राची श्रेष्ठता नि परंपरा तिथे सांगतात. ते ऐकून युरोपियन, रशियन लोकांना असं वाटतं की, भारताचा धर्म हा तत्त्वज्ञानावर उभा आहे. त्याचं छोटं उदाहरण सांगतो. आपण जगाला 'बुद्ध' दिलेला आहे. पण आपण तो सोडून दिलेला आहे. मी भारतीय शिष्टमंडळातून जपानमध्ये, तिथल्या किंकाकुजी नावाच्या जगातल्या मोठ्या बुद्धशिल्पामध्ये गेलो होतो. जगातले सगळे प्रतिनिधी माझ्याबरोबर होते. तिथला भिक्कू – पंडित माझ्याशेजारीच उभा होता. त्याने सहज मला प्रश्न केला की, 'यू आर फ्रॉम?' मी म्हटलं, 'इंडो.' तो म्हटला, 'कम विथ मी.' आणि त्यानं मला एवढ्या सगळ्या लोकांतून गुपचूप नेलं. त्या काष्टशिल्पाला, पुतळ्याभोवती परिक्रमा करणारा एक मार्ग आहे. त्याच्यावर आजपर्यंत दोनच लोक फिरलेले होते. एक जपानचा राजा आणि दुसरा हा भिक्कू आणि तिसरा मी होतो. मी त्यांना विचारलं, 'हा सन्मान तुम्ही मला का दिलात?' यावर त्याने दिलेलं उत्तर फार महत्त्वाचं आहे – 'You have given Budha to us!' आपण हे समजून घेतलं पाहिजे की, भारताचं सर्व वैभव प्राचीन वाङ्मयात आहे. वेद म्हणजे कालबाह्य, अशा प्रकारे जे लोक आपल्या प्राचीन वाङ्मयाकडे बघतात; त्याकडेही आपण नव्या शास्त्राने, नव्या विचाराने बघितलं पाहिजे. हे आकलन तर्कतीर्थांचे लेख देतात.

**प्रश्न** : खंड क्रमांक दहा आणि अकरा हे दोन्ही पुस्तकांशी संबंधित आहेत. दहाव्या खंडात तर्कतीर्थांनी वेगवेगळ्या लोकांच्या पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना आहेत. अकराव्या खंडामध्ये वेगवेगळ्या पुस्तकांचे लहान-मोठे परिचय किंवा परीक्षणं आहेत. प्रस्तावना लिहितानाचे आणि परिचय करून देतानाचे तर्कतीर्थ, या दोन्हींमध्ये तुम्हाला काहीतरी फरक आणि साम्य जाणवलं असेल?

– एक फार मोठा फरक तर्कतीर्थांनी आपल्या

जीवनामध्ये पाळला. त्यांचे सहकारी, सन्मित्र असे सांगतात की, तर्कतीर्थ दोन गोष्टींना कधी नकार द्यायचे नाहीत – भाषणाचं निमंत्रण आणि प्रस्तावना लेखन. अलीकडे थोरा–मोठ्यांना प्रस्तावना लिहा म्हटल्यावर अनेकांचे अनेक संवाद ऐकतो की, 'मी व्यापात आहे, मला जमणार नाही. मला अनेक महिने, दिवस लागतील.' तर्कतीर्थांनी अशा सबबी कधीच सांगितल्या नाहीत. नैमित्तिक कामं करत त्यांनी साहित्य संस्कृती मंडळाच्या पावणे दोनशे पुस्तकांच्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. जवळपास तितक्याच प्रस्तावना त्यांनी इतरांच्या पुस्तकांना लिहिलेल्या आहेत. सगळ्याच मी मिळवू शकलो नाही, पण अधिकाधिक प्रस्तावना देण्याचा प्रयत्न केला आहे.

पुस्तक परीक्षणांच्या बाबतीत मात्र ते चोखंदळ होते. ते म्हणायचे की, 'समीक्षा माणसाने तेव्हाच लिहावी, जेव्हा ते पुस्तक तुम्हाला हृदयस्पर्शी वाटतं.' 'तृणपर्णे' नावाच्या पुस्तकात वॉल्ट विटमनचं एक आशयसमृद्ध वाक्य आहे – 'Who touches the book, touches the heart.' ही कसोटी पाळून तर्कतीर्थांनी लिहिलेली केवळ तीस पुस्तक परीक्षणं किंवा समीक्षा आहेत. ज्याला आपण मराठीचं अभिजात साहित्य म्हणू, अशा पुस्तकांची समीक्षा त्यांनी केलेली आहे. त्यांची वाचनाची बैठक अत्यंत विचारपूर्वक, समाधीस्त असायची. त्याचं एक छोटं उदाहरण सांगतो. त्यांच्या कन्येचं लग्न होतं. मांडवात कन्यादान झालं आणि तर्कतीर्थ आत वधूच्या खोलीमध्ये जाऊन लिहित बसलेले होते. त्यांचे सेक्रेटरी येऊन म्हणतात, 'हे जरा अतिच झालं असं वाटत नाही का तुम्हाला?' तर ते म्हणाले, 'अति झाल्यामुळेच मी काहीतरी करू शकलो. आता कन्यादान झालं. बापाचं काम काय उरलं? माझा कार्यभाग संपलेला आहे. पंगती तुम्ही वाढा. माझी पंगत सुरू आहे.'

आपली पंगत काय आहे हे माणसाला कळायला पाहिजे. या दोन्हींमध्ये एकीकडे सर्वसामान्यांचा आदर आणि दुसरीकडे अभिजाततेचा गौरव या दोन खंडांमध्ये झालेला आहे.

**प्रश्न** : बारावा खंड, सर्वसामान्य सोडाच, मराठीतल्या चांगल्या वाचकांनाही डोक्यावरून जाणारा वाटेल. त्या खंडात संस्कृत आणि मराठी या दोन्हीतील प्रबंध आणि चरित्रे आहेत. मात्र ती चरित्रं रूढ अर्थाने असतात तशी नाहीत. तर या अवघड खंडाबद्दल लोकांचं कुतूहल शमेल व वाढेल असं काय सांगता येईल?

– तर्कतीर्थांनी जे संस्कृत प्रबंध लिहिलेत, त्यातील एकाचं नाव आहे, 'अस्पृश्यता मीमांसा.' ज्याचा आपण पूर्वी उल्लेख केला आहे. दुसरा आहे, 'सर्वधर्मसमीक्षा' आणि 'शुद्धीसर्वस्वम्'. शुद्धीसर्वस्वम्मध्येही प्रायश्चित्त विधान आहे. या प्रबंधामध्ये त्यांनी धर्माला उदार करण्याचा प्रयत्न केलाय. पूर्वी आपल्याकडे कर्मकांडे, कर्मफल होतं. पुनर्जन्माची धारणा होती, रूढी होत्या, रीती होत्या. यांचं एक वर्तमानकालीन आकलन त्यांना होतं. ते म्हणायचे, 'ठीक आहे, आपण परंपरेच्या आधाराने कुणाला पतित मानतो, कुणाला पापी मानतो; पण ज्यांना पापी किंवा पतित मानलंय, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात घेण्याचं विधान धर्मशास्त्राने दिलंय ते म्हणजे प्रायश्चित्त. पण ते प्रायश्चित्त रोगापेक्षा इलाज भयंकर अशा स्वरूपाचं आहे, ते सुसह्य कसं होईल? नुसतं सुसह्य नाही, तर ते कालसंगत कसं होईल, असं आपण पाहिलं पाहिजे. एक तर पतित मनुष्य बहिष्कृत असतो – उदाहरणार्थ, विधवेला कुंकू लावायचं नाही. एवढ्या छोट्या गोष्टीने तिच्या मनावर उठणारे ओरखडे कमी करायचे असतील, तर तुम्ही तुमच्या परंपरा आणि प्रायश्चित्तं उदार व माफक केली पाहिजेत. तुम्ही आजन्म प्रायश्चित्त सांगता म्हणजे ती व्यक्ती आजन्म पतितच राहणार. आजन्मच्या ऐवजी वर्षावर या, दोन वर्षांवर या. तर पतितता संपेल. पतितता संपवणं हा जर प्रायश्चित्ताचा उद्देश असेल, तर प्रायश्चित्तं ही संक्षिप्त असली पाहिजेत.

त्यांनी मराठीमध्ये 1928–30 च्या दरम्यान 'आनंदमीमांसा' आणि 'जडवाद' असे आणखी दोन प्रबंध लिहिलेले आहेत. 'आनंदमीमांसा' भारतीय दर्शनाला छेद देणारा आहे. भारतीय दर्शनाचं वर्णन समीक्षक 'दुःख दर्शन' असं करतात. उदा. बौद्ध दर्शन, जैन दर्शन किंवा सांख्य दर्शन घ्या. सगळ्या दर्शनांमध्ये दुःख आहे, मोक्ष आहे आणि दुःखातून मोक्षाकडे असा सारा प्रवास आहे. त्यांनी 'आनंदमीमांसा'मध्ये असं सांगितलंय की, 'दुःख कवटाळून मोक्षाची साधना करण्यापेक्षा आनंद कवटाळून जीवन साधना करा, म्हणजे जीवन अधिक समृद्ध होईल. कुणी बघितलाय स्वर्ग आणि नरक? वर्तमानात जगा आणि आनंदी जगा.'

याचा अर्थ चंगळवादी व्हा, असं ते अजिबात सांगत नाहीत. आनंदालाही एक सौजन्य आणि सौंदर्य असलं पाहिजे. याचं सुंदर वर्णन त्यात आहे. ज्यांना कुणाला वर्तमानात हरवलेला आनंद मिळवायचा असेल, त्यांनी आनंद मीमांसा वाचावी. ज्यांना कुणाला ईश्वर आहे की नाही हे समजून घ्यायचं आहे, त्यांनी 'जडवाद अर्थात अनिश्वरवाद' प्रबंध सप्रमाण अभ्यासावा.

प्रबंधांचं जसं आहे, तसं चरित्रांचंही आहे. तर्कतीर्थ हे कुणावरही चरित्र लिहित नाहीत. त्यांनी केवळ दोघांची चरित्रे लिहिलेली दिसतात. एक आहेत, त्यांचे गुरू, 'केवलानंद सरस्वती'. त्यांचं संक्षिप्त चरित्र संस्कृतमध्ये आणि मराठीमध्येही तीर्कतीर्थांनी लिहिले आहे. त्याचाही उद्देश माझे गुरू कसे पुरोगामी होते, हे सांगणे हा आहे. त्यामध्ये गुरुभक्ती, अंधभक्ती, गुरुनिष्ठा असं अजिबात दिसणार नाही. सगळ्यात महत्त्वाचं चरित्र आहे 'महात्मा फुलेंचं'. त्यांनी 1947 मध्ये 'ज्योती निबंध' लिहिलेला होता. माझं एक आकलन आहे की, महात्मा जोतिबा फुले यांच्याबद्दल प्रारंभीच्या काळात लेखन करणाऱ्यांपैकी एक तर्कतीर्थ आहेत. 'परंपरेविरुद्ध बंड करणारा पहिला पुरुष' असं त्या निबंधाचं उपशीर्षक आहे. फुले हे किती बंडखोर होते याचं वर्णन त्यांनी केलेलं आहे. तो निबंध लिहिल्यानंतर लोक असं म्हणाले की, 'फुलेंचं हे फारच संक्षिप्त चरित्र झालं, तुम्ही विस्ताराने का लिहित नाही, जेणेकरून फुले आम्हाला आणखी विस्ताराने कळतील.' ते लक्षात ठेवून त्यांनी 1991 मध्ये महात्मा फुल्यांची स्मृती शताब्दी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी येत होती, तेव्हा राष्ट्रीय पुस्तक न्यास (नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया)साठी एक विस्तृत 'ज्योती चरित्र' लिहिलं. हे ज्योती चरित्र आज हिंदीमध्ये, इंग्रजीत आणि मराठीतही उपलब्ध आहे. ज्यांना जोतीबा फुले समजून घ्यायचे आहेत, त्यांनी तर्कतीर्थांचं हे वस्तुनिष्ठ चरित्र अवश्य वाचलं पाहिजे.

**प्रश्न** : तेरावा खंड तुलनेने सोपा आहे. कल्पनेला वाव देणारा, वेगवेगळ्या दिशा दाखवणारा खंड म्हणजे पत्रसंग्रह! तर्कतीर्थांना आलेली आणि त्यांनी इतरांना लिहिलेली पत्रं. स्वाभाविकच, त्या पत्रांचे सर्व संदर्भ आता आपल्याला लागतीलच असं नाही. तुम्ही तुमच्या प्रास्ताविकात, तळटिपांमध्ये शक्य तेवढं दिलं असेल. तर या पत्रसंग्रहाचं, त्यांना आलेली उत्तरं आणि त्यांनी दिलेली उत्तरं याचं वैशिष्ट्य काय आहे?

– तर्कतीर्थांनी कुणाकुणाला पत्रं लिहिली, हे आपण आधी पाहू. महात्मा गांधींना लिहिलेली पत्रं, मोठ्या प्रमाणात यशवंतराव चव्हाण साहेबांना लिहिलेली पत्रं. त्यांनी जो पत्रव्यवहार केला आहे, त्यापैकी अत्यंत प्रातिनिधिक पत्रं या संग्रहात दिलेली आहेत. तर्कतीर्थांचं चरित्र हे संस्था पुरुषाचं चरित्र होतं. हे जर तुम्हाला समजून घ्यायचं असेल, तर यातला संस्थात्मक पत्रव्यवहार पाहिला पाहिजे. यामध्ये प्राज्ञ पाठशाळेचा, धर्मकोशाचा, नवभारतचा, मराठी ग्रंथ संग्रहालयाचा पत्रव्यवहार आहे. रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टीचा, 'क्रेस्ट'चा पत्रव्यवहार आहे. म्हणजे एकीकडे संस्थात्मक पत्रव्यवहार आणि दुसरीकडे व्यक्ती पत्रव्यवहार असं सामंजस्य यात दिसतं. रूढ अर्थाने लोक तर्कतीर्थांना यशवंतराव चव्हाणांचे राजकीय गुरू मानतात. हे वस्तुस्थितीला धरून नाही. हे दोघे एकमेकांचे अत्यंत सुहृद मित्र होते. दोघं एकमेकांना प्रिय या नावानेच पत्र लिहितात. यातून ती राजकीय गुरू असण्याची धारणा संपूर्णपणे संपुष्टात येते. दुसरं, या दोघांमधलं मैत्र इतकं अद्वैत होतं की, ते आपल्या प्रत्येक व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनातील प्रश्नांबद्दल एकमेकांची मतं जाणून घ्यायचे. मी तर असं म्हणेन की, हे दोघं सहचर होते, सहयोगी होते, सहकारीही होते, आणि सहविचारी, सहप्रवासीही होते.

एका पत्राबद्दल एक छोटं उदाहरण सांगेन – आणीबाणीच्या काळात यशवंतराव चव्हाण काँग्रेस पक्ष सोडतात आणि रेड्डी काँग्रेसमध्ये जातात. तुम्हाला माहीत आहे, की प्रत्येक राजकीय पुरुष हा सत्तेवर आणि साधनांवर जगत असतो. यशवंतराव चव्हाण यास अपवाद नव्हते. नंतर त्यांना असं वाटलं की, सत्तेच्या बाहेर राहून आपण फार सामाजिक आणि परिवर्तनाचं काम करू शकणार नाही. तेव्हा तर्कतीर्थांशी विचार विनिमय करून अत्यंत विचारपूर्वक ते इंदिरा काँग्रेसमध्ये परत जातात. इंदिरा गांधींना ते होकाराचं पत्र पाठवतात. इंदिरा गांधी त्यावेळी चढावर होत्या. त्यांनी यशवंतराव चव्हाणांना उत्तर देण्याचं सौजन्यही दाखवलं नाही. पत्र येऊन तीन महिने लोटल्यावर चव्हाण साहेब तर्कतीर्थांना एक खाजगी पत्र लिहितात. (या खंडात काही खाजगी पत्रंही छापली आहेत. ती छापावीत की

नाहीत हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. पण मला वाटतं की, काळ ओसरल्यानंतर आणि व्यक्ती निवर्तल्यानंतर खाजगी आणि सार्वजनिक असं काही राहत नाही. तुम्ही लिखिताकडे जाता, तेव्हा इतिहास दुसरा-तिसरा काय असतो? इतिहास त्याच्या काळामध्ये खाजगी असतो, नंतर तो सार्वजनिक होतो. तसंच पत्र व्यवहारांकडे आपण पाहिलं पाहिजे.) ते तर्कतीर्थांना प्रश्न विचारतात, ‘आता काय करावे?’ तर्कतीर्थ तितक्याच निखळपणे त्यांना उत्तर देतात. ‘दार ठोठावले ना, उघडेपर्यंत अंगणात बसावे. नाही तरी महाराष्ट्राची हवा समशीतोष्ण आहे, बाधणार नाही.’ मला असं वाटतं की, सूचकतेमध्ये जे सौंदर्य भरलेलं असतं, ते तर्कतीर्थांच्या प्रत्येक पत्रामध्ये तुम्हाला दिसेल.

या संदर्भात ‘यशवंतराव अद्याप चाचपडतच आहेत,’ अशी एक मुलाखत मुलाखतीच्या खंडात आहे. कालखंड हाच आहे. त्यात इंदिरा गांधींबद्दलही त्यांनी

*तर्कतीर्थ आणि त्यांचे गुरू केवलानंद सरस्वती यांनी ‘तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद’ स्थापन केली होती. नंतर तिचं नाव त्यांनी ‘धर्म निर्णय मंडळ’ असं केलं. त्यातून धर्मकोशाची निर्मिती झाली. या दोघांनी त्या काळामध्ये भारतभरातून पन्नास हजार पोथ्या संकलित केल्या होत्या, यातून एखादा माणूस किती व्यासंगी असावा हे कळते. आजही त्या पोथ्या प्राज्ञ पाठशाळेमध्ये जिज्ञासूंना पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. यातील फक्त अकरा हजार पोथ्यांचं वर्णन आहे. वर्णन पंधरा रकान्यांमध्ये आहे. ते रकाने पाहिले, तरी तर्कतीर्थांनी किती कष्ट केलेत हे कळेल.*

















खूप स्पष्टपणे विधाने केलीत, ती फारच इंटरेस्टिंग आहेत. इंदिरा गांधींशी तर्कतीर्थांचं फार सख्य होतं, असंही तुम्हाला दिसेल.

**प्रश्न** : चौदाव्या आणि पंधराव्या खंडात वाचकांना अजिबात रस वाटणार नाही. मात्र ते नजरेखालून घातले, तर कोणताही वाचक स्तिमित होईल. ते दोन खंड म्हणजे संस्कृत हस्तलिखितांची व ग्रंथांची केलेली विवरणात्मक सूची. त्या पोथ्या आणि अन्य हस्तलिखितं आणि त्याची सूची त्याबद्दल थोडक्यात सांगता येईल का?

– आपलं सगळं वैभव म्हणजे साहित्य, भाषा, संस्कृती याचं सगळं सौंदर्य आणि त्याचा तत्कालीन इतिहास कुणाला शोधायचा असेल, तर त्यासाठी उत्तम साधन म्हणजे त्या त्या काळची हस्तलिखितं. शिवाजी महाराजांबद्दल आज आपण इतका आदरपूर्वक उल्लेख करतो, पण त्या काळातील कागदपत्रं नसती तर छत्रपती शिवाजी महाराजांनी लोक कल्याणाचे केलेले कार्य, आपल्यासमोर आलं नसतं. तसंच आपली संस्कृती विकसित कशी झाली, हे पाहायचं असेल, तर तत्कालीन हस्तलिखितं पाहिली पाहिजेत.

तर्कतीर्थ आणि त्यांचे गुरू केवलानंद सरस्वती यांनी 'तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद' स्थापन केली होती. नंतर तिचं नाव त्यांनी 'धर्म निर्णय मंडळ' असं केलं. त्यातून धर्मकोशाची निर्मिती झाली. या दोघांनी त्या काळामध्ये भारतभरातून पन्नास हजार पोथ्या संकलित केल्या होत्या, यातून एखादा माणूस किती व्यासंगी असावा हे कळते. आजही त्या पोथ्या प्राज्ञ पाठशाळेमध्ये जिज्ञासूंना पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. यातील फक्त अकरा हजार पोथ्यांचं वर्णन आहे. वर्णन पंधरा रकान्यांमध्ये आहे. ते रकाने पाहिले, तरी तर्कतीर्थांनी किती कष्ट केलेत हे कळेल. कुणाकुणाच्या पोथ्या आहेत – बृहस्पतीची, कौटिल्यची, व्यासांची, वाल्मिकींची अशा अनेकांच्या आहेत. कित्ता करण्याची एक मोठी पद्धत धर्मशास्त्रामध्ये आहे. कित्ता करणे म्हणजे पूर्व साहित्य उतरून काढणे. ते लिहून काढत असताना पोथी लेखक किंवा हस्तलिखित लेखकाचे नाव, त्या काळची वर्णने आहेत. आपण सगळ्यांनी वर्तमानात अभ्यास करताना ती समजून घेतली पाहिजेत. मी त्याविषयी प्रस्तावनेत विस्ताराने लिहिलंय की, पोथी लिहिणारा काय काय करायचा, तो कागद तयार करायचा, तो शाई तयार करायचा, तो चित्र काढायचा, तो कॅलीग्राफी सुंदर हस्ताक्षरात लिहायचा. असा माणूसच पोथी लिहू शकायचा. ऐरागैरा पोथी लिहायचा नाही. पोथ्या नुसत्या बघितल्या, तरी अक्षरांची वळणं तुम्हाला कळतील. पूर्वी ज्या 64 कला आपल्याकडे सांगितल्या जातात, त्यातील एक लेखनकला आहे. या लोकांसाठी ती कला असं म्हटलं गेलंय. तुम्ही आम्ही जे करतो, ती कला नाही. आपण उपरे कलाकार आहोत, कट-पेस्ट करणारे लोक आहोत. त्यांनी केलेलं काम हे खरं काम आहे.

दुसरा रकाना आहे शीर्षकाचा – पोथीचं शीर्षक, तिसरा रकाना आहे – लेखकाचा, चौथा रकाना आहे – भाष्यकाराचे म्हणजे पोथीची समीक्षा करणाऱ्याचे नाव. कोणतं भाष्य केलं त्याचं नाव – म्हणजे शंकर भाष्य असेल तर त्याचं वर्णन. पोथीचा आकार सेंमीमध्ये आहे. नंतर पृष्ठ संख्या आहे. पृष्ठावरच्या ओळी आहेत. ओळीतली अक्षरं आहेत. असा तेरा हजार पोथ्यांचा इतिहास आहे. त्याची लिपी, त्याचा काळ, त्याची स्थिती, त्याचं माध्यम, (चामड्यावर लिहिलंय, कागदावर/कापडावर लिहिलंय, भुर्जपत्रावर लिहिलंय.) पोथीची सद्यःस्थिती (आता ते जीर्ण आहे का सुरक्षित आहे, सुस्थितीत आहे इथपर्यंत). पुढे एक शेष रकाना आहे, त्यामध्ये त्या पोथीचं वैशिष्ट्य, या पोथीचं हे विवरण का दिलेलं आहे याबद्दल लिहिलं आहे.

ह्या पन्नास हजार पोथ्यांचा अभ्यास हा वर्तमानातील इंडोलॉजीचा अभ्यास नाही का? वर्तमानामध्ये हिंदू धर्म आणि हिंदू धर्मशास्त्र यांबद्दल फार गांभीर्याने विचार होतो, असं सांगितलं जातं. हे सगळं बघितल्यावर आपल्या गांभीर्याची पातळीपण जिज्ञासूंच्या लक्षात यावी. कष्टसाध्य असे हे खंड आहेत. म्हणूनच म्हटलं, की हे दोन खंड आपल्याला वाचनात फार पुढे घेऊन जाणार नाहीत, पण स्तिमित होण्यासाठी प्रचंड उपयुक्त आहेत.

**प्रश्न** : सोळावा खंड अनेक लोकांना सुखद आश्चर्याचा धक्का देणारा, पहिल्यांदाच आम्ही हे ऐकलंय असं म्हणायला लावणारा आहे. तो म्हणजे भारतीय संविधानाच्या पहिल्या प्रारूपाचं संस्कृतमध्ये पहिलं भाषांतर (1952) करण्यामध्ये लक्ष्मण शास्त्री

कसे होते आणि ते भाषांतर याबद्दल थोडं सांगा.

– आपल्याला माहीत आहे, की भारताची राज्यघटना बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली तयार झाली 1949 ला, त्याच्या आठव्या परिशिष्टामध्ये असं लिहिलं होतं की, 14 भाषा या राज्यभाषा/प्रांतभाषा असतील. घटनेमध्ये अशी तरतूद होती की, तयार होणाऱ्या घटनेचं या भाषांमध्ये भाषांतर केलं जावं. 1950–52 च्या दरम्यान 13 भाषांचे भाषांतरकार मिळाले. संस्कृतमध्ये भाषांतर करायला मिळाले नाहीत. राजेंद्र प्रसाद त्यावेळी राष्ट्रपती होते आणि दादा मावळणकर सभापती होते. महात्मा गांधींमुळे या दोघांनाही तर्कतीर्थांचा संस्कृतचा व्यासंग माहीत होता. राजेंद्र प्रसादांनी मावळणकरांमार्फत तर्कतीर्थांना अडचण सांगितली. मग तर्कतीर्थांनी तीन चतुर्थांश आणि मंगलदेव शास्त्रींनी एक चतुर्थांश असं भाषांतर केलं.

हजारो वर्षांपूर्वीची संस्कृत भाषा आणि 1952 ची भारतीय राज्यघटना. 1952 च्या वर्तमान जीवनामध्ये कितीतरी गोष्टी अशा होत्या की, त्या प्राचीन काळात नव्हत्याच. त्या काळात इंजिनिअर, शिल्पी, काष्ठशिल्पी वगैरे असतील; पण अभियांत्रिकी नावाची विद्याशाखा नव्हती. तर्कतीर्थांच्या पुढे प्रश्न असा आला की, याचं संस्कृत संज्ञापन कसं करायचं? ते सगळ्या ज्ञान व्यवहारांमध्ये अत्यंत व्यवहारी गृहस्थ होते. त्यांनी पाहिलं की, हिंदीमध्ये केलेली जी भाषांतरे आहेत, ती वर्तमानाच्या प्रमाणाकडे जवळपास जाणारी आहेत. तो आदर्श मानून त्यांनी संस्कृतमध्ये त्याला पर्यायी आणि समांतर असे नवे शब्द तयार केले आणि भाषांतर केलं. हे भाषांतर नऊ जणांच्या विद्वत समितीपुढे मान्यतेसाठी आलं. त्यामध्ये भारतरत्न होते, आंतरराष्ट्रीय भाषा वैज्ञानिक होते आणि राष्ट्रीय संस्कृत पंडित होते. या नऊ जणांनी 22 दिवस कलमवार वाचन करून, फारसा बदल न करता मंजूर केलं. एखाद्याची प्रज्ञा अशी असते!

मग सरकारपुढे एक नवाच प्रश्न निर्माण झाला की, हे छापायचं कुठे? या काळात वाराणसी सोडून कुठेच संस्कृत टाक नव्हता. टाक म्हणजे फॉन्ट, खिळे. तर्कतीर्थांना त्यांनी सांगितलं की, 'तुम्ही भाषांतर करून दिलंत, पण मुद्रणाचा प्रश्न आहे.' तर्कतीर्थ म्हणाले, 'मी छापून देतो.' म्हणजे घटनेचे संस्कृत भाषांतर वाईत झालं आणि पहिलं मुद्रणही वाईत झालं. तर्कतीर्थांनी घटनेची केलेली प्रुफ रीडिंगची प्रतही उपलब्ध आहे. माणूस किती व्यासंगी आणि किती कष्टपूर्वक एखादं काम करतो. समर्पण नावाची गोष्ट म्हणजे तर्कतीर्थ!

**प्रश्न** : खंड क्रमांक 17 आणि 18 दोन्हींच्या संदर्भात तुम्हाला एकाच प्रश्नामध्ये उत्तर देता येईल. सतरावा खंड हा तर्कतीर्थांवर लिहिले गेलेल्या लेखांचा आहे. यामध्ये स्मृतिलेख, गौरवपर लेख, श्रद्धांजली लेख असतील. अठराव्या खंडात त्यांच्या लेखनाची, त्यांच्या साहित्याची वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंतांनी केलेली समीक्षा आहे. या दोन्ही खंडांबद्दल म्हणजे त्यांच्याविषयी, त्यांच्या लेखनाविषयी आणि त्यांच्या विचारांविषयी काय सांगाल?

– या प्रकल्पाने एक नवं परिमाण किंवा नवी परंपरा निर्माण केली, असं मला वाटतं. आजवर महाराष्ट्रामध्ये मराठीमध्ये जे समग्र वाङ्मयीन प्रकल्प झाले, ज्याला आपण प्युअर टेक्स्ट म्हणतो, त्यावरच काम झालेलं आहे. Textual criticism वर आजपर्यंत काम झालेलं नाही. हा महाराष्ट्रातला पहिला प्रकल्प आहे, जो textual criticism वर काम करतो. भाषणं, मुलाखती, ग्रंथ, भाषांतरे अशा अनेक अंगांनी लोकांनी लिहिलेलं आहे आणि ते जवळजवळ एका शतकभराच्या कालखंडातील लेख आहेत. त्यामध्ये ते साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होतात म्हणून गौरव आहे, त्याच वेळी 'वाया गेलेला विद्वान' असं एक गृहस्थ त्यांच्याविषयी लिहितो. समकालामध्ये एकीकडे प्रशंसा आहे, तर दुसरीकडे कुत्सिततासुद्धा त्यांनी भोगलेली आहे. पण ते कधी विचलित झालेत असं मला दिसत नाही. त्यांचं गुणवैशिष्ट्यं असं होतं की, जे लोक त्यांच्यावर टीका करायचे, त्यांना ते अत्यंत उदारपणे आणि कठोरपणे पुराव्यानिशी उत्तर द्यायचे. समोरच्याला पुराव्यानिशी नामोहरम करण्याची विद्वत कला त्यांनी विकसित केली होती. मला वाटतं, ती त्यांनी ज्ञान तपस्येतून निर्माण केलेली होती.

या दोन खंडांमध्ये समीक्षा खंड घेतला, तर साहित्यसम्राट न. चिं. केळकरांपासून ते विद्यमान समीक्षकांपर्यंत वेळोवेळी ज्या ज्या लोकांनी समीक्षा केल्या, त्या सर्वांचा समावेश यामध्ये आहे. गौरव आणि स्मृती लेखांमध्ये नातीनेही आजोबांबद्दल लिहिलेलं आहे, मुलाने वडिलाबद्दल लिहिलं

आहे. तर्कतीर्थांनी आपल्या मित्रांबद्दल लिहिलंय. सहकाऱ्यांबद्दल लिहिलंय, सहकाऱ्यांनी तर्कतीर्थांच्या वेगवेगळ्या अंगांबद्दल लिहिलंय. म्हणजे 'तर्कतीर्थ : शास्त्र आणि शस्त्र' या नावाचा एक लेख यशवंतराव चव्हाणांनी लिहिलेला आहे. ते तर्कतीर्थांची भाषणं वाचून स्वातंत्र्यलढ्यात उतरले. त्याची आठवण त्यांनी लिहिली, "कृष्णेच्या काठावर हा पंडित सलग आठ दिवस भाषणं देतो. भाषण देताना आम्हा सगळ्या तरुणांना असं सांगतो, की आजवर मी माझ्या गुरूकडे शास्त्र शिकलो, मला आता इथून पुढे त्या शास्त्रांचे रूपांतर शस्त्रात करायचे आहे." त्यांनी असं लिहिलंय की, 'त्या एका वाक्याने माझा कायाकल्प झाला आणि मी माझ्या शाळेच्या झाडावर जाऊन तिरंगा झेंडा फडकवला.' ते अवघ्या सोळाव्या वर्षी तुरुंगात गेले. म्हणून कदाचित 'कृष्णाकाठ'ची समीक्षा तर्कतीर्थांना लिहावीशी वाटली असेल.

माणसाची घडण समजून घ्यायला हे दोन खंड उपयुक्त आहेत. मला असं वाटतं की, टेक्स्ट किंवा संहिता तुम्ही देत असताना समीक्षेसह संहिता दिली, तर त्या संहितेला एक काळाची चौकट, काळाची मेघडंबरी निर्माण होते आणि मग वर्तमानाला त्याची पुनः समीक्षा करण्याची प्रेरणा मिळते. मला असं वाटतं, हे खंड आल्यानंतर नवे समीक्षक नव्या विचारांनी तर्कतीर्थांकडे बघायला लागतील.

**प्रश्न :** हे खंड लवकरच साहित्य संस्कृती मंडळाकडून प्रकाशित होतील, लोकांपर्यंत जातील. मला पूर्ण खात्री आहे, की केवळ सामान्य वाचकच नाही; तर अभ्यासक, संशोधक यांना अनेक वाटा खुल्या होतील. यांचा आधार घेऊन लोक कितीतरी ज्ञानाची क्षेत्रं धुंडाळतील. याचा आधार घेऊन संशोधनाचे अनेक प्रकल्प पुढे येतील का?

– तर्कतीर्थ 1994 मध्ये गेले. आज 2024 मध्ये आपण विचार करीत आहोत. मधल्या तीस वर्षांच्या काळात आणि खरं म्हणजे ते जिवंत असतानाच्या काळातही आपल्याकडे संशोधन हे विचार व्यवहारात फार कमी होतं. तर्कतीर्थांवर महाराष्ट्रामध्ये अपवादात्मक पीएचडी झालेल्या आहेत. त्या हातांच्या बोटांपेक्षा कमी आहेत. या प्रकल्पाच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये नवसंशोधन, पुनर्व्याख्या व्हाव्यात. तसे झाले, तर मराठी अभिजाततेकडे जाईल.

**प्रश्न :** ज्यांना एकूण पीएचडीच्या अभ्यासाचं स्वरूप माहीत आहे अशा कुणीही हे सर्व खंड तास-दोन तास नजरेखालून घातले तरी ते खात्रीने सांगतील की, 'शंभराहून अधिक पीएचडी करण्याइतका ऐवज, इतक्या वाटा पुरवण्याची क्षमता या अठरा खंडांमध्ये आहे.' सगळे खंड संशोधनाच्या शिस्तीत सादर केलेले आहेत. तो तर सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. तर्कतीर्थांच्या एकूण कामाची व्याप्ती, खोली, पद्धती ही तर यातून कळतेच, परंतु सुनीलकुमार लवटे यांनी केलेलं संपादन यासाठीही हे सर्व खंड आवर्जून पाहावेत. संपादनाचे सगळे निकष, मांडणी, सादरीकरण, तळटिपा, प्रस्तावना, मागचे-पुढचे संदर्भ हे सगळं ज्या अचूक पद्धतीने केलं आहे की; अशा प्रकल्पाचं संपादन कसं करावं याचं हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

– या प्रकल्पाच्या शेवटी मला न मिळालेले अप्राप्त संदर्भही दिलेत, जेणेकरून नव्या पिढीने ते मिळवावेत. याचं नाव समग्र असलं, तरी ते संदर्भ जोपर्यंत मिळणार नाहीत, तोपर्यंत हा समग्र वाङ्मय प्रकल्प पूर्ण होणार नाही. तो नव्या पिढीने करावा असं या निमित्ताने मी आवाहन करतो.

**प्रश्न :** या अठरा खंडांचा परिचय देणारी पुस्तिका आहे, त्यात समारोपाच्या भागात तर्कतीर्थांचं सचित्र आणि वस्तुनिष्ठ असं एखादं चरित्र लिहिण्याचा संकल्प तुम्ही सोडलेला आहे. आम्ही तुम्हाला शुभेच्छा देतो की, हा संकल्प तुमच्याकडूनच सिद्ध व्हावा.

– इतके संदर्भ मला मिळाले आहेत की ते जर मी माझ्याकडेच ठेवले, तर योग्य होणार नाही. त्याचा योग्य वापर करून एक सचित्र विस्तृत चरित्र लिहिण्याचा विचार आहे. हे चरित्र एक हजार पानांचं तरी नक्की होईल....

**सुनीलकुमार लवटे,** कोल्हापूर
drsklawate@gmail.com
Mob 9881250093

(ही दोन भागांतील व्हिडिओ मुलाखत weeklysadhana या युट्यूब चॅनलवर पाहता ऐकता येईल. पहिला भाग 1 तास 15 मिनिटे, तर दुसरा भाग 1 तास 5 मिनिटे.)













## फेब्रुवारी व मार्च २०२४ मध्ये साधनाकडून आलेल्या ऐवज या व्हिडिओ मालिकेतील मुलाखती

साधना साप्ताहिक, साधना प्रकाशन व कर्तव्य साधना या तिन्हींच्या वतीने अधूनमधून काही व्हिडिओ तयार करून प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया मागील तीन वर्षे चालू राहिली आहे. मात्र आता व्हिडिओ विभाग अधिक कार्यक्षम करण्याचे ठरवले आहे. त्या प्रक्रियेचा भाग म्हणून मागील दोन महिन्यांत आलेल्या व्हिडिओ मुलाखती साधना साप्ताहिकाच्या यूट्युब चॅनलवर आहेत.

१. **मिलिंद बोकील** यांची त्यांच्या
ललित साहित्याच्या संदर्भात घेतलेली मुलाखत
संवादक : रेखा इनामदार-साने

२. **मिलिंद बोकील** यांची त्यांच्या
ललित वैचारिक साहित्याच्या संदर्भात घेतलेली मुलाखत
संवादक : विनोद शिरसाठ

३. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकल्पाचे
संपादक **सुनीलकुमार लवटे** यांची मुलाखत (भाग १ व २)
संवादक : विनोद शिरसाठ

४. 'अंतर्नाद'चे संपादक **भानू काळे**
यांची मुलाखत (भाग १ व २), संवादक : विनोद शिरसाठ

५. 'ऋतुरंग'चे संपादक **अरुण शेवते** यांची मुलाखत
संवादक : विनोद शिरसाठ

६. 'दिशा स्वराज्याची'चे दिग्दर्शक
**वीरेंद्र वळसंगकर** यांची मुलाखत । संवादक : विनोद शिरसाठ

७. संवेदना वृद्ध सेवाकेंद्राचे संचालक
**दिलीप शिंदे** यांची मुलाखत । संवादक : विनोद शिरसाठ

**साधना साप्ताहिक**
४३१ शनिवार पेठ, पुणे ३० Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
weeklysadhana@gmail.com




# फेब्रुवारी आणि मार्च २०२४ या दोन महिन्यांत Kindle वर दाखल झाली साधना प्रकाशनाची चाळीस E-books

१. मागील तीन वर्षांपासून साधना प्रकाशनाची उपलब्ध सर्व पुस्तके E-book स्वरूपात तयार करून Kindle वर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया चालू आहे. जानेवारी २०२४ अखेर साधना प्रकाशनाची उपलब्ध सर्व २०० छापील पुस्तके E-book स्वरूपात Kindle वर उपलब्ध करून दिलेली आहेत.

२. गेली अनेक वर्षे आऊट ऑफ प्रिंट असलेली साधना प्रकाशनाची २० पुस्तके, फेब्रुवारी व मार्च २०२४ या दोन महिन्यांत E-book स्वरूपात Kindle वर आणली आहेत (शेजारील मुखपृष्ठे त्यातील काही पुस्तकांची आहेत.) ही पुस्तके सध्या तरी फक्त E-book स्वरूपात उपलब्ध करून दिली आहेत, यथावकाश ती छापील स्वरूपात टप्प्याटप्प्याने येतील.

३. विश्वनाथ खैरे यांची फार पूर्वी साधना प्रकाशनाने व अन्य प्रकाशनांनी प्रकाशित केलेली आणि त्यांनी स्वतः प्रकाशित केलेली, लहान-मोठी अशी वीस पुस्तके आहेत. ती सर्व पुस्तके आता साधना प्रकाशनाने E-book स्वरूपात आणली असून Kindle वर उपलब्ध करून दिली आहेत. त्यातील १२ पुस्तकांच्या थोड्या प्रती छापील स्वरूपात साधना मीडिया सेंटर मध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

४. साधना साप्ताहिकाने मागील दशक भरात प्रकाशित केलेले विशेष महत्त्वाचे असे ५० विशेषांक डिसेंबर २०२३ मध्येच स्वरूपात उपलब्ध करून दिलेले आहेत. आगामी सहा वर्षभरात २०१० पूर्वीचे विशेषांक स्वरूपात क्रमाक्रमाने उपलब्ध करून देणार आहोत.

५. साधना प्रकाशनाची दीर्घकाळ आऊट ऑफ प्रिंट असलेली आणखी काही पुस्तके आगामी वर्षभरात क्रमाक्रमाने E-book स्वरूपात येत राहतील.

अधिक माहितीसाठी संपर्क

**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
sadhana.prakashan@gmail.com


Date of Posting : 25-3-2024

# फेब्रुवारी व मार्च २०२४ मध्ये Storytel वर दाखल झालेली साधना प्रकाशनाची पाच audio books




मागील तीन वर्षांपासून साधना प्रकाशनाची पुस्तके आणि कॅप्सुल्स (लेख, गोष्टी) ऑडिओ बुक स्वरूपात तयार करून, Storytel वर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया चालू आहे. जानेवारी २०२४ पर्यंत ४० पुस्तके व ४० कॅप्सुल्स असा २०० हून अधिक तासांचा ऐवज ऑडिओ बुक स्वरूपात Storytel वर उपलब्ध करून दिलेला आहे.

फेब्रुवारी व मार्च २०२४ मध्ये साधना प्रकाशनाची पाच पुस्तके ऑडिओ बुक स्वरूपात Storytel वर उपलब्ध करून देत आहोत.

**१. टॉलस्टॉय यांच्याशी पत्रसंवाद** (वेळ ५ तास)
लेखक : ग. प्र. प्रधान । वाचन : गौरी देशपांडे

**२. मी भरून पावले आहे** (वेळ १० तास)
लेखिका : मेहरुन्निसा दलवाई । वाचक : गौरी देशपांडे

**३. असेही विद्वान** (वेळ ५ तास)
लेखक : प्रभाकर पाध्ये
वाचन : गजानन परांजपे

**४. सणांचे कुळ उत्सवांचे मूळ** (वेळ ५ तास)
लेखिका : सुमन ओक । वाचन : शीतल जोशी

**५. साने गुरुजींची जीवनगाथा** (वेळ ३० तास)
लेखक : राजा मंगळवेढेकर । वाचन : गौरी देशपांडे
(हे ऑडिओ बुक मोठे असल्याने चार भागांत क्रमाक्रमाने Storytel वर येत आहे.)














**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
sadhana.prakashan@gmail.com

# फेब्रुवारी व मार्च २०२४ मध्ये आले, साधना साप्ताहिकातील विशेष महत्वाच्या लेखांचे/ मुलाखतींचे इंग्रजी अनुवाद



साधना साप्ताहिकातील काही लेखन विशेषतः विशेषांकांमधील असे असते जे, प्रामुख्याने इंग्रजी वाचणाऱ्या मराठी माणसांना वाचायला आवडते आणि अर्थातच मराठी व महाराष्ट्र यात विशेष रस असलेल्या अमराठी वाचकांनाही वाचायला आवडते. हे लक्षात घेऊन आम्ही अधूनमधून काही मराठी लेखांचे इंग्रजी अनुवाद करून कर्तव्यवर प्रसिद्ध करीत होतो. मात्र आता ते प्रमाण वाढवत आहोत आणि त्यात सातत्यही आणणार आहोत. त्याच प्रक्रियेचा भाग म्हणून मागील दोन महिन्यांत महत्त्वाच्या लेखांचे इंग्रजी अनुवाद करून घेतले आहेत.





१. 'श्यामची आई' सिनेमात श्यामच्या आईची भूमिका करणारी गौरी देशपांडे, सिनेमाचे दिग्दर्शक सुजय डहाके, पटकथा लेखक सुनील सुकथनकर यांच्या मुलाखती. (अनुवाद : ऋचा मुळे, मेघना कावळे)

२. कस्तुरी या सिनेमाचे दिग्दर्शक विनोद कांबळे आणि त्यातील दोन बालकलाकार समर्थ सोनवणे व श्रवण उपळे यांच्या मुलाखती. (अनुवाद : मेघना कावळे)



३. या वर्षीच्या युवा अंकातील हर्षदा स्वकुळ व मुख्य दिवाळी अंकातील आनंद मल्लिगवाड यांच्या मुलाखती (अनुवाद : रिमा अमरापूरकर)

४. दिलीप पाडगावकर यांची २०१४ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेली दीर्घ मुलाखत, डॉ अभय बंग यांची वर्धा येथील साहित्य संमेलनात झालेली दीर्घ मुलाखत (अनुवाद : संजय पेंडसे)



५. प्रश्न तुमचा उत्तर दाभोलकरांचे ही विशेष गाजलेली व पुस्तिका रुपात आल्यावर अनेक आवृत्त्या निघालेली दीर्घ मुलाखत (अनुवाद : विलास साळुंके)

६. याशिवाय अन्य काही लेख, मुलाखती आणि संपादकीय लेख.

(हा सर्व ऐवज टप्प्याटप्प्याने कर्तव्य साधनावर प्रसिध्द होत राहील)

**साधना साप्ताहिक**

४३१ शनिवार पेठ, पुणे ३० Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
weeklysadhana@gmail.com


Date of Posting : 25-3-2024

# ‘अंतर्नाद’ सुरू करण्यापूर्वीचा मी
## भानू काळे

संवादक : विनोद शिरसाठ / शब्दांकन : रेणुका कल्पना



‘सांस्कृतिक समृद्धी वाढवणारं मासिक’ अशा ध्येयवाक्यासोबत भानू काळे यांनी ऑगस्ट 1995 मध्ये सुरू केलेलं अंतर्नाद हे मासिक काही काळापूर्वी बंद झालं. साधारण सव्वीस वर्षं या मासिकानं मराठीतील साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात लेखकांच्या, वाचकांच्या आणि वेगवेगळ्या विषयांच्या संदर्भात खूप चांगल्या प्रकारे योगदान दिले. या मासिकाची कहाणी सांगणारं ‘एका मासिकाचा उदयास्त’ हे पुस्तक नुकतंच मौज प्रकाशनाकडून प्रकाशित झालं आहे. त्या निमित्ताने मासिकाचे संपादक भानू काळे यांची घेतलेली ही मुलाखत.

मुलाखतीच्या पूर्वार्धात ‘अंतर्नाद’च्या आधीचे भानू

काळे, त्यांचं वाचक आणि लेखक म्हणून घडत जाणं, प्रिंटिंग प्रेस चालवणं आणि एका इंग्रजी साप्ताहिकाच्या कामात सहभागी होणं असा त्यांच्या वयाच्या साधारण चाळीशीपर्यंतचा कालखंड आला आहे. तर मुलाखतीच्या उत्तरार्धात 'अंतर्नाद'चे संपादक, प्रकाशक आणि मालक या तीन नात्यांभोवतीची चर्चा आहे.

**प्रश्न** : पंडित जवाहरलाल नेहरू यांचा मृत्यू मे 1964 मध्ये झाला, तेव्हा तुमचं वय अकरा होतं. त्यावेळी त्या वयाला साजेसं असं एक हस्तलिखित तुम्ही तयार केलं होतं असं उपरोक्त पुस्तकात तुम्ही नमूद केलं आहे. तिथेच भविष्यात आकाराला आलेल्या किंवा येणाऱ्या मासिकाच्या जन्माचं बीज पडलं असावं अशी एक शक्यताही तुमच्या या पुस्तकात तुम्ही व्यक्त केली आहे. पुढच्या साधारण दहाएक वर्षांत तुमचं शिक्षणही पूर्ण झालं आणि त्यानंतर लगेचच इंदिरा गांधींनी राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली. तर नेहरूंचा मृत्यू ते आणीबाणी, म्हणजे तुमच्या आयुष्यातल्या वयवर्षं 11 ते 21 या काळातलं तुमचं मराठी, इंग्रजी वाचन कसं होतं?

– वाचनातूनच माझ्या मनात लेखनाची उर्मी येत गेली. वाचनाची आवड नसती, तर भविष्यात कधी अंतर्नादसारखं एखादं मासिक सुरू करण्याचं धाडस मी केलं असतं, असं मला अजिबात वाटत नाही. या आवडीला घरातल्या आणि शाळेतल्या वातावरणाची मदत झालीच; पण त्यासाठी माझ्यातली वाचनाबद्दलची ओढ ही सर्वाधिक महत्त्वाची ठरली.

आमची आर्थिक परिस्थिती फार चांगली होती असं नाही. माझे वडील पूर्ण वेळ कामगार चळवळीत, तर आई मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षिका. आम्ही पाच भाऊ. पण तशा आर्थिक ओढगस्तीच्या काळातही आमच्या घरात त्या वेळेला दोन वृत्तपत्रं यायची –एक आचार्य अत्रे यांचं 'दैनिक मराठा' आणि दुसरं, सदानंद यांचं इंग्रजी 'फ्री प्रेस जर्नल'. ही वृत्तपत्रं घरी आली रे आली की, आम्ही त्यावर तुटून पडायचो. जे आपल्याला आवडेल, ते मोठ्याने इतरांना वाचून दाखवायची पद्धतही घरात होती. त्यामुळे साहजिकच जे वाचलं, ते मनावर ठसत गेलं. वृत्तपत्रांपासून सुरू झालेली वाचनाची आवड लगेचच पुस्तकांपर्यंत गेली.

पुस्तकवाचनाची सुरुवात अर्थातच सर्वसामान्य वाचकांप्रमाणेच पंचतंत्र वगैरे वाचून झाली. पण लवकरच मी गंभीर वाचनाकडे वळलो. शाळेत असतानाच 'हिंदू व्यवहारधर्म शास्त्र' यांसारखी पुस्तकं वाचल्याचं स्पष्ट आठवतं. ज्याला कॉमिक्स म्हणतात, अशा 'चांदोबा'सारख्या हलक्याफुलक्या मासिकांकडे किंवा पुस्तकांकडे मी कधीच गेलो नाही. पण रहस्यकथा आवडीनं वाचत होतो. बाबुराव अर्नाळकर यांच्या रहस्यकथा त्या वेळेला दर महिन्याला आमच्या हाती यायच्या. त्या स्वस्तही असायच्या. त्यात आम्ही इतके समरसून जायचो की, खूपदा रस्त्याने चालताना, रेशनच्या किंवा दुधाच्या रांगेत उभं असतानासुद्धा मी ते वाचत असे. मला आठवतं, अर्नाळकरांच्या कादंबऱ्यांतील 'झुंजार' नावाच्या नायकाचं मरीन ड्राईव्हला 'झुंजार महाल' नावाचं घर आहे असा उल्लेख त्यांच्या एका 'झुंजार' कथेत होता. तो वाचल्यावर मरीन ड्राईव्हला खरंच त्याचं असं घर आहे का, हे बघण्यासाठी मी दोन-तीन वेळा तिथं फेऱ्या मारल्या होत्या. वेडेपणाच तो! पण वाचनाशी मी किती एकरूप होऊन जायचो ते दर्शवणारा.

या वाचनाला हळूहळू कथा-कादंबऱ्यांची जोड मिळत गेली. मी मुंबईत किंग्ज सर्कलला राहत होतो. तिथून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आणि दादर सार्वजनिक वाचनालय पायी चालत जावं, इतक्या अंतरावर होतं. मी या दोन्ही वाचनालयांचा सदस्य होतो. आमच्या खाली राहणाऱ्या एक काकू मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात नोकरी करत होत्या. त्या रोज एखाददुसरं पुस्तक घरी आणायच्या. ते लगेच वाचून व्हायचं. वाचनाचा वेग प्रचंड असायचा. त्यातलं किती ग्रहण करत होतो, हे सांगणं अवघड आहे. पण रोज एक पुस्तक वाचणं ही अगदी सर्वसामान्य गोष्ट होती. सुरुवातीला एखादा लेखक घ्यायचा आणि त्याचं मिळेल ते सगळं वाचून पूर्ण करायचं अशी माझी पद्धत होती. मग ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर वगैरे संपवले. एक-एक करत मी अशा अनेक कादंबऱ्या, कथासंग्रहांचा फडशा पाडत गेलो.

या वाचनानं ज्या गोष्टी मी कधीही अनुभवल्या नव्हत्या त्यांचीही जाणीव मला होत गेली. उदाहरणार्थ, शिवकाळ मी कधीच अनुभवला नव्हता; पण नाथमाधवांच्या 'स्वराज्यावरील संकट' वगैरे कादंबऱ्या वाचून तो सगळा शिवकाळ मी जगलो. ब. मो. पुरंदरे यांचं शिवचरित्रकथन मी दोन-तीन वेळा तरी ऐकलं असेल. वाचनाला अशा व्याख्यानांचीही जोड होतीच. आमच्या जवळच्या राजा

शिवाजी (त्या वेळच्या किंग जॉर्ज) विद्यालयाच्या पटागंणात किंवा शिवाजी पार्कवर अथवा अमरहिंद मंडळात त्यांची तसंच इतरही अनेकांची व्याख्यानं व्हायची. वाचनाला पूरक अशा या व्याख्यानांचीही आवड मनात निर्माण झाली होती. 'मराठा' नियमित वाचत असल्यानं आचार्य अत्रे हे आमचं दैवतच होतं. शिवाजी पार्कवरची त्यांची कुठलीही महत्त्वाची सभा मी चुकवली नव्हती. त्या वेळेला ते शिवाजी पार्कचे सम्राटच होते. साठच्या दशकाच्या उत्तरार्धात शिवसेनेची सुरुवात झाली, तेव्हा अर्थातच ते चित्र पालटलं. नवे सम्राट गादीवर बसले. पण त्या वेळेपावेतो अत्रेंच्या बहुतेक महत्त्वाच्या सभांना मी हजर असायचो. त्याचप्रमाणे कामगार मैदानही फार लांब नव्हतं. माझं आजोळ परळलाच आहे. त्यामुळे तिकडे खूपदा माझं जाणं असायचं. कामगार मैदानावरच्या कॉम्रेड डांगेंच्या सभांनाही आम्ही आवर्जून जायचो.

मराठी माध्यमात शिकत असलो तरीही मराठीकडून इंग्रजी वाचनाकडे मी तसा लवकरच वळलो. मगाशी म्हटल्याप्रमाणे इंग्रजी वाचनाची सुरुवात फ्री प्रेस जर्नलपासून झाली. पण त्याचबरोबर माझ्या वडलांच्या साम्यवादी विचारांमुळे 'ब्लिट्झ' हे आर. के. करंजिया यांचं साप्ताहिक नेहमी घरी यायचं. या साप्ताहिकात के. ए. अब्बास हे साम्यवादी विचारवंत नेहमी शेवटचं पान लिहायचे. मी ते नेहमी वाचायचो. त्या पानावरच्या उजव्या कोपऱ्यात कुठल्या तरी परदेशी पिन-अप गर्लचा एक फोटो असायचा. त्याचा बाकीच्या मजकुराशी काहीही संबंध नसायचा! पण त्या वयात त्या फोटोचंही आकर्षण होतंच. वाचताना ब्लिट्झमधल्या काही विसंगतीही लक्षात आल्या. साम्यवादी विचारसरणीचा कट्टर पुरस्कार करताना करंजिया त्या विचारसरणीत जराही न बसणाऱ्या साईबाबांची, इराणच्या शहाचीही भलावण करायचे! या विरोधाभासाची गंमत वाटायची.

अनेक अमराठी वक्त्यांच्याही भाषणांना माझी हजेरी असायची. आचार्य रजनीश; जे अजून भगवान व्हायचे होते; त्यांची व्याख्यानं हिंदीतून व्हायची. मी ऐकलेल्या सर्वांत प्रभावी वक्त्यांमध्ये त्यांचं नाव मी निश्चितच घेईन. श्रोत्यांना मंत्रमुग्ध कसं करायचं, ते रजनीशांकडून बघायला मिळालं. जॉर्ज फर्नांडिसांपासून तारकेश्वरी सिन्हांपर्यंत आणि जगन्नाथराव जोशींपासून ते आप्पा पेंडसेंपर्यंत अनेक चांगले ओजस्वी वक्ते त्या काळात ऐकले. अशा प्रकारे व्याख्यानं, वाचन या सगळ्यातून माझा पिंड, माझ्या सामाजिक जाणिवा विकसित होत गेल्या.

पुढे मी इंग्रजी वाचनाकडे वळलो, तेव्हा माझ्याकरता ती अलिबाबाची गुहाच ठरली. कारण मराठीच्या तुलनेत इंग्रजीचं साहित्यविश्व खूपच विशाल आहे. माझं शिक्षण मराठीत झालं. मराठीवर माझं प्रेमही होतं, ती माझी मातृभाषाच होती; पण आमच्या घरात मराठीवरचं प्रेम म्हणजे इंग्रजी किंवा हिंदीचा तिरस्कार ही भूमिका कधीच नव्हती. मी राहत होतो, तो भागही मुंबईचा सगळ्यात कॉस्मोपॉलिटन म्हणता येईल असा भाग होता. आमच्या इमारतीत 24 बिऱ्हाडं होती पण त्यातली फक्त दोन मराठी होती. त्या भोवतालच्या वातावरणामुळे इंग्रजी वाचनाकडेही मी सहजरीत्या वळलो आणि त्याचाही माझ्या जडणघडणीवर खूप परिणाम झाला हे मला मागे वळून बघताना नीट जाणवतं.

**प्रश्न** : तुम्ही आत्ता म्हटल्याप्रमाणे, मुंबईसारख्या प्रचंड महानगरात राहताना एका बाजूला तुम्ही भाषणं ऐकत होतात, तर दुसऱ्या बाजूला इंग्रजी, मराठी वाचन होतं. त्याला पूरक असंच घरातलं वातावरण होतं. पण याच दरम्यानच्या काळात तुम्ही लिहायला लागलात. तर लेखन करण्यासाठी तुमच्यावर त्या काळातल्या कोणत्या लेखकांचा आणि पुस्तकांचा विशेष प्रभाव राहिला?

– खरं तर, अशी अनेक नावं सांगता येतील. मुळातच मराठी साहित्याचा इतिहास पाहिला, तर 1960 ते 1980 हा वीस वर्षांचा कालखंड सर्वांत प्रभावी होता. माझ्याही दृष्टीने वाचक म्हणून जडणघडण होण्याकरता तो काळ सर्वात प्रभावी होता. मराठी मासिकांचा तर तो अगदी वसंतऋतू होता. अनेक मराठी मासिकं आमच्या घरी येत होती. माझ्या आईनं घरच्या घरी एक फिरतं वाचनालयच चालवलं होतं. आसपास राहणारे 30-35 जण त्याचे सदस्य होते. बहुतेक गाजलेलं साहित्य एके काळी मासिकांतून प्रसिद्ध झालंय. आज लोकांना हे पटवणं कदाचित अवघड असेल, कारण आज तशी मासिकं राहिलेली नाहीत. पण तुम्ही जुन्या काळातले संदर्भ पाहिलेत, तर ते लक्षात येईल. उदाहरणार्थ, 'गाय ही माता नव्हे, केवळ एक पशू' किंवा 'मंत्र नव्हे, यंत्र' असे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे गाजलेले निबंध पूर्वी किर्लोस्कर मासिकातच आलेले आहेत.

हरीभाऊ आपटेंच्या प्रत्येक कादंबरीचं पहिलं प्रकाशनही नियतकालिकांतच झालेलं आहे. त्यांनी ‘करमणूक’ नावाचं एक साप्ताहिकही त्यासाठी चालवलं होतं. गंगाधर गाडगीळांची ‘प्रिया आणि मांजर’ ही पहिली कथा 1942 मध्ये ‘अभिरुची’ मासिकात प्रसिद्ध झाली होती. त्यांच्या नंतरच्याही इतर सर्व कथा ‘सत्यकथा’ आणि इतर काही मासिकांत आलेल्या आहेत. जी. ए. कुलकर्णींच्या कथाही मुख्यतः ‘हंस’मधून यायच्या. पु. ल. देशपांडेंचं ‘अपूर्वाई’ हे किर्लोस्करमध्ये आलेलं आहे. ‘बटाट्याची चाळ’, ‘व्यक्ती आणि वल्ली’ हे ‘सत्यकथे’त आलेलं आहे. पुलंचं कुठलंही पुस्तक काढा, त्यातल्या बहुतेक मजकुराची पूर्वप्रसिद्धी मासिकात झालेली आहे. त्यामुळे ‘मासिकाच्या वाचनातून साहित्याचं वाचन’ हा प्रवास आपसूकच होत गेला.

नियतकालिकांची वाढ आणि साहित्याची वाढ या दोन्ही समांतर घडलेल्या गोष्टी आहेत. इंग्रजीमधलेही महत्त्वाचे लेखक साप्ताहिकं आणि मासिकांतूनच व्यापक वाचकवर्गापुढे आलेले आहेत. अमेरिकन सरकारची मुंबईत मरिन लाइन्सला मोठी लायब्ररी होती. त्याला ‘युनायडेट स्टेट्स इन्फॉर्मेशन सर्व्हिस’ किंवा युसिसची लायब्ररी असं म्हटलं जायचं. अशीच नरिमन पॉईंटजवळ ब्रिटिश काऊन्सिलची लायब्ररी होती. या दोन्हींचा मी सदस्य होतो. तिथं एका वेळी चार पुस्तकं घरी नेता यायची. त्यामुळे इंग्रजी वाचनही मोठ्या प्रमाणावर झालं. त्याचेही माझ्यावर खूप संस्कार आहेत.

**प्रश्न** : आपला दृष्टीकोन आकाराला येतो, त्या 20-21 वर्षे वयापर्यंतच्या कालखंडात वाचन करणं आणि भाषणं ऐकणं हे दोन घटक तुम्हाला विशेष उपयुक्त ठरले. हाच तुमच्या ऐन उमेदीचा काळ. म्हणजे साधारण 1964 ते 1974 हा कालखंड. या काळात आपल्या देशात चार वेगवेगळे राजकीय प्रवाह कार्यरत होते. त्यातला एक तर तुमच्या घरातही होता. तुमचे वडील कम्युनिस्ट विचारांचे होते, कामगार चळवळीतील पुढारी होते. त्यामुळे कम्युनिझम तुमच्या घरातून तुमच्यापर्यंत पोहोचत होता. दुसरा, सत्ताधारी पक्ष काँग्रेस होता. उरलेले दोन – जनसंघ आणि समाजवादी हे प्रवाह तेवढेच बळकट होते. या चार प्रमुख प्रवाहांमध्ये होणाऱ्या घटनांचा, त्यांनी घेतलेल्या भूमिकांचा, वेगवेगळ्या घटनांना त्यांनी दिलेल्या प्रतिसादाचा तुमच्यावर काय प्रभाव पडत होता? तुमचं वाचन आणि बाहेरचं, कुटुंबातलं वातावरण यातून तुमचा स्वतःचा असा जो एक दृष्टीकोन आकाराला आला, त्याचं स्वरूप नेमकं कसं होतं?

– मी याची सुरुवात पंडित जवाहरलाल नेहरूंपासून करेन. कारण मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे, 27 मे 1964 रोजी त्यांचं निधन झालं, तेव्हा मी वेगवेगळ्या वृत्तपत्रांतले लेख कापून त्यांचं एक हस्तलिखित तयार केलं होतं. त्यात रंगीबेरंगी – पिवळे, हिरवे, निळे, लाल जिलेटिन पेपर लावले होते. अवतीभवती रंगीत पेन्सिलीने नक्षीकाम केलं होतं. त्यात थोडं लेखनही मी केलं होतं. तसा तो एक बाळबोधच प्रकार होता. गंभीर काहीच नाही. पण आपणही मासिक काढावं असा विचार माझ्या मनात त्या वेळीच रुजला होता का? याचं नेमकं उत्तर देणं कठीण आहे. आपल्या अंतर्मनात इतके प्रवाह कार्यरत असतात की, कोणत्या प्रवाहाचा आपल्यावर नेमका काय परिणाम होतोय हे आपण कधीच सांगू शकणार नाही. पंडित नेहरूंचं आम्हाला खूप आकर्षण होतं हे मात्र नक्की. मला अजूनही वाटतं की, मागील पिढीच्या भारतीय लोकांनी नेहरूंवर जितकं प्रेम केलं, तितकं दुसऱ्या कोणत्याही नेत्यावर केलेलं नाही. काही विशिष्ट भागात, विशिष्ट नेते लोकप्रिय होते. उदाहरणार्थ, मुंबईत साधारण 1967 नंतरच्या काळात बाळासाहेब ठाकरे हिरोच होते. पण पंडित नेहरूंची जी अखिल भारतीय प्रतिमा होती, ती वेगळीच होती आणि त्यांचं आम्हाला खूप आकर्षण होतं. एकदा आमच्या घरासमोरच्या, नुकत्याच उद्घाटन झालेल्या, षण्मुखानंद हॉलमध्ये काँग्रेसचं चार दिवसांचं अखिल भारतीय अधिवेशन होतं. सकाळी नऊ वाजता पंडितजी तिथं पोहोचायचे. दुपारी बारा-साडेबाराला जेवायला तिथूनच राजभवनला जायचे. मग परत तीनच्या सुमारास अधिवेशनाला यायचे आणि संध्याकाळी सहा-सातच्या सुमारास परत जायचे. जाताना दोनदा, आणि येताना दोनदा असे दिवसातून चार वेळेला आम्हाला मोटारीतून जाणारे पंडित नेहरू बघायला मिळायचे! आजच्या काळातल्या नेत्यांची सिक्युरिटी वगैरे पाहता त्यांचं तसं दर्शन होणं आज अगदी अशक्य वाटतं; पण पंडितजींना आम्ही चक्क आमच्या घराच्या गॅलरीतून बघायचो! उघड्या मोटरीत ते कधीकधी उभेही राहायचे, दुतर्फा उभ्या असलेल्या लोकांकडे बघत हात हलवायचे. या साऱ्यातूनही त्यांच्याविषयी जवळीक निर्माण व्हायची.







भारतातील पहिली अखिल भारतीय कामगार संघटना म्हणजे ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस. तिचे पंडितजी 1929 मध्ये अध्यक्ष होते. तेव्हापासून त्यांना कामगार चळवळीत रस होता. माझ्या वडलांचाही त्यांच्याशी संबंध आला होता. माझे वडील ऑल इंडिया पोर्ट ॲण्ड डॉक वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष असताना, म्हणजे जून 1958 मधे, देशभरातील सर्व बंदर आणि गोदी कामगारांचा संप झाला. भारतातला सार्वजनिक क्षेत्रातला, देशव्यापी असा, हा पहिला संप. त्यावेळी देशात धान्याचा तुटवडा इतका असायचा की, बंदरात अमेरिकेहून धान्य घेऊन येणारी बोट लागली, की मगच रेशनच्या दुकानात धान्य उपलब्ध होईल अशी परिस्थिती होती. त्यामुळे साहजिकच देशातल्या सर्वच बंदरांतला संप म्हटल्यावर खूपच खळबळ माजली होती. तेव्हा पंडितजींनी स्वतः त्या संपात हस्तक्षेप केला होता. त्या वेळच्या आठवणी माझ्या वडिलांकडून मी खूपदा ऐकायचो. पंडितजींविषयी आदरापेक्षा प्रेम ही भावना सर्वांच्या मनात खूप होती. माझे वडील एक गमतीदार आठवण सांगायचे. या संपाच्या वेळी ते फेडरेशनच्या शिष्टमंडळासह दिल्लीला पंडितजींना भेटायला गेले, तेव्हा पंडितजींनी आधी प्रत्येकाला सिगरेट ऑफर केली होती! ते म्हणाले होते, 'A friend from Turkey has sent it for me. Why don't you have one?' त्यातले एक कामगारनेते तर असे होते की, ज्यांनी आयुष्यात कधीच सिगरेट ओढली नव्हती. पण पंडितजींना 'नाही' कसं म्हणायचं, म्हणून त्यांनी ती पेटवली आणि झुरका मारताच त्यांना जोरदार ठसका लागला होता! पण या साऱ्यात एक अनौपचारिक मित्रभावही होता आणि त्याचाही प्रभाव सर्वांवर पडतच होता.

**प्रश्न** : नेहरूंचा प्रभाव होता, त्यांच्याविषयी प्रेम व आकर्षण होतं, तसं काँग्रेस पक्षाच्या विचारधारेविषयी किंवा अन्य नेत्यांबद्दल काय वाटायचं?

– 1 मे 1960 रोजी, मागील काही वर्षं जोरदार चळवळ झाल्यानंतर, संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. पण त्या वेळेला सगळ्याच पक्षांमध्ये आजच्यासारखं परस्परविरोधी कटू वातावरण असं नव्हतं. संयुक्त महाराष्ट्र समितीत अनेक पक्ष होते, सगळ्यांचंच कडबोळं होतं ते. आघाडीच होती ती. त्यामुळे वेगवेगळे पक्षभेद हे तेव्हा आजच्याइतक्या तीव्रतेनं जाणवणारे नव्हते. संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून समिती लढत होती हे खरं आहे, पण राज्यातील काँग्रेसचाही संयुक्त महाराष्ट्राला विरोध असा नव्हताच. यशवंतराव चव्हाणांनी त्याला नंतर पाठिंबाच दिला होता. अशा वातावरणात पक्षीय राजकारण, नेत्यांमधली दुही यांचा खास असा काही परिणाम माझ्यावर झाला नाही.

पण थोडी काळाची उडी घेऊन एक नक्की सांगावंसं वाटतं की, देशात 1975 साली आणीबाणी आली त्यावेळी मात्र एकदम राजकीय जाणिवा धारदार बनल्या. तेव्हा 'हिंमत' नावाच्या एका इंग्रजी साप्ताहिकात दहा-बारा तरुणांच्या एका गटासोबत मी काम करत होतो.

नंतर इंदिरा गांधींनी अगदी अचानक आणीबाणी उठवली आणि 1977 मध्ये निवडणुका जाहीर केल्या. तेव्हा आम्ही सर्वांनी जनता पक्षाचा हिरीरीने प्रचार केला होता. त्या जनता पक्षात तेव्हा काँग्रेस सोडून जवळजवळ सगळे विरोधी पक्ष होते. 'इंदिरा हटाव' हेच एकमेव उद्दिष्ट त्यांना एकत्र आणणारं होतं. पण पुढे प्रत्यक्षात हे सरकार सत्तेवर आलं, तेव्हा ज्यांना आम्ही हिरो मानलं होतं; ती माणसं आधीच्या नेत्यांसारखीच भ्रष्ट होती, हे आमच्या लक्षात यायला लागलं. त्यामुळेच ते जनता पक्षाचं सरकार आपापसातील भांडणांमुळे बघताबघता पत्त्यांच्या बंगल्यासारखं कोसळलं. पुन्हा इंदिरा गांधी सत्तेवर आल्या! आम्ही पुरते गोंधळून गेलो. ज्यावेळी इंदिरा गांधी निवडणूक हरल्या आणि आमच्या जनता पक्षाच्या प्रचाराला फळ मिळालं असं आम्हाला वाटत होतं, तेव्हा जनता किती सुज्ञ, हुशार असते, लोकांना कसं सगळं योग्य-अयोग्य माहीत असतं, अशी आमची प्रामाणिक भावना झाली होती. पण मग हेच तथाकथित सुज्ञ मतदार दोन वर्षातच त्याच इंदिरा गांधींना इतक्या भरघोस मतांनी कसं निवडून देतात? म्हणजे मतदारांच्या शहाणपणाबद्दल आम्ही जो समज करून घेतला होता, तो तसा करून घेणं ही निव्वळ आमची गरज होती. प्रत्यक्षात तसा तो मतदार खरंच समजदार होता की नाही याविषयी मला आजही शंका वाटते. त्यामुळे एक प्रचंड भ्रमनिरास झाला. आणीबाणीविरोधात लढणारी आमच्यासारखी सामान्य मंडळी प्रत्यक्षात कुणाच्या तरी हातची खेळणी बनली होती का? लोकांचा आणीबाणीला खरंच विरोध होता की नव्हता? की आम्हीच लोकांचा आणीबाणीला विरोध आहे असं म्हणत होतो? असे अनेक अस्वस्थकारक विचार मनात येऊ लागले. आणीबाणीच्या काळातही बहुसंख्य माणसं त्यांचं नेहमीचंच रुटीन आयुष्य जगतच होती हे लक्षात आलं. यातून एकूण राजकीय प्रक्रियेविषयीच माझा भ्रमनिरास झाला. त्या भ्रमनिरासाचा माझ्यावर मोठा परिणाम झाला. त्यामुळे कदाचित पक्षीय राजकारणाविषयी माझ्या मनात पुढे कोणत्याही प्रकारचा आपलेपणा, ममत्व निर्माण झालं नाही; किंवा तशा पक्षीय राजकारणात सहभाग घ्यावा अशी इच्छाही नंतर कधीच निर्माण झाली नाही.

**प्रश्न** : जनसंघ आणि समाजवादी हे काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्यापेक्षा दोन वेगळे प्रवाह. त्यांचं तुमच्या मनावर काही आदळत होतं किंवा त्यांचं काही अनुसरण करत होता?

– या सगळ्याशी संबंध येत होता आणि त्याचा परिणामही होत होता. अटल बिहारी वाजपेयी आणि जगन्नाथराव जोशी हे जनसंघाचे प्रभावी वक्ते होते. आमच्या माटुंग्याला साऊथ इंडियन जिमखान्यावर त्यांची भाषणं व्हायची. वाजपेयी हिंदीत बोलायचे. जोशी कधी मराठीत तर कधी हिंदीत. त्याचा माझ्यावर निःसंशय परिणाम होता होता. तसंच कामगार चळवळ हे अनेक समाजवादी नेत्यांचं मूळचं स्थान असल्यानं तेही संपर्कात होते. 'बंदसम्राट' जॉर्ज फर्नांडिस हे मुंबईतल्या कामगार चळवळीचे त्या काळाततरी हिरो होते. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघात त्यांनी एस. के. पाटलांचा पराभव केला, तेव्हा सगळ्यांना किती आनंद झाला होता हे मी पाहिलं होतं. त्यांची 'पाटील पडलाच पाहिजे (पी.पी.पी.)' ही पोस्टर्स मला आठवतात. जॉर्ज फर्नांडिस हे एक ख्रिश्चन, त्यात मंगळूरवरून आलेले. पण त्या गोष्टी त्यांच्या लोकप्रियतेच्या आड कधीच आल्या नाहीत. त्यांनी चक्क एस. के. पाटलांना हरवलं! पाटील हे मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी, ज्याला बीपीसीसी म्हणायचे, त्याचे सर्वेसर्वा होते. संबंध देशात काँग्रेस पक्षाचं फंडिंग त्याकाळात मुंबईकडून यायचं. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी वेगळी. ती तशी गरीब होती. बीपीसीसीकडेच सगळा पैसा असायचा. त्यामुळे एस. के. पाटलांचं भारतीय राजकारणातलं महत्त्व त्यावेळी अनन्यसाधारण होतं.

**प्रश्न** : याबद्दल अनेक आठवणी सांगितल्या जातात. त्यावेळी 'तुम्ही एस. के. पाटील यांना पराभूत करू शकता' असं एकच वाक्य असणारं पोस्टर प्रचंड प्रमाणात लावून जनतेला मोठं आव्हान दिलं होतं. तिथंपासून ते 'तुम्ही एस. के. पाटील यांना पराभूत करणारच' आणि शेवटी निकाल लागल्यावर 'तुम्ही एस. के. पाटील यांना पराभूत केले' अशीही पोस्टर्स लागली होती.

– हे अगदी बरोबर आहे. एखादा नेता अगदी अजिंक्य आहे, तो हरणं शक्यच नाही असं कधीकधी आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात तो हरतो, तेव्हा फारच वेगळं वाटतं. तसं मुंबईत एस. के. पाटलांच्या बाबतीत झालं होतं. पण यावरून जनता फार सुज्ञ होती असा निष्कर्ष मात्र काढता येणार नाही. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेदेखील

मुंबईतल्या कामगार भागातल्या मतदारसंघातून लोकसभा निवडणूक हरले होते. मध्य मुंबई या कामगारांचा मुख्य समावेश असलेल्या मतदारसंघात काँग्रेसचे नारायणराव काजरोळकर यांनी त्यांचा पराभव केला होता.

**प्रश्न :** भंडाऱ्यातही असंच झालं होतं. डॉ.आबंडेकरांना हरवणारे उमेदवार त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या दृष्टीने इतके छोटे होते की, त्याची आज कुणाला आठवणही नाही.

– याचं एक कारण असं की, पंडित नेहरूंचा जनमानसावर इतका प्रभाव होता की, 'नेहरूंनी इलेक्ट्रिकचा खांब जरी निवडणुकीत उमेदवार म्हणून उभा केला, तरी लोक त्याला निवडून देतील', असं म्हटलं जायचं. त्यामुळेच ज्यांना नेहरूंचा पाठिंबा असायचा त्यांचा विजय गृहीतच धरला जायचा आणि अनेक जण तसे निवडूनही आलेले होते.

पुन्हा राजकीय पक्षांच्या प्रभावाकडे येतो. आपण सगळेच निवडणुकीत मतदान करतो. म्हणजे कुठल्या तरी पक्षाचं आपण समर्थन करतो. मतदानाचा हक्क मिळाल्यानंतर झालेल्या जवळपास सगळ्याच निवडणुकीत मी मतदान केलेलं आहे. आणि त्यावेळी त्या त्या काळातील परिस्थितीनुसार वेगवेगळ्या पक्षांना मी मतं दिलेली आहेत. एक काळ असा होता की, मुंबईतले सगळेच तरुण बाळासाहेब ठाकरेंच्या प्रभावानं भारले होते. त्यामुळे शिवसेनेच्या उमेदवाराला मत देण्याबद्दल कुणी सांगायची गरजच नव्हती. सत्तरच्या दशकात जेव्हा मला मतदानाचा हक्क प्रथम मिळाला तेव्हा आम्ही सगळेच मराठी तरुण शिवसेनेचे मतदार होतो. त्यामुळेच शिवसेना मुंबईत एवढी मजबूत होत गेली. त्या आधी ती भूमिका संयुक्त महाराष्ट्र समितीकडे होती. चांगला असेल, तर एखाद्या वेळी काँग्रेसच्या उमेदवारालाही आम्ही मत दिलंय. 'मतदान करताना राजकीय पक्ष कुठला ते पाहाण्यापेक्षा उमेदवार कोण आहे, तो चांगला आहे का, ते पाहून मत द्यायचं' असंही, प्रत्येक वेळी नाही तरी खूपदा, माझ्या बाबतीत घडलं आहे. याचं कारण कुठेतरी राजकीय प्रक्रियेबद्दलच्या माझ्या भ्रमनिरासात असू शकेल.

या संदर्भात एक अनुभव इथे सांगावासा वाटतो. ही घटना आहे साधारण 1975 सालची. त्यावेळी म्हणजे इंदिरा गांधी सत्तेवर असताना मी दिल्लीत कॅनॉट प्लेस भागात बघितलेलं हे एक दृश्य. अलाहाबाद कोर्टाचं इंदिरा गांधींच्या विरोधातलं जजमेंट आलं, तेव्हा 'त्यांनी राजीनामा द्यावा' अशी विरोधी पक्षाची मागणी होती. याउलट त्याच वेळी इंदिराजींच्या बाजूने घोषणा करणाऱ्यांची प्रचंड गर्दी त्यांच्या निवासस्थानी रोज होत असे. त्या वेळेला कॅनॉट प्लेसच्या एका आडगल्लीत तीन-चार ट्रक उभे असलेले मला दिसले. चौकशीनंतर कळलं की, कुठल्याशा ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टरचे ते ट्रक आहेत आणि त्यात माणसं भरून राजकीय नेत्यांच्या समर्थनार्थ किंवा विरोधार्थ घोषणा देण्यासाठी त्यांना नेणं हा चक्क त्याचा बिझनेस आहे! राजकीय प्रक्रियेविषयीचा भ्रमनिरास तेव्हापासूनचा आहे! आणखी एक गोष्ट तेव्हा लक्षात आली की, सर्वसामान्य कार्यकर्ते एकमेकांशी आपापल्या राजकीय मतावरून अगदी हिरिरीने भांडतो; प्रसंगी एकमेकांशी वैरही धरतो; पण त्याच वेळेला त्या-त्या पक्षाचे सर्वोच्च नेते मात्र एकमेकांना अगदी व्यवस्थित संभाळून घेत असतात! अशा अनेक कारणांनी मला स्वतःला राजकारणात शिरावं असं कधीच वाटलं नाही. कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रभावाखालीही मी कधी आलो नाही. मी माझं क्षेत्र साहित्य, वैचारिकता आणि समाजकारण यापुरतंच ठेवलं; राजकारणापासून दूर राहिलो.

**प्रश्न :** तुमची ही सर्व जडणघडण वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंतची आहे असं म्हणता येईल. म्हणजे 1975 ला आणीबाणी आणि त्यानंतरची दोन वर्षं जनता पार्टीचा प्रयोग. त्याच वयाच्या आसपास एक दृष्टीकोन आकाराला येत असतो, धारणा पक्क्या होतात, राजकीय-सामाजिक कल लक्षात येतो. साधारणतः याच काळात तुम्ही लेखक म्हणूनही उदयाला येत होतात. तुम्ही कथालेखनापासून प्रारंभ केला आणि दोन अतिशय महत्त्वाच्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यातली एक 'तिसरी चांदणी' ही आणीबाणीच्या काळाबद्दल आहे आणि दुसरी 'कॉम्रेड' कादंबरी काशाबद्दल आहे ते नावातूनच स्पष्ट होतं. त्या दोन्ही कादंबऱ्यांकडे मी पुढच्या प्रश्नात वळणार आहे. पण त्या आधी तुम्ही प्रामुख्यानं कथा लिहित होता, कदाचित नॉन-फिक्शन स्वरूपाचे लेखही लिहित असाल. तुमच्या लेखनाचा प्रारंभ कसा झाला? सुरवातीच्या काळातल्या कथा कशा होत्या? तुमची 'उच्चभ्रू कलिंगड' ही पहिली छोटी कादंबरी किंवा दीर्घकथा. या दोन-तीन गोष्टी सोडल्या, तर त्यानंतर


Date of Posting : 25-3-2024

तुमचे कथासंग्रह कधीच आलेले दिसत नाहीत. तुम्ही कथा लिहिल्या, त्या चांगल्या नियतकालिकांत प्रकाशितही होत होत्या आणि त्या लेखनाच्याच निमित्ताने तुमची ज्या मुलीशी ओळख झाली, ती तुमची भावी पत्नी झाली. हे सगळं फारच इंटरेस्टिंग होतं. तर याबद्दल सांगा. आणि तुमच्या कथांचं नंतर पुस्तक का आलं नाही तेही सांगा?

– कथालेखनाकडे वळण्याचं मुख्य कारण माझं वाचनप्रेम. आज कथेचा वाचक कमी झालाय; पण 1960 ते 1980 या काळात कथा हा मराठी साहित्याचा, मासिकांचा आत्माच होता. प्रत्येक मासिकात पाच-सहा कथा असायच्याच. अगदी अरविंद गोखले, पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळांपासून बाबुराव बागुल, शंकर पाटील, जी. ए. कुलकर्णी यांच्यापर्यंतच्या सगळ्यांचा तो बहराचा काळ होता, वसंत ऋतू होता. नव्या उमेदीने ते सारे कथा लिहित होते. आमच्यासारख्या मराठी माध्यमातून शिकलेल्या वाचकांवर साहजिकच त्या कथांचा खूप प्रभाव पडला. मी लिहिलेल्या कथांचे विषय वेगवेगळे होते. त्यातून माझ्या अवतीभवतीचं सामाजिक वास्तव मी प्रतिबिंबित करत होतो. त्यातल्या 'ॲडमपासून ॲडमपर्यंत' नावाच्या 'सत्यकथा' दिवाळी अंकात आलेल्या दीर्घकथेचा इथे उल्लेख करतो. त्यात ओडिसातल्या राजगांगपूरमध्ये एका मोठ्या उद्योगपतीची मोठी सिमेंट फॅक्टरी आणि त्यात काम करणाऱ्या एका आदिवासी तरुणाच्या छातीत सिमेंटची धूळ जाऊन झालेली नासाडी दाखवली होती. त्याला कंपनीनं मुखवटे, म्हणजे सेफ्टी मास्क, देऊनही त्यानं ते न घालणं, त्याचं दारूचं व्यसन अशीही कारणं होती. एकीकडे औद्योगिक संस्कृतीची आवश्यकता त्या कारखान्यात मला जाणवत होती. दुसरीकडे ॲडम म्हणजे आदिमानव या अर्थानं आदिवासींचं प्रातिनिधिक चित्रही त्यात मी रंगवलं होतं. ॲडम स्मिथ हा कॅपिटॅलिझमचा जनक मानला जातो. तो ॲडम आणि ॲडम-इव्हमधला ॲडम, म्हणजे आदिमानव, यांच्यातलं नातं या कथेत मी चितारलं होतं. शेवटी दारूच्या आहारी जाऊन त्याच्या जीवनाची कशी नासाडी होते, हे त्यात होतं. अशा वेगवेगळ्या कथा मी लिहीत होतो. त्यावर अनेक पत्रं यायची. तो व्हॉट्सअप पूर्वीचा काळ होता. एकदा असंच एक सुवाच्च अक्षरात वहीच्या पानावर लिहिलेलं पत्र आलं. अक्षरावरून आणि भाषेवरून ते एखाद्या तरुण मुलीनं लिहिलेलं वाटलं. पुढे तिची बरीच पत्रं येऊ लागली. त्यातील काही तर तीन-चार पानांची असायची. ती मुलगी विलेपार्ल्याला राहायची. पुढे आमची प्रत्यक्ष भेट झाली, मैत्री जुळली आणि नंतर लग्नही झालं. 'एका अपरिचित लेखकाला अशी तीन-चार पानी भरभरून पत्रं लिहिताना तुला संकोच कसा वाटला नाही?' असं एकदा मी तिला लग्न ठरल्यानंतर विचारलं असताना 'तुझं लेखन वाचून तू कमीत-कमी साठ वर्षांचा आहेस, असं मला वाटलं होतं', असं ती म्हणाली! प्रत्यक्षात माझं वय तेव्हा 25 होतं! बहुधा माझा पिंडच गंभीर असल्यानं माझ्या लेखनातही प्रौढता, गांभीर्य असायचं.

'या कथांचा कथासंग्रह मी का काढला नाही' हा प्रश्न आज मलाही पडतो. माझा एक मित्र प्रत्येक भेटीत 'तुझा कथासंग्रह निघायला पाहिजे होता' असं म्हणतो. त्याचं म्हणणं बरोबर आहे, पण तुमचा कथासंग्रह काढायची माझी इच्छा आहे असं म्हणणारा कोणी प्रकाशक मला भेटलाच नाही! तसा कथासंग्रह काढायचा मी आपणहूनही प्रयत्न केला नाही. ही बहुधा माझी चूक होती. भविष्यात कदाचित माझा एखादा कथासंग्रह निघेलही. कारण, माझ्या आठवणीप्रमाणे मी 25-30 तरी कथा लिहिल्या असाव्यात. त्या सगळ्या, त्या वेळेला जी दर्जेदार मासिकं म्हटली जायची, त्यांच्यात प्रकाशितही झाल्या होत्या.

**प्रश्न :** वयाच्या 25 व्या वर्षापर्यंत तुम्ही दोन महत्त्वाच्या कादंबऱ्या लिहिल्या. त्यानंतर मात्र तुमच्या कादंबऱ्या आल्या नाहीत. 'तिसरी चांदणी'ला आणीबाणीची पार्श्वभूमी आहे. 'कॉम्रेड'ची पार्श्वभूमी वडिलांमुळे पाहिलेल्या कामगार चळवळीत असणार. तर या दोन कादंबऱ्यांची मध्यवर्ती कल्पना काय आणि त्यातून तुम्ही काय मांडू पाहताय हे सांगा. शिवाय, आज इतक्या वर्षांनंतर मागे वळून पाहताना तुम्ही त्याकडे कसं पाहता?

– राजकीय पार्श्वभूमीवर मराठीत कादंबरीलेखन झालेलं नाही किंवा पुरेसं झालेलं नाही व त्यामुळे तशा कादंबरीलेखनासाठी मॅजेस्टिक प्रकाशनाचे केशवराव कोठावळे यांनी एक स्पर्धा जाहीर केली होती. त्या स्पर्धेसाठी मी 'तिसरी चांदणी' लिहिली होती. त्यात ती एकच कादंबरी पारितोषिक प्राप्त ठरली आणि तिला तीन हजार रुपयांचं पारितोषिकही मिळालं. स. गं. मालशे परीक्षक होते. त्यावेळी ती रक्कम घसघशीत होती. पुढे मॅजेस्टिकने ती प्रकाशितही केली. त्यानंतर मी 'कॉम्रेड'

ही कादंबरी ग्रंथाली प्रकाशनाकरता लिहिली. 'तिसरी चांदणी'मध्ये माझे स्वतःचे तसेच माझ्या जवळच्या मित्रांचेही अनेक अनुभव आहेत. कादंबरीचा इंजिनियर असलेला तरुण नायक, किरण, परदेशी शिकून आलाय. प्रामाणिकपणे उद्योग करण्याच्या जिद्दीतून तो एक कारखाना सुरू करतो, पण राजकीय हस्तक्षेपामुळे तो अजिबात चालत नाही. त्याला तो बंद करावा लागतो. हा त्याचा आयुष्यातला पहिला भ्रमनिरास. त्याला खुणावणारी आणि मग अस्तंगत झालेली पहिली चांदणी. त्या भ्रमनिरासासाठी राजकीय हस्तक्षेप, देशातला भ्रष्टाचार कारणीभूत ठरतो. माझ्या एका मित्रावरच ते कथानक बेतलेलं होतं. सगळी कादंबरी घडते बिहारमध्ये जमशेदपूर परिसरात. त्यानंतर तो नायक एका गांधीवाद्यांच्या, सर्वोदयवाद्यांच्या आश्रमात सामील होतो. तिथलं वातावरण हे सर्वसामान्य आश्रमाप्रमाणेच, पण त्याच्या दैनंदिन जीवनशैलीशी विपरित असं असतं. त्यातही तो जीव रमवतो. पुढे जयप्रकाश नारायण यांचं संपूर्ण क्रांतीचं आंदोलन बिहारमध्ये सुरू होतं. त्या वेळेला बहुतेक सगळ्या गांधीवादी आश्रमांत फूट पडते. कारण, तिथे कार्यरत असणारा एक मोठा गट त्या राजकीय चळवळीत सामील होतो. तर विनोबांच्या आधिपत्याखाली असणारा एक छोटा गट त्या राजकीय चळवळीपासून अलिप्त राहतो. स्वतः किरणला राजकीय प्रक्रियेत अजिबात जायचं नसतं. त्यामुळे तो जयप्रकाश नारायणांच्या आंदोलनात सामील होत नाही. मग त्या आश्रमावर गुंड आणि स्थानिक राजकारणी यांच्याकडून संकटं येऊ लागतात. चॅरिटी कमिशनरकडूनदेखील अनेक अडचणी यायला लागतात. त्यातून कसं बाहेर पडायचं हे त्याला कळत नाही. इतर बहुतेक सहकारी त्याला सोडून गेले असतात. बऱ्याच मोठ्या रकमेची खोटीच थकबाकी त्याच्या आश्रमावर लादली जाते. यातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला फक्त जेपी मदत करू शकतील असं वाटल्यानं, तो 24 जून 1975 ला त्यांना भेटायला दिल्लीत जातो. पण दिवसभर खूप प्रयत्न करूनही ते भेटू शकत नाहीत. त्याच दिवशी संध्याकाळी जेपींची रामलीला मैदानावर प्रचंड जाहीर सभा असते. सगळे जण त्यातच बिझी असतात. तो जेपींच्याजवळही जाऊ शकत नाही. त्याची ती शेवटची आशाही मावळते. डोळ्यांपुढची दुसरी चांदणीही गळून पडते. पण तरीही शेवटी तो जेपी राहत असलेल्या इमारतीच्या गच्चीत जाऊन, पूर्ण अंधारलेल्या आकाशात, एखादी चांदणी कुठे दिसते का याचा शोध घेत राहतो. त्याच्या आयुष्यातील ती 'तिसरी चांदणी' असू शकणार होती. अशा काहीशा आशावादी शक्यतेवर ती कादंबरी संपते.

'कॉम्रेड' या कादंबरीमध्ये मध्यवर्ती पात्र माझ्या वडिलांच्या आयुष्यावर आधारित आहे पण ती एक कादंबरी आहे. त्यातील बहुतेक सर्व पात्रे आणि घटना प्रत्यक्षावर आधारलेल्या आहेत पण तो इतिहास नाही. त्यात कल्पिताचा भागही बराच आहे. भारतातली कामगार चळवळ हा पूर्वीपासून माझ्या अभ्यासाचा विषय असल्यानं कादंबरीतही त्या चळवळीचे चित्रण आणि त्या चळवळीतील विविध टप्पे हे सारं ओघानेच आलेलं आहे.

**प्रश्न** : 'कॉम्रेड' कादंबरीत कम्युनिस्ट नेते, कार्यकर्ते आणि कमुनिस्ट विचार कसे आलेत? कम्युनिस्ट नेत्यांनी त्या वेळी घेतलेल्या भूमिका याबद्दल काही आलंय का?

– 'तिसरी चांदणी'पेक्षा 'कॉम्रेड'मध्ये ते भरपूर आलेलं आहे. वस्तुस्थिती अशी की, जगभरच्या कम्युनिस्ट पक्षांचं धोरण फार मोठ्या प्रमाणावर मॉस्कोमध्ये, 'कॉमिंट्रॉन' या मध्यवर्ती साम्यवादी संस्थेतर्फे ठरवलं जायचं. कॅपिटॅलिस्ट इंग्रजांविरोधातल्या भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला कम्युनिस्ट सत्ताधीश स्टॅलिनचा सुरुवातीला शंभर टक्के पाठिंबा होता. 'तुम्ही इंग्रजांशी लढता आहात, म्हणजेच भांडवलशाहीविरुद्ध लढता आहात, आम्हीही त्यांच्याच विरुद्ध लढत आहोत आणि समान शत्रू असल्याने तुम्ही आणि आम्ही मित्र आहोत' अशी त्याची भूमिका होती. पण पुढे दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर जून 1941 मध्ये हिटलरने आपल्या फौजा रशियात घुसवल्या, तेव्हा स्टॅलिनचं धोरण रातोरात बदललं. कारण हिटलरविरुद्ध लढणारी रशिया आणि इंग्लंड ही दोन्ही राष्ट्रे आता अचानक 'मित्र राष्ट्रं' बनली. कारण दोघांचा सामायिक शत्रू जर्मनी, म्हणजे हिटलर हा होता. साहजिकच, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातून भारतीय कम्युनिस्टांनी अंग काढून घेतलं. 'ब्रिटिश आपले मित्र आहेत, त्यांच्याविरोधात काय लढायचं?' अशी कोलांटी उडी रशियन दबावामुळे त्यांना मारावी लागली. ते महायुद्ध संपल्यानंतर स्टॅलिनने पुन्हा एकदा आपली भूमिका बदलली. अँटी-ब्रिटन, अँटी-कॅपिटॅलिझम

ही जुनी भूमिका पुन्हा एकदा स्टॅलिनने स्वीकारली. केंद्रातील काँग्रेस सरकार हे भांडवलशाहीला मदत करणारं आहे अशी भूमिका घेऊन भारतीय कम्युनिस्ट भारत सरकारच्या विरोधात गेले. तेलंगणा येथील सशस्त्र उठाव हे त्याचंच एक अंग होतं. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडितजींनी सुरू केलेल्या पंचवार्षिक योजनांमध्ये परदेशी गुंतवणूक फार मोठ्या प्रमाणावर आवश्यक होती आणि तिथे रशियन सरकारला मोठी संधी दिसत होती. परदेशी मदतीशिवाय पंडितजी ज्याला 'कमांडिंग हाईट्स ऑफ द इकॉनॉमी' असं म्हणत त्या मोठ्या पब्लिक सेक्टर कंपन्या उभ्याच राहू शकल्या नसत्या. त्या वेळी भारतात पब्लिक सेक्टर मध्ये उभारल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पायाभूत कारखान्यांमध्ये, वीजकेंद्रांमध्ये गुंतवणूक करण्याची मोठी संधी रशियाला उपलब्ध झाली. तशी संधी ही दुसऱ्या महायुद्धात झालेल्या नुकसानानंतर रशियासाठीही त्यावेळी आवश्यक होती. कारण महायुद्धात जेवढं नुकसान जर्मनीचं झालं होतं, तेवढंच रशियाचंही झालं होतं. हे सगळं एका मोठ्या पटावरचं चित्र मी इथे अगदी स्थूलमानाने मांडतो आहे. प्रत्यक्षातले ताणे-बाणे थोडेफार वेगळे असणार. अशावेळी जर भारतात आर्थिक गुंतवणूक करायची असेल, तर सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या विरोधात आपण जाऊ शकत नाही, हे रशियानं हेरलं. त्यामुळे केंद्र सरकारच्या विरोधातली भूमिका घ्यायची नाही, हे भारतातल्या कम्युनिस्ट पक्षानं स्टॅलिनच्या आदेशानुसार ठरवलं. साहजिकच, भारतातील सार्वजनिक क्षेत्रात फार मोठी गुंतवणूक रशिया करू शकलं. प्रचंड प्रमाणावर रशियन यंत्रसामग्री इथं येऊ शकली. हे सगळं मूलतः रशियाच्या फायद्याचंच होतं.

या कोलांट्या उड्यांची कारणं जेवढी भारतीय, त्यापेक्षा कितीतरी जास्त आंतरराष्ट्रीय आहेत. माझं एक निरीक्षण असं आहे की, भारतात जे घडतं त्यासाठी आपण कुठल्या तरी भारतातील पक्षाला किंवा नेत्याला पूर्णतः जबाबदार धरतो. पण प्रत्यक्षात तसं नसतं. आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि समीकरणे त्यासाठी अगदी पूर्णतः नाही तरी बऱ्याच प्रमाणात कारणीभूत असतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर जे काही घडत असतं, त्याचं प्रतिबिंब भारतात पडत असतं. गेल्या महिन्यात मी पाँडिचेरीला गेलो होतो. एक टीचभर फ्रेंच वसाहत होती ती. अख्खा भारत इंग्रजांनी काबीज केला; अगदी अफगाणीस्तानपासून ब्रम्हदेशापर्यंत. पण हे छोटसं पाँडिचेरी (आत्ताचं नाव पुद्दूचेरी) जिंकायचा त्यांनी कधी प्रयत्नही केला नाही. त्याचप्रमाणे पोर्तुगीज अंमलाखालील गोवा आपल्यात सामील करून घ्यावा असं त्यांना एकदाही वाटलं नाही. मनात आणलं असतं, तर खरंतर एका दिवसात त्यांना गोवा जिंकता आला असता. तेच पाँडिचेरीबाबतही म्हणता येईल. पण तसं झालं नाही, याचं कारण युरोपात ब्रिटिश आणि पोर्तुगिजांमध्ये तसेच ब्रिटिश आणि फ्रेंच यांच्यात झालेले समझौत्याचे करार. त्यामुळे 'जिथं पोर्तुगिजांचा किंवा फ्रेंचांचा इंटरेस्ट आहे, तिथं आपण धक्का लावायचा नाही' ही ब्रिटनची भूमिका बनली होती. म्हणजेच इंग्रजांच्या भारतातल्या अनेक धोरणांवर उघडउघड आंतरराष्ट्रीय ठसा होता. तसंच भारतीय कम्युनिस्ट पक्षाबद्दल घडत गेलं. मॉस्कोतील कॉमिन्ट्रॉनच्या भूमिकेवरच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचं धोरण ठरत होतं. ही विसंगती काही प्रमाणात 'तिसरी चांदणी'मध्ये शब्दबद्ध झालीय; पण अधिकत्वाने ती 'कॉम्रेड'मध्ये आलीय.

**प्रश्न** : या दोन्ही कादंबऱ्या तुमच्या वयाच्या पंचविशीतल्या असाव्यात. त्याच काळात तुमचं शिक्षण पूर्ण झालं. त्यानंतर तुम्हाला एका आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत काम करायची संधी मिळाली. त्याच प्रक्रियेचा भाग म्हणून दीड वर्षं तुम्ही युरोपात तिथल्या वेगवेगळ्या कुटुंबांसोबत त्यांच्या घरी राहिलात असं तुमच्या पुस्तकात तुम्ही लिहिलं आहे. हा काळ इंटरेस्टिंग तर असणारंच, शिवाय तुमचा जगाविषयीचा दृष्टीकोन आकाराला येण्यामागे याचा सहभाग राहिला असणार. कादंबरीलेखनाची प्रक्रिया सुरू असतानाच तुम्ही तिथं होतात की तो काळ जरा मागे-पुढे होता?

कोणत्याही कादंबरीचं लेखन हे त्या विशिष्ट कालखंडातच होत नाही; आपल्या डोक्यात ते कथानक सतत शिजतच असतं. दीर्घकाळ चालणारी ती प्रक्रिया असते. पण प्रत्यक्ष कादंबरीलेखन हे त्या नंतरच्या काळातलं आहे. आधी तिसरी चांदणी आणि मग काही वर्षांनी कॉम्रेड असा तो क्रम आहे.

युरोपमधल्या वास्तव्याचा किंवा एकूणच पाश्चात्त्य संस्कृतीचाही माझ्यावर प्रभाव आहे. मराठी भाषा आणि साहित्यासाठी मासिक चालवणाऱ्या माणसानं असं बोलणं धाडसाचं आणि गैरसमजही निर्माण करणारं आहे; पण ज्याला आपण आधुनिक म्हणतो ती अनेक मूल्यं आणि


Date of Posting : 25-3-2024



रुपा चिनाय, शहनाझ अंकलेसरिया, जीन ब्राऊन (ऑस्ट्रेलिया), कल्पना शर्मा, मागे उभे आहेत ते लिंडा पिअर्स, माईक ब्राऊन, सुरेश वझिरानी, पुढे बसलेला कल्पनाच्या डाव्या हाताशी मी, आणि माझ्या डावीकडे कोपऱ्यात विनस् ऊर्फ विजय एन. सेठ.विन्स 501, अरुण चेंबर्स, ताडदेव येथे साधारण 45 वर्षांपूर्वी काढलेला फोटो

संस्था यांची निर्मिती बऱ्याच प्रमाणात युरोपात झालेली आहे. लोकशाही, निवडणुका, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता, पोलीस यंत्रणा, न्यायालये, आधुनिक विद्यापीठे, आधुनिक वास्तुशास्त्र, पर्यावरणप्रेम, उद्योगसंस्कृती, वैद्यक, नर्सिंग, तंत्रज्ञान, कामगार चळवळ या सगळ्याची सुरुवात मुख्यतः युरोपमध्ये झाली आहे. उदाहरणार्थ, कामगार चळवळीची सुरुवात इंग्लंडमधल्या 'ट्रेड युनियन काँग्रेस (टीयूसी)' या जगातल्या पहिल्या कामगार संघटनेपासून झाली आहे. आधुनिक जगातल्या बहुतेक विचारांची सुरुवातही मुख्यत्वे युरोपात झाली आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोही मार्क्सनं लंडनमध्येच लिहिला.

एक घटना मला ठळकपणे आठवते. पूर्व आणि पश्चिम असं जर्मनीचं दुसऱ्या महायुद्धानंतर विभाजन झालं हे सगळ्यांनाच माहिती आहे. पश्चिम जर्मनी हा देश मुक्त अर्थव्यवस्था राबवत होता तर पूर्व जर्मनी हा देश साम्यवादी अर्थव्यवस्था राबवत होता. त्यातला पश्चिम जर्मनी हा देश अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या प्रभावाखाली होता तर पूर्व जर्मनी हा देश रशियाच्या प्रभावाखाली होता. बर्लिन हे शहर पूर्व जर्मनीत होतं, पण एखाद्या बेटाप्रमाणे ते होतं; चारी बाजूंनी पूर्व जर्मनी या

*आमच्या हिंमतमधल्या दहा-बारा जणांच्या टीममधले जवळजवळ सगळेच त्यावेळी तरुण होते. ही सगळी मंडळी अतिशय प्रामाणिक, निष्ठावान आणि ध्येयवादी होती. राजमोहन गांधी हे मुख्य संपादक असले, तरी ते सगळी कामं स्वतः करत नव्हते. आर. एम. लाला संपादनाचं काम बघायचे. कल्पना शर्मा, निरजा चौधरी, रूपा चिनाई, शहनाझ अंकलेसरिया, संजय हझारिका, डेव्हिड डेविदार, विजिथा यापा वगैरे जवळजवळ सगळ्यांच्या आयुष्याची ती सुरुवात होती. आज आपापल्या क्षेत्रात त्यांची उंची खूप आहे. पण त्या सर्वांची सुरुवात हिंमत ही होती. ती 'नोकरी' असंही म्हणता येणार नाही, कारण सगळे नाममात्र मानधन घेऊनच काम करत होते. सगळे एकमेकांना पहिल्या नावाने हाक मारायचे. उच्च-कनिष्ठ असा काहीही भेदभाव नव्हता. हिंमतमध्ये कोणत्याही प्रकारचं कामाचं विभाजनही नव्हतं.*

देशाने वेढलेलं. त्या बर्लिन शहराचीही पूर्व बर्लिन आणि पश्चिम बर्लिन अशी फाळणी झाली होती. बर्लिन ही पूर्वी हिटलरची राजधानी असल्यानं असं महत्त्वाचं शहर कुठल्याच बाजूला दुसऱ्या बाजूसाठी पूर्णतः सोडायचं नव्हतं. त्यामुळे दोन्ही बाजूंनी एकत्र बसून बर्लिन शहराची फाळणी केली. पूर्व बर्लिन साम्यवादी सत्तेखाली आलं, तर पश्चिम बर्लिन मुक्त अर्थव्यवस्थेखाली आलं. मी तिकडे गेलो होतो तेव्हा माझा मुक्काम पश्चिम बर्लिनमधे होता. त्यावेळी मी रशियानं बर्लिनची फाळणी करण्यासाठी उभारलेल्या बर्लिन वॉलला अनेकदा भेट दिली होती. आपल्या साम्यवादी पूर्व जर्मनीतले लोक, पश्चिमेकडे जाऊ नयेत यासाठी बांधलेली ती भिंत होती. त्या भिंतीवर लोखंडी तारांचं कुंपण होतं आणि त्यातून विद्युतप्रवाह खेळवला जायचा. शिकारी कुत्रे त्या तटबंदीच्या अवतीभवती पहारा देत. कडक सशस्त्र सैनिक चोवीस तास तिथे असत. पण त्या सगळ्या जीवघेण्या संकटांवर मात करून कम्युनिस्ट पूर्व जर्मनीतले अनेक तरुण जिवाच्या करारानं पश्चिम जर्मनीत जायचे. म्हणजेच पूर्व बर्लिनमधून पश्चिम बर्लिनमधे यायचे. कारण, एकदा पश्चिम बर्लिनमधे त्यांनी प्रवेश केला की, आपण नक्की समृद्ध होऊ, याची त्यांना खात्री असायची. पश्चिमेची समृद्धी त्यांना थोडीफार ठाऊक झाली होती. शिवाय एकदा पश्चिम बर्लिनमधे गेलं की पश्चिम जर्मनीसह जगातील कोणत्याही मुक्त अर्थव्यवस्थेच्या देशात त्यांना जाता येत होतं. त्यासाठी जिवावर उदार व्हायला हे तरुण तयार होत, त्यांच्यापैकी अनेक त्या प्रयत्नात मृत्युमुखीही पडत. त्यांची ती धडपड बघणे हा माझ्यासाठी खूपच धक्कादायक अनुभव होता. लहानपणापासून मी 'सोव्हिएत लँड' हे नियतकालिक आणि त्यांची अन्य प्रकाशने वाचत होतो. तिथली सगळी प्रकाशनं आमच्याकडे फुकट यायची. पूर्व जर्मनीहूनदेखील अनेक प्रकाशने घरी यायची. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' या अनंत काणेकरांच्या रशियन प्रवासाचं वर्णन करणाऱ्या पुस्तकानं आम्हाला भुरळ घातली होती. बर्लिनमधली परिस्थिती बघितल्यावर 'ते सगळं खरं होतं का?' असा प्रश्न मला पडला. कम्युनिस्ट राजवट म्हणजे खरंच स्वर्ग होता का? आणि तसं असेल, तर हे सगळे पूर्व बर्लिनमधील बुद्धिमान तरुण स्वतःचा जीव धोक्यात टाकून पश्चिमेकडे का जात होते? बर्लिन भिंतीनं माझ्या तोवरच्या विचारसरणीलाच मोठा धक्का दिला.

**प्रश्न :** युरोपातल्या दीड वर्षांच्या काळात तुम्ही काय अनुभवलं? काय पाहिलं?

– याचं उत्तर म्हणजे खरं तर एका स्वतंत्र मोठ्या लेखाचा विषय आहे! तुम्ही विचारता म्हणून अगदी थोडक्यात दोन-चार गोष्टी सांगतो. तिथल्या युरोपियन कुटुंबांसोबत राहताना जे संस्कार माझ्यावर झाले, ते संस्कारशील वयात फारच महत्त्वाचे होते. आपली बॅग आपण उचलणं ही अगदी साधी गोष्ट. पण तिथे ती मी प्रथम अंगी बाणवली. त्यामुळेच आता माझी बॅग कुणी दुसरं उचलत असेल, तर त्यानंही मी अस्वस्थ होतो. किंवा माझी प्लेट अथवा कप मी स्वतः उचलून, विसळून ठेवणं हे माझ्यात नैसर्गिकपणे येतं. स्वतःचे कपडे स्वतः धुणं, शक्यतो आपली व्यक्तिगत कामं दुसऱ्याला न सांगणं, ती स्वतः करणं हा श्रमसंस्कार युरोपातूनच आलाय. दिलेला शब्द, तसेच दिलेली वेळ कटाक्षाने पाळणं हे तिथलेच संस्कार. त्याचबरोबर करुणेपोटी केलेली रुग्णसेवा किंवा समाजसेवा ही तिथलीच. स्वामी विवेकानंदांनीही म्हटलंय की, बायबलमध्ये जशी चॅरिटी सांगितली आहे, तशी कोणत्याही अन्य धर्मात नाही. हे सगळं थोडक्यात सांगणं फार अवघड आहे.

एक छोटासा प्रसंग सांगतो. एकदा मी आनंदवनात गेलो होतो. भारतीताई या बाबा आमटेंच्या सुनेशी बोलणं सुरू होतं. त्या पुण्यातल्या बी.जे. मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनी. त्या शिकत असतानाचा एक अनुभव त्या सांगत होत्या. त्यांच्याकडे एक पेशंट आला. त्याचा पाय पूर्णतः सडला होता, पू वगैरेही झाला होता. त्याला हात लावायचीही त्यांना भीती वाटत होती. तिथं शेजारीच एक केरळची कॅथलिक ख्रिश्चन नर्स होती. तिनं मात्र सरळ तो सडलेला पाय उचलला, आपल्या मांडीवर घेतला, ड्रेसिंग केलं, सगळं साफही केलं. 'तुला हे सगळं करताना त्याची किळस वाटली नाही का?' असं भारतीताईंनी त्या ख्रिश्चन नर्सला नंतर विचारलं. त्यावर ती नर्स म्हणाली, 'अजिबात नाही. कारण माझा येशू स्वतः हे करायचा' अशी रूग्णसेवा हे मुख्यतः पाश्चिमात्यांचं योगदान आहे. स्वतः नास्तिक असलेले एसेम जोशी जेव्हा रुग्णालयात अखेरच्या घटका मोजत होते तेव्हा त्यांनाही आलेला एका कॅथॉलिक नर्सचा अनुभव असाच असल्याचं त्यांनी लिहून ठेवलं आहे.

**प्रश्न :** या सगळ्या अनुभवांवर एखादी छोटी पुस्तिका, पुस्तक किंवा फारतर एखादा दीर्घलेख लिहावा असं तुम्हाला कधीच नाही वाटलं?

– पुस्तक वगैरे कधी नाही लिहिलं; पण 'माणूस' साप्ताहिकात मी तेथील अनुभवांवर आधारित दोन दीर्घ लेख लिहिले होते. त्यांचं शीर्षक होतं, 'गरीब राष्ट्रे आणि श्रीमंत राष्ट्रे'. इतिहासात सगळं जग गरीबच होतं; काही मूठभर राजेरजवाडे किंवा जमीनदार श्रीमंत असतीलही, पण जगातील सर्वसामान्य जनता साधारण सोळाव्या शतकापर्यंत गरीबच होती. त्यानंतर सोळाव्या–सतराव्या शतकापासून जी क्रांती झाली, त्यात मध्यमवर्ग पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर उदयाला आला. तसं पाहिलं तर समाजाची गरिबी सगळ्याच राष्ट्रांना दूर करायची होती. 'गरिबी हटाओ'चा नारा एका अर्थाने जगभराचा होता! पण मग काही देशांमध्येच ती गरिबी का दूर झाली आणि काही देशांमध्ये ती दीर्घकाळ का कायम राहिली याचं विश्लेषण त्या दोन लेखांत मी केलं होतं. या पाश्चात्त्य देशांनी त्यांच्या वसाहतींच्या केलेल्या शोषणातून श्रीमंती निर्माण झाली असं अनेक भारतीय मांडतात. तसं त्यांनी आपलं शोषण केलंही; कारण शेवटी ते जेते होते आणि आपण जीत होतो. पण त्यांनी केलेलं वसाहतींचं शोषण हे त्यांच्या श्रीमंतीचं एकमेव कारण होतं हे मात्र मला कधीच पटलं नाही. उदाहरणार्थ, स्वित्झर्लंडसारखा जगभरात एकही वसाहत नसणारा देश युरोपात सगळ्यात श्रीमंत आहे. वसाहतींच्या शोषणातूनच संपत्ती निर्माण झाली असती, तर स्वित्झर्लंड वर्षानुवर्षांपासून सगळ्यात श्रीमंत कसा? उलटपक्षी, जगभरात सगळ्यात जास्त काळ वसाहती असणारा पोर्तुगालसारखा देश युरोपात सगळ्यात गरीब आहे. म्हणजे संपत्तीची कारणं इतकी साधी, वरवरची नाहीत. मग ती नेमकी काय असतील याचाही वेध मी त्या लेखात घेतला होता. मी अर्थतज्ज्ञ नसल्यामुळे माझ्या मताला कोण किंमत देणार, असा विचार करून पुढे या विचारावर मी काहीही लिहिलं नाही!

**प्रश्न :** तुमच्या अंतर्नादपूर्व वाटचालीतला एक भाग म्हणजे 'हिंमत' नावाचं इंग्रजीतून प्रकाशित होणारं नियतकालिक. राजमोहन गांधी हे त्याचे संपादक होते. हिंमतबरोबरच्या काळानं तुम्हाला काय दिलं?

– त्या काळानं मला खूप काही दिलं. आमच्या हिंमतमधल्या दहा–बारा जणांच्या टीममधले जवळजवळ सगळेच त्यावेळी तरुण होते. ही सगळी मंडळी अतिशय प्रामाणिक, निष्ठावान आणि ध्येयवादी होती. राजमोहन गांधी हे मुख्य संपादक असले, तरी ते सगळी कामं स्वतः करत नव्हते. आर. एम. लाला संपादनाचं काम बघायचे. कल्पना शर्मा, निरजा चौधरी, रूपा चिनाई, शहनाझ अंकलेसरिया, संजय हझारिका, डेव्हिड डेविदार, विजिथा यापा वगैरे जवळजवळ सगळ्यांच्या आयुष्याची ती सुरुवात होती. आज आपापल्या क्षेत्रात त्यांची उंची खूप आहे. पण त्या सर्वांची सुरुवात हिंमत ही होती. ती 'नोकरी' असंही म्हणता येणार नाही, कारण सगळे नाममात्र मानधन घेऊनच काम करत होते. सगळे एकमेकांना पहिल्या नावाने हाक मारायचे. उच्च–कनिष्ठ असा काहीही भेदभाव नव्हता. हिंमतमध्ये कोणत्याही प्रकारचं कामाचं विभाजनही नव्हतं. त्यामुळे मासिकाचे गठ्ठे उचलण्यापासून सगळी कामं सगळे करत होते. ते एक वेगळंच वातावरण होतं. पुढे अनेक कारणांनी हिंमत बंद पडलं. ही सगळी मंडळी विखुरली. राजमोहन गांधी अमेरिकेत शिकवायला गेले आणि चरित्रकार झाले. रुसी लाला दोराब टाटा ट्रस्ट या टाटांच्या सर्वांत मोठ्या ट्रस्टचे डायरेक्टर बनले; टाटांचे अधिकृत चरित्रकार बनले. कल्पना शर्मा 'हिंदू'मध्ये, तर रूपा चिनाई 'टाइम्स'मध्ये गेली. शहनाझ अंकलेसरियाने स्वामिनाथन अय्यर यांच्यासोबत लग्न केलं आणि ती अमेरिकेत स्थायिक झाली. निरजा चौधरी 'इंडियन एक्सप्रेस'मधे गेली. आज जवळजवळ रोजच टीव्हीवरच्या कुठल्या ना कुठल्या परिसंवादात ती असते. दिल्लीहून पुण्यात आली की अनेकदा मला भेटते. पण बाकी कुणाशी मात्र माझा फार काही संपर्क येत नाही. परंतु एक सांगावंसं वाटतं की, पत्रकारितेत ज्या प्रकारचे समझोते केले जातात, तसे यांच्यापैकी कोणीच कधी केले नाहीत.

हिंमतमध्ये काही गोष्टी खूप कटाक्षाने पाळल्या जायच्या. त्या तिथे माझ्या अंगवळणी पडल्या. तुम्ही जे काही लिहाल, ते अचूक आहे की नाही याची खात्री करून घ्यायची, त्यात कंटाळा करायचा नाही, गरज पडेल तसे संदर्भ तपासायचे. त्यावेळी गुगल नव्हतं. त्यामुळे वेगवेगळी पुस्तकं वाचायला लागायची; पण छापू ते अचूकच असलं पाहिजे, असा आग्रह असायचा. पुस्तकात नसेल, तर वेगवेगळ्या माणसांना भेटणं अपेक्षित

असायचं. आपल्या लेखनात स्वतःचा ब्रँड पुढे न रेटणं हेही तिथं शिकायला मिळालं. वाचन, व्यासंग, मेहनतीनं काम करणं, वक्तशीरपणा असे बरेच गुण हिंमतमध्ये मला प्रत्यक्ष बघायला आणि शिकायला मिळाले.

एकदा नानासाहेब गोरेंची मुलाखत घ्यायला मी पुण्याला आलो होतो. सदाशिव पेठेत त्यांचं घर शोधलं, दिवसभर त्यांच्या सोबत राहिलो. तेव्हा दिल्लीवरून जनता पार्टीनं त्यांची नेमणूक लंडनमध्ये हाय कमिशनर म्हणून केली होती. मी त्यांच्यावर एक लेख लिहिला होता, 'फ्रॉम सदाशिव पेठ टू इंडिया हाऊस'. दत्ता सामंतांवर एक प्रदीर्घ मुखपृष्ठकथा केली होती. जयप्रकाश नारायणांच्या आंदोलनामध्ये आपापले कॉलेज सोडून सामील झालेल्या तरुणांचं पुढं काय झालं हे शोधण्यासाठी मी पटण्यालाही गेलो होतो. त्यातल्या अनेक तरुणांना भेटलो. अशा विविध प्रकारचं लेखन इंग्रजीत करायची संधी मिळाली हे हिंमतचं माझ्यावरचं मोठं ऋण आहे. मी त्यापासून पूर्णतः कधीच मुक्त होऊ शकणार नाही. पुढे हिंमतमधल्या निवडक लेखांचं एक संकलन मी हिंमत पब्लिकेशन्स ट्रस्टच्या वतीनं माझ्या पुढाकारातून प्रसिद्ध केलं. कुमार केतकरांच्या हस्ते 2 ऑक्टोबर 2009 रोजी वरळीला नेहरू सेंटरला त्याचं प्रकाशन झालं. त्याचं थोडं समाधान मनात आहे.

हिंमतमधली सगळी मंडळी प्रामाणिक होती, पण एक गोष्ट लक्षात आली की, ती सारी मंडळी आंग्लाळलेली होती. ते अशा अर्थानं की, त्यातल्या कुणाचंच शिक्षण आपल्या मातृभाषेत झालं नव्हतं. मी मराठीत लिहितो, मराठी भाषेबद्दल मला ममत्व आहे हे त्यांना माहीत होतं; पण त्यांच्यापैकी कुणालाच कोणत्याही भारतीय भाषेबद्दल तसं प्रेम नव्हतं. त्यामुळे मी अंतर्नाद सुरू करायचं ठरवलं, तेव्हा मी 'वरच्या पायरीवरून खालच्या पायरीवर आलो' असं त्यांना वाटत असावं. एक सुरेश वझिरानी सोडला, तर त्यांच्यापैकी कुणीही अंतर्नादमधे रस दाखवला नाही. त्याविषयी माझ्या मनात काही राग मात्र नाही; कारण माझी त्यांच्याकडून तशी अपेक्षाही नव्हती. ती मंडळी वागायला साधीच होती. त्यांनी कुठलंही बुरखा वगैरे पांघरलेला नव्हता. खोट्या नम्रतेचा आवही नव्हता. मात्र माझ्यापुरता आयुष्यातला तो अध्याय संपला आहे असंच मी समजतो.

**प्रश्न :** हिंमतनंतर एक मोठा वळण बिंदू आला आणि तुमच्या आयुष्याचा उत्तरार्ध सुरू झाला. हिंमत आर्थिक आणि अन्य कारणांमुळे डबघाईला येणं ही प्रक्रिया एका बाजूला चालू असताना तुम्ही अंतर्नाद सुरू करण्याचा निर्णय घेतला का? का काही झालं तरी एक मराठी मासिक मला सुरू करायचंय हे तुमचं आधीच ठरलं होतं?

– हे दोन्ही मुद्दे तसे बरोबर आहेत. मी आणि वर्षानं लग्न करायचं ठरवलं, तेव्हा त्याआधीच आमची मराठी मासिक सुरू करण्याविषयीची चर्चा चालायची. कारण मासिकं वाचून आमच्या जीवनात प्रचंड आनंद निर्माण झाला होता; आम्ही त्या वाचनातून बरंच काही शिकलो होतो. पण त्याच वेळी मराठी मासिकांची दैन्यावस्था आम्हाला ठाऊक होती. आमच्याकडे आर्थिक भांडवल काहीही नव्हतं. त्यामुळे मासिकावर आपला संसार चालणार नाही याचीही जाणीव होती. तेव्हा 'आपल्या आमटी-भाताची सोय होईपर्यंत आपण प्रिंटिंग बिझनेस करू आणि सोय झाली असं वाटलं की मग मात्र लगेचच मासिक सुरू करू' असं आम्ही ठरवलं होतं; शिवाय त्यासाठी फार वय होईस्तोवर थांबायचं नाही हेही ठरवलं होतं. कारण बरेच लोक आयुष्यात जे त्यांना मनापासून करावंसं वाटतं, ते करण्यासाठी अगदी वृद्धावस्थेपर्यंत वाट पाहतात. तोवर बराच उशीर झालेला असतो. प्रत्येकानं त्याचा 'अंतर्नाद' ऐकून त्यानुसार वागायचा प्रयत्न शक्य तितक्या लवकर करायला हवा असं आम्हाला वाटायचं. त्यानुसार मग साधारण 1993 साली आम्ही आयुष्याचा नीट आढावा घेतला. विचार केला, की आपल्या गरजा आता बऱ्यापैकी पुऱ्या होतील इतकी तजवीज झालेली आहे, आपल्याला एकच मुलगी आहे, आपल्याला कुणाचं कर्ज नाही. त्यामुळे थोडाफार धोका पत्करूनही आता आपण मासिक सुरू करू शकतो. त्यासाठी पुण्याला जायचं आम्ही ठरवलं. ते चूक होतं की बरोबर, हे सांगणं आता अवघड आहे. पण त्या काळी पुण्यात जागेच्या किमतीही खूप कमी होत्या. त्यामुळे ते फार काही जड गेलं नाही. अर्थात हे सारं स्थित्यंतर सहजगत्या झालं असंही नाही. प्रत्येक दिवस बऱ्यापैकी संघर्षाचा होता.

...

# ‘अंतर्नाद’चे संपादन करताना...
## भानू काळे

### संवादक : विनोद शिरसाठ / शब्दांकन : रेणुका कल्पना



अंतर्नाद सुरू करण्यापूर्वी सुरू केलेल्या ऊर्मी वाचनालयात स्नेहा अवसरीकर व वर्षा काळे

‘अंतर्नाद’चे संपादक ‘भानू काळे’ यांची दीर्घ मुलाखत आपण दोन भागात घेत आहोत. पूर्वार्धामध्ये अंतर्नाद सुरू होण्यापूर्वीचा, वयाच्या चाळीशीपर्यंतचा टप्पा आला आहे. त्या काळातलं त्यांचं वाचन, त्यांचं लेखन, त्यांनी ‘हिंमत’ या साप्ताहिकात केलेलं काम हे सगळं आलंय. त्या सगळ्या प्रक्रियेतून ‘भानू काळे’ नावाचे एक संपादक कसे आकाराला आले हे स्पष्ट होतं. या संपादकाची पूर्वतयारी कशी झाली हे समजून घेण्यासाठी हा पूर्वार्ध खूप महत्त्वाचा आहे. त्यातल्या शेवटच्या प्रश्नात ‘अंतर्नाद’ सुरू करण्याचा निर्णय फार पूर्वीच घेतलेला असला, तरी तिथपर्यंत पोचण्याची नेमकी प्रक्रिया काय होती, हे थोडक्यात आपल्याला सांगितलंय. मुलाखतीच्या उत्तरार्धात अंतर्नादची पाव शतकाची - नेमकेपणानं सांगायचं, तर 26 वर्षांची वाटचाल कशी होती, ते आपण बघणार आहोत.

ऑगस्ट 1995 मध्ये ‘अंतर्नाद’ हे मासिक सुरू झालं. त्यासाठी 1994 मध्ये भानू काळे त्यांच्या पत्नीसह मुंबईवरून पुण्याला स्थायिक झाले. पुण्यातून मराठी साहित्य आणि संस्कृती यांचं संवर्धन करण्यासाठी त्यांच्या मासिकाच्या माध्यमातून योगदान द्यावं, अशी त्यांची प्रामाणिक भूमिका होती. त्या भूमिकेसह अतिशय सचोटीने, पारदर्शकतेनं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे गुणवत्ता आणि दर्जा हे दोन्हीही राखून त्यांनी पाव शतक काम केलं.

अंतर्नादचा प्रारंभ कसा झाला, त्यात काय चढ-उतार आले, अंतर्नादमधून आत्ताचं ‘मानस’ कसं आकाराला आलं आणि या मासिकानं मराठी साहित्याला काय दिलं असा चर्चासंवाद होईल.

**प्रश्न** : 1994 मध्ये तुम्ही पुण्यात आला, तेव्हा तुम्हाला 'हिंमत'ची पार्श्वभूमी होती. राष्ट्रीय स्तरावरच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या नामवंतांचा सहवास तुम्हाला लाभला होतात आणि तुम्ही त्यांच्या संपर्कातही होतात. मराठी, इंग्रजीचं उत्तम वाचन होतं. दोन कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या होत्या. तोपर्यंत तुम्ही वयाच्या चाळीशीत आला होतात. म्हणजे समोरच्या वीस ते पंचवीस वर्षांची बांधणी तुम्हाला दोघांनाही करावी लागली असणार. अशा पार्श्वभूमीवर फार परिचय नसलेल्या एका शहरात जाऊन एक मासिक सुरू करायचं यासाठी तुम्ही कोणत्या स्वरूपाची तयारी केलीत?

– ही पूर्वतयारी मी पुण्याला आल्यावर नव्हे तर मुंबईत असतानाच, म्हणजे साधारण 1993 साली सुरू केली होती. सगळ्यात पहिले म्हणजे माझ्याकडे संग्रही असलेले आणि अन्यत्र उपलब्ध होऊ शकणारे नव्या-जुन्या मासिकांचे जास्तीतजास्त अंक चाळून घेतले. त्यातल्या उणिवा कोणत्या होत्या, जमेच्या बाजू कोणत्या होत्या या सगळ्यांची पद्धतशीर नोंद करत गेलो. मराठी मासिकांना साधारण नव्वदचं दशक सुरू होतानाच अवकळा आली होती, हे तर उघड होतं. त्यांच्या हातून झालेल्या चुका आपण टाळाव्या आणि अधिक चांगली निर्मिती करू या, असा प्रयत्न होता. त्यानंतर या मासिकामागची आपली नेमकी भूमिका काय आहे आणि कशाकरता आपण हे सुरू करतो आहोत, ते कागदावर लिहिलं. त्यात समाविष्ट नव्हता असा एक व्यक्तिगत भाग म्हणजे मला आयुष्यात कधीच सर्वसामान्य माणसाप्रमाणे जगायचं नव्हतं. एक प्रकारचा आदर्शवाद माझ्या आयुष्यात नेहमीच होता. ज्यात आपली आवड जोपासली जाईल, पण त्याचबरोबर समाजालाही काही लाभ होईल अशा प्रकारचा काही उपक्रम करायचा असं आमच्या डोक्यात होतं. त्यामुळे हे सगळे विचार मी लिहून काढले. त्यात मराठी भाषेचं, मातृभाषेचं नेमकं महत्त्व काय आणि तिचं संवर्धन कशासाठी करायचं हेही होतं. हाच आमच्या कामाचा गाभा होता. त्यामुळे त्याबद्दलची कोणतीही मोघम, अर्धकच्ची भूमिका मला नको होती.

मातृभाषा हा आपला सगळ्यात मोठा सांस्कृतिक वारसा आहे, दोन माणसांना जोडणारा हा सर्वात महत्त्वाचा पूल आहे, आपल्या खोलवरच्या भावनांची अभिव्यक्ती मातृभाषेतच प्रभावीपणे होऊ शकते अशा सगळ्या गोष्टी मी लिहून काढल्या. त्याचबरोबर मासिक या प्रकाराचं वेगळेपणही मी लिहून काढलं. वृत्तपत्रात प्रत्येक घटनेवर घाईघाईनं भाष्य करणं आवश्यक असतं. उद्या ती बातमी शिळी होणार असते. पण मासिकाची ती गरज नसते. त्यामुळे मासिकानं प्रकाशित केलेल्या लेखनाकरता पुरेसा वेळ देता येतो. वाचकाच्या वेळेवरही मासिक आक्रमण करत नाही. त्याला वाचायला पुरेसा अवधी मिळतो. मासिक हे माध्यम साहित्याच्या प्रकटीकरणाकरता मला सर्वाधिक उपयुक्त वाटतं. त्याची पूर्वाश्रमीची उदाहरणं मी अभ्यासली होती. 'सत्यकथा', 'किर्लोस्कर', 'स्त्री' यांच्यासारख्या मासिकांनी किती मोठं योगदान दिलं आहे ते मला माहीत होतं. त्यामुळे मासिक हेच माध्यम निवडायचं याविषयी शंका नव्हती.

त्यातून ते तयार झालेलं निवेदन या क्षेत्रातील माझ्या माहितीतल्या साधारण 40-50 जणांना पाठवलं. शक्य होतं त्या सगळ्या लोकांना प्रत्यक्ष भेटलो. साहित्यवर्तुळातल्या माझ्या माहितीच्या माणसांशी चर्चा केली. व्यावहारिकदृष्ट्या विचार केला तर मासिक सुरू करायच्या आधीच त्याचं नाव निश्चित करून घ्यावं लागतं. 'रजिस्ट्रार फॉर न्यूजपेपर्स ऑफ इंडिया' या माहिती आणि प्रसारण खात्याच्या मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या केंद्रीय शासकीय संस्थेत अर्ज करावा लागतो. कलेक्टरकडे जाऊन डिक्लेरेशन करावं लागतं. अशा इतरही काही तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागते. या सगळ्या गोष्टी जुळण्यामध्ये साधारण एक-दीड वर्ष गेलं. 'अंतर्नाद' हे मला हवं असलेलं नावच सुदैवाने मला मंजूर झालं. माझ्या एकूण जीवनविषयक धारणेशी मिळताजुळता असल्यानं 'अंतर्नाद' हा शब्द मला खूप प्रिय होता.

कोणतीही कला म्हणजे त्या कलाकाराचा अंतर्नादच असतो. तो त्याचा खराखुरा अंतर्नाद असेल, तरच त्या कलेला जिवंतपणा, उत्कटता प्राप्त होते. माझ्याशेजारीच माझ्या भावाचा वर्गमित्र (आणि पर्यायानं माझाही) श्रीनिवास तळवलकर याची प्रिंटिंग प्रेस होती. तो आणि मी वरचेवर एकमेकांना भेटायचो, गप्पा मारायचो. त्याच्या कुटुंबात सगळे बहुतेक डॉक्टरच होते. पण तो स्वतः मात्र एक मुद्रक होता. स्वाध्याय परिवाराचे जनक पांडुरंगशास्त्री आठवले यांचा तो जावई होता. शास्त्रींच्या

स्वाध्याय परिवाराचं काम जगभर पसरलं होतं. त्यांच्या पुस्तकाची छपाई जेकब सर्कलला असलेल्या त्यांच्या एका प्रेसमध्ये व्हायची. पण तेही काम श्रीनिवासच सांभाळायचा. त्यामुळे त्याला पुस्तकप्रकाशनाची आणि एकूणच साहित्यविश्वाची बरीच माहिती होती. त्याच्याशी गप्पा मारताना अंतर्नाद हे नाव पुढं आलं होतं. पुण्याला मुंबईपेक्षा जास्त चांगलं साहित्यिक वातावरण आहे असा माझा समज होता म्हणून इथं पुण्याला यायचं ठरलं. मला वाटतं ललितमध्ये 'ठणठणपाळ' यांचे लेख वाचून माझा तो समज झाला होता! श्री. ज. जोशी, विद्याधर पुंडलीक, वि. ग. कानिटकर वगैरे पुण्यातील साहित्यिकांविषयी विनोदी शैलीने ठणठणपाळ अनेकदा लिहीत असे! शिवाय बऱ्याच प्रकाशकांची कार्यालये वगैरेही पुण्यातच अधिक होती.

पुण्यात आलो, तेव्हा पुण्यात आमचा दोघांचाही एकही नातेवाईक नव्हता. तरीही पुणं योग्य ठरेल असं आम्हाला वाटत होतं. तेव्हा पुण्यात स्वस्ताई होती. त्यामुळे औंधला फ्लॅट घेणं वगैरे जमून गेलं. सुरुवातीला गॅस सिलेंडर घेणं, बँक खातं उघडणं, मुलीला शाळेत प्रवेश घेणं वगैरे बरीच व्यावहारिक कामं करण्यात काही दिवस निघून गेले. पण मग त्यानंतर दिवसभर करायचं काय असा प्रश्न होता. मासिकाची पूर्वतयारी एकीकडे चालू असली तरी ते प्रत्यक्ष सुरू झालं नव्हतं व त्यामुळे तेव्हा मोकळा वेळ असा बराच असायचा. तेव्हा मग आम्ही औंध येथेच 'ऊर्मी वाचनालय' सुरू केलं. सुदैवाने आम्हाला त्यासाठी चांगली अशी जागाही मिळून गेली. वाचनालयाचं बहुतेक सर्व काम माझी पत्नी वर्षाच बघायची. तिच्या मदतीला मयुर जोगळेकर नावाचा जवळच राहणारा एक विद्यार्थी काम करायचा. आता तो मोठा वकील झाला आहे. जवळपास पुढची दहा वर्षं ऊर्मी वाचनालय उत्तम चाललं. तेच अंतर्नादचंही कार्यालय होतं. त्याच जागेत पार्टिशन घालून आम्ही दोन भाग केले होते. पुढच्या भागात वाचनालय आणि मागच्या भागात अंतर्नाद कार्यालय. मुख्य रस्त्यावर असल्याने आणि पार्किंगला समोर बरीच जागा असल्याने ऊर्मी वाचनालय चांगलं चालायलाही लागलं. त्याचा प्रचार करताना सांगितलेल्या गोष्टीही लोकांना भावल्या असाव्यात. 'तुम्ही तीस-चाळीस वर्षांपूर्वी वाचलेला रॉबिन हूड किंवा इसाप आजही आठवतो. पण टीव्हीवर परवा बघितलेल्या सिरियलमधल्या अमुक अमुक पात्राचं पुढे काय झालं असं विचारलं, तर ते आठवणार नाही. मानवी मनावर दीर्घकाळ टिकणारे संस्कार करण्याची लिखित शब्दांची क्षमता आजही अतुलनीय आहे', अशा काही गोष्टींचा समावेश असलेलं एक पत्रक आम्ही औंध भागात वाटलं होतं. त्याला छान प्रतिसाद मिळत गेला आणि बघताबघता पाचशे जण वाचनालयाचे सदस्य झाले. पुण्याला आलो तेव्हा आम्हाला ओळखणारं तिथे कुणीही नव्हतं. तशा औंध भागात आम्हाला एक वेगळी ओळख देऊन आमची ती आंतरिक गरज ग्रंथालयानं भागवली. त्यात आम्ही इंग्रजी पुस्तकंही ठेवायचो. त्यामुळे आजूबाजूच्या अमराठी लोकांमध्येदेखील आम्हाला एक ओळख प्राप्त झाली

ऊर्मी वाचनालयातच अंतर्नाद मासिकाची सुरुवात झाली. सुरुवातीला वाचनालयाचं काम बघता बघता अंतर्नादचंही व्यावहारिक काम वर्षा पाहायची. हळूहळू लोकांशी संपर्क वाढत गेला. ज्याला आज नेटवर्किंग म्हणतात, असे 'ओळखीचे धागे जुळत जाणं' हे मासिकासाठी खूप आवश्यक होतं. मी कोणत्याही राजकीय पक्षाचं, विचारधारेचं, संघटनेचं प्रतिनिधित्व करत नव्हतो. त्यामुळे त्यांच्या रेडिमेड नेटवर्कचा मला काहीही उपयोग नव्हता. त्यामुळे अंतर्नादचं हे नेटवर्क स्वतः निर्माण करण्यात काही वेळ गेला, पण मासिकाची सुरुवात यथास्थित झाली. संपादन आणि व्यावहारिक कामं ही मासिकाची दोन महत्त्वाची चाकं सुरू झाली. अर्थात त्या दोन्ही पातळ्यांवर अडचणी येत होत्या, त्या आम्ही सोडवत गेलो. एका मासिकाचा उदयास्त या पुस्तकात हे सारं विस्ताराने लिहिलं आहे.

**प्रश्न** : ऑगस्ट 1995 नंतरचं सुरुवातीचं पहिलं वर्ष अर्थातच अतिशय महत्त्वाचं असणार. त्या काळात आपली पुढची वाटचाल कशी होईल याबद्दल संभ्रम निर्माण होऊ शकतो किंवा विचार डळमळीत होऊ शकतात. त्यात मालक, चालक, संपादक अशा दोन-तीन भूमिका तुम्ही निभावत होतात. त्याचं अर्थकारण जुळवणंही चाललं होतं. पुणेकरांसाठी तुम्ही नवीन होतात. आजच्या तुलनेत, पुण्यात कितीही नाही म्हटलं, तरी साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात दिग्गज म्हणावेत अशा लोकांची संख्या बरीच होती. पहिल्या महिन्यात मासिकाचे शंभरएक जण वर्गणीदार झाले आणि पहिल्या

वर्षाच्या शेवटाला एक हजार वर्गणीदार असा तुमचा प्रवास झाला. हा प्रवास कसा होता? ज्या ऊर्मीने तुम्ही मासिक सुरू केलं, ती वर्षअखेर टिकून होती की मन थोडं चिंतीत झालं होतं?

– उलटंच होत होतं. आमची उमेद सतत वाढतच गेली होती. साधारण 2012 पर्यंतची वर्षं ही उमेदीची, उत्साहाची, आनंदाची अशीच होती. आम्हाला सहकार्य करणारे अनेक जण भेटल्यानं आम्ही त्या काळात कधीही खचून गेलो नाही. अंतर्नादच्या पहिल्या अंकाचं प्रकाशन आनंद यादव यांच्या हस्ते झालं आणि त्या प्रकाशन समारंभाच्या शान्ता शेळके अध्यक्ष होत्या. समारंभात मुकुंदराव किर्लोस्कर हेही उत्स्फूर्तपणे बोलले होते. ही सर्वच मंडळी त्यावेळी साहित्यक्षेत्रात खूप नामांकित होती. प्रकाशनाला साहित्यक्षेत्रातील सगळ्या वयोगटातली माणसं आली होती. 'इथे उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांना मी विनंती करते की, मानधनाची कोणतीही अट न घालता, आपलं उत्तोमत्तम लेखन त्यांनी अंतर्नादकडे द्यावं', असं आवाहन शान्ताबाईंनी त्यावेळी आपल्या भाषणात केलं होतं. लवकरच त्याची सुरुवात त्यांनी स्वतःपासून केली. 'कविता स्मरणातल्या' नावाचं एक सदर त्यांनी अडीच–तीन वर्षं चालवलं. केशवसुतांची 'तुतारी' किंवा बालकवींची 'फुलराणी' ही मराठी काव्यजगतातली उत्तुंग शिखरं आहेत. पण कधीकधी प्रतिभेच्या अवचित परिस स्पर्शानं छोट्याछोट्या टेकड्याही उजळून निघतात. तुलनेनं अप्रसिद्ध असलेली एखादी कविता अतिशय दर्जेदार असू शकते. अशा प्रकारची एक कविता आणि तिचं उत्तम रसग्रहण ('समीक्षा' हा जडजंबाल शब्द इथे अयोग्य ठरेल) असं या सदराचं स्वरूप होतं. मासिकाची साधारण अडीच–तीन पानं या सदरासाठी राखीव होती. त्या वर्षी शांता शेळके आळंदीला भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष होत्या. त्यामुळे त्यांनी लिहिलेलं असलं सदर छापायला त्यावेळी कोणतंही नियतकालिक, किंवा वृत्तपत्रही, आनंदाने तयार झालं असतं; पण तरीही त्यांनी ते आमच्या नुकत्याच सुरू झालेल्या मासिकाला दिलं याबद्दल माझ्या मनात खूप कृतज्ञता आहे. मला आठवतं, सुरुवातीला आम्ही त्यांना एका लेखाचे फक्त अडीचशे रुपये मानधन देत होतो. त्यांच्या एकूण साहित्यिक स्थानाच्या मानाने ते नगण्यच होतं. नंतर ते आम्ही चारशे रुपये केलं. तेही खरंतर अपुरंच होतं. कारण त्या पूर्णवेळ लेखिका होत्या, प्रोफेशनल लेखिका होत्या; पण त्यांनी आमच्या अल्प मानधनाबद्दल एका शब्दानेही कधी तक्रार केली नाही. उलट एकदा त्या 'मला एवढे पैसे देत जाऊ नका', असंही म्हणाल्या होत्या. अर्थात प्रत्येकाला मानधन द्यायचंच हे बंधन आम्ही स्वतःवर पहिल्या अंकापासूनच घालून घेतलं होतं. इतरही अनेक चांगल्या लेखकांचं लेखनही अंतर्नादला मिळत गेलं. भारतासारख्या बहुभाषिक देशात अनुवाद हा साहित्यप्रकार खूप महत्त्वाचा आहे याची जाणीव असल्याने अनुवादावर आमचा प्रथमपासून भर होता. धारवाडला आयुष्य घालवलेले, साहित्यविश्वात फारसे परिचित नसलेले श्री. भा. श्रोत्री नावाचे एक प्राध्यापक होते. जर्मन साहित्यावर पीएच.डी. करणारी ही पहिलीच मराठी व्यक्ती. जर्मन भाषेवर त्यांचं असाधारण प्रभुत्व होतं. अनेक जण मूळ भाषेतले अनुवाद करत नाहीत, तर त्याच्या हिंदी किंवा इंग्रजी अनुवादावरून करतात. पण श्रोत्री मूळ जर्मन कथेवरून अनुवाद करायचे. त्यांचे अनेक अनुवाद आम्ही छापले. असे अनेक लेखक आम्हाला मिळत गेले; काही नामांकित, तर काही फारसे परिचित नसलेले.

लक्ष्मण लोंढे हे माझे आवडते लेखक होते. त्यांचं 'लक्ष्मणझुला' हे सदर आम्ही पहिल्या अंकापासून सुरू केलं होतं. निसर्ग, अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारं ते सदर साधारण तीन पानी असायचं. त्यांच्या लेखनातील टापटीपदेखील मला विशेष आवडायची. त्या काळी मराठी लेखक फारसे संगणक शिकलेले नव्हते. ते हातानेच लिहायचे. आम्ही अंतर्नाद सुरू केलं, त्याच वर्षी भारतात मोबाईल आणि इंटरनेटला सुरुवात झाली. पण मराठी लेखक त्यापासून खूप दूर होते. तशा काळातही लोंढे आपला सगळा लेख संगणकावर व्यवस्थित टंकित करून नेमक्या शब्दांत मला पाठवायचे. त्याचं फार कौतुक वाटायचं. अनंत सामंत यांचं ठणठणपाळच्या शैलीतील खुमासदार लेखन 'टोच्या मिरच्या' या नावानं आम्ही पहिलं एक वर्ष छापलं.

सहसा कुणी छापले नसते, असे काही वेगळ्या प्रकारचे लेखही आम्ही छापले. उदाहरणार्थ, पन्नासाव्या



डावीकडून- भानू काळे, आनंद यादव, शांता शेळके, मुकुंदराव किर्लोस्कर आणि वर्षा काळे

स्वातंत्र्यदिनाच्या वेळी आम्ही मुसाई सिंग नावाच्या क्रांतिकारकाचा परिचय करून देणारा एक विस्तृत लेख छापला होता. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वांत जास्त तुरुंगवास भोगणारा हा योद्धा. पन्नास वर्षांहून अधिक काळ तो अंदमानला तुरुंगात होता. त्याच्यावर केसरीच्या वा. द. दिवेकरांनी इंग्रजीत लिहिलेलं लेखन वि. ग. कानिटकरांनी आमच्यासाठी अनुवादित केलं होतं. वेगवेगळ्या लेखकांशी वेगवेगळ्या व्यक्तीच्या मार्फत माझा संपर्क होत गेला. सदानंद देशमुखांची त्यांनी उमेदवारीच्या काळात लिहिलेली एक खूप सुंदर दीर्घकथा मला अजून आठवते. खोट्या बियाणांच्या वापरामुळे एका शेतकऱ्याचं पीक उद्ध्वस्त झाल्यावर त्या शेतकऱ्याच्या दुःखाचा जो उद्रेक होतो त्याचं त्यात चित्रण होतं.

अशीच अजून एक मला बरीच आवडलेली 'आगीनझाड' नावाची कथा वैशाली पंडित या मालवणच्या एका नवोदित लेखिकेची होती. आमच्या वाचनालयात कॉलेजमधील एक मुलगी यायची. ती फक्त सुहास शिरवळकर वाचायची. त्यातून त्यांच्याविषयी कुतूहल निर्माण झालं आणि मी त्यांना भेटायला गेलो. त्यांनी वैशाली पंडितांशी माझी ओळख करून दिली. एका खेड्यातली खानावळ 'आगीनझाड' या त्यांच्या कथेत दाखवली होती. ती चालवणारी तरुणी खानावळीच्या मालकाची सून होती. तिथं तिचा एका

*आमची उमेद सतत वाढतच गेली होती. 2012 पर्यंतची वर्षं ही उमेदीची, उत्साहाची, आनंदाची अशीच होती. सहकार्य करणारे अनेक जण भेटल्यानं आम्ही त्या काळात कधीही खचून गेलो नाही. अंतर्नादच्या पहिल्या अंकाचं प्रकाशन आनंद यादव यांच्या हस्ते झालं आणि त्या प्रकाशन समारंभाच्या शान्ता शेळके अध्यक्ष होत्या. समारंभात मुकुंदराव किर्लोस्कर उत्स्फूर्तपणे बोलले होते. ही मंडळी त्यावेळी साहित्यक्षेत्रात खूप नामांकित होती. प्रकाशनाला साहित्यक्षेत्रातील सर्व वयोगटातली माणसं आली होती. 'इथे उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांना मी विनंती करते की, मानधनाची कोणतीही अट न घालता, आपलं उत्तोमत्तम लेखन त्यांनी अंतर्नादकडे द्यावं', असं आवाहन शान्ताबाईंनी त्यावेळी आपल्या भाषणात केलं होतं. लवकरच त्याची सुरुवात त्यांनी स्वतःपासून केली. 'कविता स्मरणातल्या' नावाचं एक सदर त्यांनी अडीच-तीन वर्षं चालवलं.*

चित्रकाराशी परिचय होतो, त्यांच्यात नाजूक नातं निर्माण होतं. तिचा नवरा, सासरे तिच्यावर भडकतात. घराबाहेर पडायला बंदी घालतात. तरीही, शेकोटी पेटवताना उडणाऱ्या ठिणग्यांत ती त्याची चित्रं चितारायला लागली; असं आकर्षक चित्रण त्यात होतं. त्या कथेवर कोकण महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे मालवण येथे एक परिसंवाद झाला होता. 'टाइम्स ऑफ इंडिया'ने त्या परिसंवादाचा चक्क पाच कॉलम रिपोर्ट इंग्रजीत छापला होता. ते बघून सगळ्यांनाच खूप नवल वाटलं होतं. 'आमच्या कार्यक्रमाची किंवा पुस्तकाची एका ओळीची बातमीही टाइम्स ऑफ इंडिया देत नाही आणि एका नवोदित कथाकाराच्या कलाकाराच्या एका कथेवरील चर्चेसाठी टाइम्सने इतकी जागा दिली', याचं मधु मंगेश कर्णिकांना फार कौतुकमिश्रित आश्चर्य वाटलं होतं. त्यांनी लिहिलेलं ते पत्र माझ्याकडे अजूनही आहे.

असं चांगलं साहित्य मिळत गेलं आणि वर्षं सरत गेली. अडचणी होत्याच, पण त्या सोडवताना आम्ही त्या काळात उदास किंवा व्यथित मात्र कधी झालो नव्हतो. एक सांगावंसं वाटतं की, मासिकाला पहिल्या वर्षी तोटा आला तरी चालेल अशी माझी तयारी होती. आमच्या पहिल्या वर्षी सुमारे हजार प्रती दरमहा खपत होत्या – वर्गणीदारांकडे जाणाऱ्या आणि पूनम एजन्सी, संदेश एजन्सी, बागवे आणि पाठक या विक्रेत्यांमार्फत विकल्या जाणाऱ्या. तेवढ्याही प्रती जर खपल्या नसत्या, तर कदाचित मी मासिक चालवलं नसतं. कारण निव्वळ स्वतःच्या समाधानासाठी, केवळ स्वतःला संपादक म्हणवून घेता यावं म्हणून एखादं मासिक चालवायचं हे मला पटणारं नव्हतं. कमीत-कमी हजार लोकांपर्यंत तरी ते पोहोचत नसेल, तर त्याचा काय उपयोग?

**प्रश्न** : अंतर्नादचा पाचवा वर्धापन दिवस शिवाजीनगरला 'इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स'च्या सभागृहात झाला. अनिल अवचट त्याचे प्रमुख पाहुणे होते. दत्तप्रसाद दाभोळकर आणि पंकज कुरूलकर हे दोघेही त्या कार्यक्रमाला होते. तिथं मी अंतर्नादचा पहिला अंक पाहिला. मी तेव्हा विद्यार्थिदशेत होतो. अशा प्रकारचं एक मासिक गेली पाच वर्षं चालू आहे यानं मी खूप प्रभावित झालो होतो. मीही 1995लाच पुण्यात आलो होतो. साहित्यसंस्कृती, वाचन यात खूप रमलेलो असलो, तरी पाच वर्षांत ते मासिक माझ्यापर्यंत आलंच नाही याचं मला आश्चर्य वाटलं. एक हजारच पण खूप चांगल्या, चोखंदळ लोकांपर्यंत ते गेलं. स्टॉलवर ते फारसं उपलब्ध नसावं. आत्ता तुमच्या बोलण्यातून आलं की, त्याचा खप हजार किंवा त्याहीपेक्षा कमी असला, तरी साहित्यविश्वाशी संबंध येणं, त्यातून लेखन मिळवणं, त्यातलं तुमचं योगदान याचं समाधान तुम्हाला मिळत असणार. पाच वर्षांत तुमचं बऱ्यापैकी बस्तान बसलं होतं, असं मला चांगलं आठवतंय. या पाच वर्षांत खूप चांगले विशेषांक – कालिदास, टागोर, शेक्सपिअर असे – निघाले होते. त्यानंतर समाजसेवा (एनजीओ) या संदर्भातला तुमचा एक दिवाळी अंक होता. त्यात मिलिंद बोकीलांपासून शरद जोशींपर्यंत अनेकांचे लेख होते. हे विशेषांक, त्याला मिळालेला प्रतिसाद आणि स्तंभलेखन हे कसं होतं? असे विशेषांक पुढे दिसले नाहीत. असं का?

– सुरुवातीला अंतर्नादची मासिक प्रिंट ऑर्डर अकराशे प्रतींची होती. मासिक अंकाचा तीन हजार प्रतींपेक्षा जास्त खप कधीच झाला नाही. दिवाळी अंकाचा खप दरवर्षी वेगवेगळा असायचा पण तो साधारण पाच हजारापर्यंत जायचा. मासिक अंकाचा खप त्या-त्या मर्यादित वर्तुळापुरताच राहणार होता. कालिदास, शेक्सपिअर, रवींद्रनाथ यांच्यावर विशेषांक काढणारे अलीकडच्या काळात फक्त आम्हीच होतो. ही मंडळी आपल्या क्षेत्रात दिग्गज असली, तरी अलीकडच्या मराठी वाचकांना त्यांच्याबद्दल फारशी माहिती नव्हती हे ते विशेषांक काढण्यामागचं मुख्य कारण होतं. विस्मृतीत जात चाललेल्या या दिग्गजांवर पुन्हा प्रकाशझोत टाकणं हे संपादक म्हणून माझं कर्तव्यच होतं.

तुम्ही उल्लेख केला आहे तो 'स्वयंस्फूर्त कार्याचं समाजजीवनातील स्थान' हा विषय असलेला दिवाळी अंक 1999 सालचा होता. त्यातला एक विस्तृत लेख शरद जोशींचा होता –'बस करा हे समाजसेवेचं ढोंग!' हे त्याचे शीर्षक होते. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन रावसाहेब शिंदे आणि शरद जोशी यांच्याशी माझा संबंध, माझ्याशेजारी राहणाऱ्या बद्रिनाथ देवकर यांच्यामुळे आला होता. शरद जोशींचं त्यावेळी पुण्यात घर नव्हतं. त्यावेळी ते बीना अपार्टमेंटमध्ये सेनापती बापट रोडला राहायचे. त्यांची तब्येत बरी नसायची. तेव्हा मीच त्या लेखाचं शब्दांकन केलं होतं. त्यांनी

महाराष्ट्रातल्या अनेक मोठमोठ्या समाजसेवकांवर नावानिशी टीका केली होती. आपला वाचक हे स्वीकारणं शक्य नाही, असं मला वाटलं. मी माझ्या अधिकारात (पण त्यांची अनुमती घेऊन) बहुतेक सगळी नावं गाळून टाकली आणि मग तो लेख छापला. शरद जोशी आपल्या मांडणीत अगदी खोलात गेले होते. त्या सगळ्या समाजसेवकांचे ट्रस्ट, त्यांची प्रॉपर्टी कोणाच्या नावाने आहे, त्यामध्ये कोणाकोणाला महत्त्वाचं स्थान आहे वगैरे बरंच कायकाय त्यात लिहिलं होतं. मिलिंद बोकील, अनिल शिदोरे, स. ह. देशपांडे अशा अंकातील बाकीच्या सगळ्यांनी समाजसेवेची भलावण करणारे लेख लिहिले होते. अंक काढण्याआधी त्याचं नियोजन आम्ही देशपांडेंच्याच घरी केलं होतं. शरद जोशींची मांडणी मूलभूत स्वरूपातच वेगळी होती. विकास ही व्यक्तिगत प्रक्रिया आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. आपण दुसऱ्या कुणाचा विकास घडवून आणू शकतो, उद्धार करू शकतो हा फार मोठा अहंकार आहे. 'सगळे समाजसेवक अशा अहंकारानं ग्रस्त असतात. ही एक झिंग असते' असा शब्दप्रयोग त्यांनी केला होता. 'ही सगळी मंडळी बोलण्यात कशी चतुर असतात, त्यांच्याकडे कसे काही विशिष्ट शब्द ठरलेले असतात, ते टाकाटाकी कशी करतात' अशी खूप स्फोटक शब्दांत त्यांनी मांडणी केली होती. तिचा गाभा आयन रँड या अमेरिकन लेखिकेच्या विचारसरणीशी मिळणारा होता. माणसाच्या विकासाची सगळ्यात मूलभूत प्रेरणा स्वार्थ ही आहे; जे स्वतःकरता अर्थपूर्ण आहे, तो स्वार्थ; तो वाईट कसा असेल; अशी काहीशी ती मांडणी होती.

एक योगायोग म्हणजे या संदर्भातील आचार्य रजनीशांचंही मतही साधारण तसंच होतं. स्वार्थ हीच जर मूलभूत प्रेरणा असेल आणि वाढ ही नैसर्गिक क्रिया असेल, तर कोणीही दुसऱ्या कुणाचा कृत्रिमरीत्या विकास कशाला करायचा? लहान मूल वाढावं म्हणून आईला त्याचे हात-पाय ओढावे लागत नाहीत. तसं व्यक्तीच्या, समाजाच्या बाबतीतही आहे, असा त्यांचा दावा होता. मला त्यांचं सगळं म्हणणं पटलेलं नव्हतं. संपादकीयामध्ये मी त्याच्या विरोधातही लिहिलं होतं. नंतर त्यांनी तो सौम्य करून परत एकदा लिहिला. 'समाजसेवेला विरोध नाही, पण तुमची समाजसेवेच्या नावाने चालू असलेली दुकानदारी बंद करा' अशा आशयाचा तो सुधारित लेख लिहिला. अर्थात त्यावरही अनेकांनी टीका केली.

दुसऱ्या कुणाचीतरी श्रद्धा हलवायचा आपल्याला अधिकार नाही, असा माझा एक आक्षेप होता. म्हणजे एखाद्या गोष्टीवर असलेली तुमची श्रद्धा नष्ट व्हावी असं काही मी करू नये. तुमच्या विचारांतील उणिवा तुमच्या स्वतःच्या लक्षात आल्या तर ती गोष्ट वेगळी परंतु तुमच्या भ्रमनिरासाला माझे लेखन कधीही कारणीभूत होता कामा नये; कारण ती श्रद्धा हा तुमचा जीवनरस आहे असं मला वाटे. पण शरद जोशींच्या लेखामुळे अनेक जण खूप दुखावले गेले. तशी बरीच पत्रं आमच्याकडे आली. त्यातली काही आम्ही छापलीही होती. त्यातलं एक पत्र लिहिणाऱ्या माणसाच्या मनात, 35 वर्षं या विशिष्ट क्षेत्रात आपण केलेलं समाजकार्य फुकट गेल्याची भावना होती. जोशींच्या लेखाचा तो परिणाम दुर्दैवीच होता असं म्हणावं लागेल. पण एका अर्थानं त्यांचा तो लेख म्हणजे अनेक समाजसेवकांपुढे धरलेला एक आरसाही होता. आपण जे काम करतोय, त्याची समाजाला खरंच गरज आहे का? ते आपण कशासाठी करतो? त्यांच्यासाठी का केवळ आपल्या समाधानासाठी, त्याचा दीर्घकाळ टिकणारा असा प्रभाव किती पडतो? त्यानं खरोखर समाज बदलतो का? अशा प्रश्नांचा विचार समाजसेवी संस्थांनीही करायला हवा. या कामामागे आत्मप्रकटीकरण हीच मुख्य प्रेरणा आहे की समाजाचं भलं करणं ही मुख्य प्रेरणा आहे हे त्या समाजसेवी संस्थांच्या चालकांच्या मनात स्पष्ट असलं पाहिजे. अशा काही मुद्द्यांसह त्या लेखात आयन रँडचं तत्त्वज्ञान खूप होतं.

**प्रश्न** : हा अंक मी उशिरा वाचला. पण तेव्हाच आयन रँडचीही माझी ओळख झाली होती. तिच्या 'फाऊंटनहेड' कादंबरीत टोकाच्या व्यक्तिवादाचं उदाहरण होतं. त्यामुळे वाचकांतही त्यानं हलचल माजणं स्वाभाविकच होतं. शरद जोशींचा तो वादग्रस्त लेख सोडला, तर पहिल्या पाच वर्षांत 'अंतर्नाद'ला, तुमच्या लेखकांना आणि संपादक म्हणून तुम्हालाही खूप चांगल्या प्रतिक्रिया आल्या. नवे-जुने नामवंत साहित्यिक, सामान्य वाचक यांच्याकडून खूप कौतुकही झालं. त्या काळात 'सत्यकथा' बंद पडलं, तरी हे नव्या स्वरूपातलं 'सत्यकथा' आहे, अशीही कुजबुज झाली.

त्याच काळात अंतर्नादच्या मर्यादाही अधोरेखित झाल्या आहेत अशी अंतर्नादवर टीकाही झाली. त्यातली काही तुम्हाला मान्य असेल तर काही अमान्य. तिचं काय स्वरूप होतं? तशाच प्रकारची टीका पुढेही आली असणार. पण पहिली वर्षं वर्षं महत्त्वाची वाटतात.

– खूप जणांनी टीका केली. सगळेच लोक आपल्या बाजूनं बोलतील असं कसं म्हणता येईल? मग एखादं विरूद्ध बाजूचं लेखनही प्रसिद्ध व्हावं असं मला वाटतं. त्यांच्या लिखाणातून, बोलण्यातून आपल्यात काय कमी आहे तेही कळतं. अशा टीकेचं मी स्वागतच करत होतो. पण कधीकधी ही टीका अगदी नाउमेद करणारी असायची.

उद्दाहरणार्थ, अंतर्नादला काही प्रसिद्धी मिळेल का याचा शोध घेण्यासाठी एका बड्या पत्रकाराला मी भेटायला गेलो होतो. त्यांना मी पूर्वी पाठवलेले चार-पाच अंक त्यांच्यासमोरच टेबलावर होते. त्यातला एक अंक त्यांनी उचलला आणि 'याच्यात काय नवंय?' असा खोचक प्रश्न करत पुन्हा खाली ठेवला. 'कुठलंही मासिक चालणार की नाही हे पहिल्या वर्षभरात कळतं. ज्याअर्थी अजूनही अंतर्नाद नीट चालत नसेल तर त्याचा अर्थ यापुढेही ते कधीच चालणार नाही,' अशी त्यांची प्रतिक्रिया होती. मी त्यांना तोंडावर काहीच बोललो नाही, पण अंतर्यामी अगदी उदास होऊन मी त्यांच्या कार्यालयातून बाहेर पडलो. दुसऱ्या एका मुंबईच्या लेखकांनी 'तुम्ही हा किती फालतू अंक काढला आहे? हा कागदाचा आणि शाईचा अपव्यय आहे, बंद करा हा अंक' अशा अर्थाचं एक पत्र पाठवलं होतं. आदर्श अंक कसा असावा हे सांगण्यासाठी त्यांनी स्वतःच संपादित केलेला 'आत्मकथन' या विषयाला वाहिलेला एक दिवाळी अंक पाठवला होता. त्यांना एकदा जाऊन भेटावं असंही माझ्या मनात आलं होतं, पण कामात ते राहून गेलं.

आमचं मासिक इंटरनेट, मोबाईल आणि नंतर व्हॉट्सअप या जमान्यात सुरू झालेलं आहे, आणि त्यामुळे इतर कोणत्याही पूर्वीच्या मासिकासोबत आमची तुलना करणं अन्यायकारक होतं. इतर मासिकं काढली गेली, तो एकूण काळ साहित्याला पूरकच होता. त्या काळात बहुसंख्य विद्यार्थी मराठी माध्यमातून शिक्षण घेत होते. साहित्याव्यतिरिक्त अभिव्यक्तीसाठीची माध्यमं मर्यादित होती. ज्या काळी टीव्ही नव्हता, अशा काळात हे साहित्यिक आणि ती मासिकं प्रस्थापित झाली होती. लोकांपुढे पर्यायच कमी असल्यानं साहित्याला एक महत्त्वाचं स्थान आपोआपच प्राप्त झालं होतं. 'कवी तो दिसे कसा आननी' हे एकेकाळी अगदी स्वाभाविक असलेलं समाजातील कुतूहल अंतर्नादच्या काळात अजिबात नव्हतं. त्यामुळे उदाहरण द्यायचंय असेल, तर आजच्या काळातलं द्या; अनेक वर्षांपूर्वी कुणी कसा अंक काढला ते सांगू नका; तो काळच वेगळा असल्यानं तशी तुलना करताच येणार नाही; आता आम्ही प्रवाहाच्या विरोधात पोहतो आहोत; अशी माझी भूमिका होती.

आणखी एक गोष्ट मला उघड दिसत होती. अनेकदा ही टीका मत्सरग्रस्त होती. आपल्याला जे जमलं नाही ते अंतर्नादला जमतं आहे याचा राग येणारे अनेक जण होते. वरवर माझ्याबद्दल चांगलं बोलणारे पण पाठीमागे माझी थट्टा करणारे काही 'मित्र'देखील होतेच आणि त्यांच्या प्रतिक्रिया माझ्यापर्यंत पोचतच होत्या. अशावेळी राग यायचा, त्याहून जास्त वाईट वाटायचं पण त्याबद्दल काही करणं मला शक्य नव्हतं. एकदा एखाद्याने तुमच्याविषयी काही पूर्वग्रह करून घेतला, तर तो दूर करणं जवळजवळ अशक्य असतं हेही माझ्या लक्षात आलं होतं. आपली केमिस्ट्री सगळ्यांशी जुळणं कधीच शक्य नसतं; अजातशत्रुत्व ही साहित्यिक क्षेत्रात केवळ कविकल्पना आहे!

अर्थात काही टीकाकारांनी केलेली टीका वाजवीही होती हे मान्य करायला हवं. एकानं 'अंतर्नाद फार गंभीर आणि जड वाटतं. त्यात गंमत असायला हवी. ते वाचताना थोडीतरी मजा आली पाहिजे, थोडंतरी हलकंफुलकं वाटलं पाहिजे.. ' असं त्यांचं म्हणणं होतं. त्याने अगदी माझ्या मर्मावर जणू बोट ठेवलं होतं! पण तसं काही करणं हा माझा पिंडच नव्हता. मी सहसा कधी कुणाच्या खांद्यावर हात ठेवत नाही, सहसा कधी कुणाला टाळीही देत नाही. माझा स्वभावच काहीसा अलिप्त असल्यानं हलकंफुलकं असं मी काही करूच शकलो नसतो. आणि त्या माझ्या गंभीर वृत्तीचं प्रतिबिंब मासिकात उमटलं होतं. आणि त्याचा तोटा आम्हाला नक्कीच झाला. पुस्तकात हे सारं विस्ताराने आलेलं आहे.

**प्रश्न** : अंतर्नादच्या 26 वर्षांपैकी, 2012 पर्यंतची

म्हणजे सुरुवातीची 17 वर्षं आनंदाची, उमेदीची होती आणि नंतर मात्र उतार सुरू झाला, असा उल्लेख तुम्ही स्वतःच या पुस्तकात केलेला आहे. आत्ता आपण पाचवा वर्धापन दिवस म्हणजे 2000 सालापर्यंतचा प्रवास पाहिला. त्या नंतरची जवळपास बारा वर्षं मासिकाचा विस्तार झाला. आर्थिकदृष्ट्याही ते स्थिर झालं. जाहिराती मिळू लागल्या. वाचकांचा प्रतिसाद मासिकातल्या सदरातून दिसतच होता. तर तो आधीचा काळ उमेदीचा का होता, याची काही कारणमीमांसा तुम्हाला करता येईल का?

– त्यासाठी थोडं मागे जावं लागेल. मासिक सुरू केल्यानंतर ते टिकवण्यासाठी काय करायचे याचा विचार सुरू होताच. सुरुवातीला या मासिकासाठी म्हणून मी चार लाख रुपये वेगळे काढले होते. ते माझं भांडवल होतं. हे मुद्दाम सांगायचं कारण की, मराठी साहित्यविश्वात नेमकी आकडेवारी सहसा कुणी देत नाही आणि त्यामुळे संदिग्ध असंच चित्र वाचकापुढे उभं राहतं....

**प्रश्न :** मध्येच थोडं सांगतो. मी एक गोष्ट नेहमी सांगत आलेलो आहे. ती गोष्ट म्हणजे 'मराठी साहित्यविश्वात फक्त दोनच नियतकालिकं खात्रीनं खरं सांगतील, अन्य लोकांचं माहीत नाही.' डॉ. नरेंद्र दाभोळकर असतानाही आणि ते गेल्यानंतरही मी हे म्हणायचो. साधनेचा खप, त्याची आर्थिक उलाढाल किती वगैरे गोष्टी मी उघड सांगितल्या आहेत. त्यावेळी मी म्हणायचो, 'साधनाचे वर्गणीदार किती असं तुम्ही विचारलं, तर 6,200 असा आकडा मी अंदाजे सांगेन. पण तुम्ही अंतर्नादच्या संपादकांना तेच विचारलं, तर ते सरळ 2721 असा नेमका आकडा सांगतील.' तुमचा हा नेमकेपणा आणि प्रांजळपणा महत्त्वाचा गुण होता आणि तुमच्या संपादकीयांतूनदेखील तो व्यक्त व्हायचा. त्या गुणाची या मुलाखतीतदेखील नोंद होणं मला महत्त्वाचं वाटतं.

– खूप धन्यवाद!

पहिल्या वर्षी अंतर्नादची वार्षिक वर्गणी 160 रुपये होती. मासिक सुरू करण्यापूर्वी मी तऱ्हेतऱ्हेच्या याद्या गोळा केल्या होत्या आणि अनेक गणितंही मांडली होती. अमेरिकेत इतके मराठी बांधव आहेत, ते इतक्या जहिराती देतील; इतक्या सरकारी कंपन्या आहेत, त्यांच्याकडून इतक्या जाहिराती मिळतील वगैरे. प्रत्यक्षात तसं काहीच झालं नाही. पण 160 रुपये देणारे 2500 वर्गणीदार गोळा केले, तर जवळपास चार लाख रुपये जमा होतील असा माझा हिशोब होता. तो ब्रेक-इव्हन पॉइंट होता. शिवाय, मासिकाच्या मुखपृष्ठाची तीन पाने कोरी असतात. त्यांच्यावर छापण्यासाठी प्रत्येक अंकात तीन पूर्ण पानांच्या जाहिराती मिळाल्या, तर मासिकाच्या वाढीसाठी आणखी आर्थिक स्थैर्य मिळेल आणि आपण इतर काही सांस्कृतिक उपक्रम ही राबवू शकू असे माझे विचार होते.

एक सांगायला हवं. सुरुवातीच्या काळात आम्ही मासिकासोबत असे बरेच सांस्कृतिक कार्यक्रम केलेले आहेत. पंडित अरविंद गजेंद्रगडकरांनी मध्यंतरी बरीच वर्षं आपलं जाहीर बासरीवादन बंद केलं होतं. त्यानंतर कित्येक वर्षांनी त्यांचा बासरीवादनाचा कार्यक्रम आम्ही पहिल्यांदा केला. मीना प्रभु लॅटिन अमेरिकेहून आल्या, तेव्हा त्यांचा प्रवासवर्णनाचा जाहीर स्लाईड-शो आम्ही ठेवला होता. पु. ना. ओक हे 'ताजमहाल हा हिंदूचा आहे' या त्यांच्या मताकरता प्रसिद्ध होते. त्यातील वादग्रस्त भाग बाजूला ठेवून 'नेताजींच्या सहवासात' या विषयावर आम्ही त्यांचं भाषण ठेवलं होतं. कारण ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिगत सचिव होते ही गोष्ट फारशी कोणाला ठाऊक नव्हती. असे वेगवेगळे कार्यक्रम आम्ही करत होतो आणि त्यांना प्रतिसाद चांगला मिळत होता.

अडीच हजार वर्गणीदारांची साथ असेल, तर असे अनेक कार्यक्रम आपण करू शकू असं मनात होतं. पण हे खूप अवघड आहे, लोक वर्गणीदार व्हायला खिशात हात घालत नाही, मात्र तोंडानं भरपूर काय काय बोलतील, हे आम्हाला अनुभवाने लवकरच कळत गेलं. कुमार गुर्जर नावाच्या माझ्या एका मुंबईच्या सी.ए. मित्रानं 'वर्गणीदार गोळा करून त्यांच्या वर्गणीचं नूतनीकरण करत राहण्यापेक्षा आजीव सदस्यत्व नोंदवावेत. प्रत्येकाकडून 2000 रुपये घ्यावेत. तशी हजार माणसं मिळाली, तर हजार सुसंस्कृत कुटुंबांशी तू जोडला जातोस. ती माणसं काळजीपूर्वक निवडायला हवीत. आमंत्रणातूनच सदस्यत्व मिळेल अशी रचना ठेव. त्यातून जवळपास 20 लाखांचा निधी संकलित होईल', असा सल्ला त्याने मला दिला. त्यावेळी पुण्यातल्या कितीतरी सहकारी बँका सोळा टक्के व्याज देत होत्या, त्या हिशोबानं दरवर्षी 3,20,000 रुपये जमतील.

बाकी ८०,००० रुपये आपण किरकोळ अंकविक्रीतून जमवू, असं आम्ही ठरवलं. त्याला प्रतिसादही चांगला मिळाला. जवळपास साडे आठशे वाचक आजीव सदस्य झाले. तेव्हा श्री. पु. भागवतांचं एक सुंदर पत्रही मला आलं होतं आणि आम्ही ते त्यावेळी अंकातही ते छापलेलं आहे.

वेगवेगळ्या जीवनक्षेत्रांमधला निवडक वाचक या आजीव सदस्य योजनेतून आम्ही जोडला. त्यासाठी वेगवेगळ्या याद्या वापरल्या. व्यक्तिगत संपर्क साधला. भेटीही घेतल्या. लेखक, पत्रकार, प्रकाशक, वकील, डॉक्टर, सरकारी अधिकारी अशा विविध क्षेत्रांतली वरच्या स्थानावरची अनेक माणसं अंतर्नादशी यातून जोडली गेली. आमच्या 'चोखंदळ वाचक वर्गाचं' आजीव सदस्य योजना हे एक रहस्य होतं. त्याच काळात 'चोखंदळ वाचकांसाठी' अशी अंतर्नादची एक टॅगलाईन खूप चांगली चालली. अगदी शेवटच्या दिवसापर्यंत यातले अनेक जण आमचे वर्गणीदार म्हणून कायम होते. त्यांची यादी वाचताना आज माझे डोळे भरून येतात. ही सगळी माणसं आपली वर्गणीदार कशी झाली, याचं खरंच आश्चर्य वाटतं.

पण नंतर बँकांचे व्याजदर झपाट्याने कमी होत गेले आणि खर्च मात्र वाढत गेला. ते गणित जमेना म्हणून ती योजना बंद करून सगळ्यांचे पैसे परत करायचं ठरवलं. त्यावेळी अनेक लोकांनी मला वेड्यात काढलं होतं. 'हातात आलेले पैसे परत करायचे कशासाठी? त्यापेक्षा त्यांच्याकडून अधिक पैसे मागून घ्या,' असं त्यांचं मत होतं. पण ते आम्हाला पटलं नाही. कारण केव्हातरी ते अधिक घेतलेले पैसेही अपुरे पडणारच होते. त्यापेक्षा आम्ही सरळ त्यांचे पैसे चेकने परत करायचे असं ठरवलं. पण सोबत आम्ही एक पत्र पाठवलं. 'तुम्ही वर्गणीदार म्हणून पुढेही राहा आणि तुमच्यासारखा आणखी एक चोखंदळ वाचक आम्हाला वर्गणीदार म्हणून मिळवून द्या. त्या पोटी आम्ही तुमचे पैसे जमा करू. अर्थात ते पसंत नसेल तर तुमचे पैसे अर्थातच परत करत आहोत.' यातून आमच्या वर्गणीदारांचा आमच्यावरील विश्वास अधिक दृढ झाला. शिवाय यामुळे आमच्या वर्गणीदारांची संख्या जवळपास दुप्पट झाली. तो नवा वर्गणीदार त्यांनीच निवडलेला असल्यानं तो चांगला वाचकही होता.

या चोखंदळ वर्गणीदारांमुळे अंतर्नादला साहित्यवर्तुळात एक आदराचं स्थान प्राप्त झालं. एक प्रतिष्ठा प्राप्त झाली. या अंकाचा खप कमी असला तरीही आपलं लेखन याच अंकात छापून यावं असं अनेक लेखकांना वाटू लागलं. अनेक लेखक त्यांचं लेखन आपणहून आमच्याकडे पाठवू लागले.

**प्रश्न** : दोन प्रकारची टीका तुमच्या या बहराच्या काळात केली गेली होती. तुमच्यापर्यंतही कमी-अधिक फरकानं ती पोचली असेल. त्यातली एक अशी की, 'अंतर्नादमध्ये ग्रामीण भागातल्या लोकांचं लेखन, कथा, अनुभवविश्व नसतं. लिहिणारे सगळे लोक हे शहरातले, पुणे-मुंबई-नाशिक-नागपूर या पट्ट्यातले आहेत' असं म्हटलं जातं. 'संपादकीय'नंतरची 3 ते 6 ही पानं 'प्रतिसाद'साठी असायची. वाचक प्रतिसादाला एवढं महत्त्व दिलं जायचं, याचं कौतुकही होतं. इतका मोठा प्रतिसाद मराठीत कोणत्याही नियतकालिकाला मिळतही नसावा आणि तो छापलाही जात नसावा. त्यामुळे 'लेखकांनी लेखकांसाठी चालवलेलं मासिक' असंही त्याला म्हटलं जाऊ लागलं. ही टीका अतिशयोक्तपूर्ण होती, हे खरं आहे; पण 'ग्रामीण भागातल्या लेखकांना तुम्ही स्थान देत नाही', या टीकेकडे तुम्ही कसं पाहता?

– माझ्या आयुष्यातली 40 वर्षं मी मुंबईत राहिलो. माझी बायकोही मुंबईतच होती. आमचा जन्मही तिथलाच. आमची गावाला शेती वगैरे असं काही नव्हतं. खरं तर आम्हाला गाव असं काही कधीच नव्हतं. माझं मित्रवर्तुळही शहरीच होतं. पुण्यात आल्यानंतरही ते शहरीच राहिलं. ही माझी एक मर्यादा होती हे मी मान्य करतो. पण याचा अर्थ ग्रामीण लेखक आम्ही घेतलेच नाही, असा नाही. सदानंद देशमुख त्या वेळेला बुलढाणा जिल्ह्यात जानेफळसारख्या ठिकाणी असायचे. आमच्या पहिल्याच अंकात त्यांच्या कविता आहेत. कृष्णात खोत यांच्याही कथा, अनुभव आम्ही छापले होते. अंतर्नादमधे ज्यांचे साहित्य छापले असे असे अनेक लेखक ग्रामीण होते. आणि खरं सांगायचं तर गेल्या पंधरा-वीस वर्षांत मोठ्या शहरांपेक्षा ग्रामीण भागातच अधिक लेखक लिहीत आहेत.

**प्रश्न** : कदाचित इतरांच्या तुलनेत ग्रामीण लेखक कमी असतील. तुम्ही म्हणालात तेही बरोबरच आहे. तुमचं अनुभवविश्व त्या प्रकारचं नसेल, तर ते शक्य

होणार नाही. कितीही नाही म्हटलं, तरी अशा प्रकारच्या वाङ्मयीन मासिकावर संपादकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव राहतोच. ते अपरिहार्य आहे. जशी त्याची बलस्थानं आहेत, तशा मर्यादाही आहेत. असो. वाचकपत्रांना सातत्याने इतकी जागा तुम्हाला का द्यावीशी वाटत होती?

– मुळात चोखंदळ वाचक निवडावा लागतो. थोडं विषयांतर होईल, पण सांगतो. पुण्यातले एक मोठे डॉक्टर आमच्या ग्रंथालयाचे सदस्य होते. ते आले की, अनेक पुस्तकं बघून निवडीला फार वेळ घ्यायचे. 'तुमच्यासारखे डॉक्टर इतके बिझी असतात की रुग्णाला बघायलाही तुम्हाला फारसा वेळ नसतो, मग पुस्तकनिवडीसाठी तुम्ही एवढा वेळ का घेता?' असं मी त्यांना एकदा विचारलं. त्यावर 'मी खूप बिझी आहे म्हणूनच मी यासाठी एवढा वेळ घेतो. फालतू पुस्तकं वाचण्यात मला आयुष्याचा मर्यादित वेळ घालवायचा नाही. त्यामुळे वाचण्यासाठीचं पुस्तक मी खूप विचारपूर्वकच निवडतो,' असं ते म्हणाले. असा विचारपूर्वक चांगलं निवडणारा वाचकवर्ग साहित्यात हवा असतो. या वाचकवर्गाला आपले विचार लेखकांपर्यंत पोहोचवायची सवय अंतर्नादनं लावली, असं मी नम्रपणे म्हणेन. भालचंद्र नेमाडेंचं माझ्याकडे असलेलं एक पत्र तारखेसह मी आगामी पुस्तकात छापलंय. 'मराठीत वाचकांनी व्यक्त व्हायचा एक पायंडा तुम्ही पाडत आहात. तो


















आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिसादासाठीची पानं वाढवत जा', असं ते म्हणाले होते. असं केलं नाही, तर साहित्य ही एकेरी वाहतूक होते. लेखक त्याला वाटेल ते लिहीत जातो. वाचकाला काय वाटतंय हे त्यानंही जाणून घेतलं पाहिजे. तेव्हा ई-मेल नसल्यानं पत्रानं प्रतिक्रिया यायच्या. अनेकदा उशिरा हातात पडायच्या, हे खरंय.

**प्रश्न** : मासिक असल्यानं उशीर होणारंच. कधी कधी तीन महिनेही उलटून जायची. पण इतक्या जुन्या लेखावरचा प्रतिसाद इतक्या उशिराही छापतात, असं लोकांना वाटायचं. अर्थात, तसे म्हणणारा वर्ग खरं म्हणजे प्रतिसाद बारकाईनं वाचायचा.

– अगदी खरं आहे तुमचं म्हणणं. कारण आमचा भर शेवटी वर्गणीदारांवरच होता. आमचा आश्रय, माय-बाप कोण होता? वर्गणीदारच. किरकोळ अंक असे कितीसे विकले जायचे? पूनम, संदेश, बागवे आणि नाशिकचे पाठक ब्रदर्स असे चारच विक्रेते होते. त्यांची विक्री अगदी किरकोळ असायची. तेही अंक खपावा म्हणून काही विशेष प्रयत्न करायचे नाहीत. अनेकदा त्यांच्याकडचे अंक परत यायचे. ते परत आणण्यासाठीही आम्हाला त्यांच्याकडे जावं लागायचं. ते न खपलेले अंक बिनधास्त पाठवून द्यायचे. पण ते गठ्ठे पाहिले की आम्हाला रडायला यायचं. वर्गणीदार हा मात्र आमच्याशी बांधलेला होता. शिवाय, ते कायमस्वरूपी नातं होतं, कारण आमच्या नूतनीकरणही मोठ्या प्रमाणावर व्हायचं. त्यामुळे आम्ही वर्गणीदारांवरच भर दिला. आणि त्यांच्याकडे जुने अंकही संदर्भासाठी असायचेच.

**प्रश्न** : अंतर्नाद सुरू करण्यापूर्वी तुम्ही कादंबऱ्या आणि कथा लिहीत होतात. पण त्यात तुमची एखादी कादंबरी क्रमशः येणं किंवा काही कथा प्रकाशित होणं असं फार दिसलं नाही. मध्यंतरी काळात 'बदलता भारत' आणि आणखी एक अशा तुमच्या दोन लेखमाला आल्या. 2002 च्या दरम्यान मी तुम्हाला तुमच्या ऑफिसला पहिल्यांदा भेटलो होतो. तेव्हा 'अंतर्नादचा अंक तुम्ही नियमितपणे काढताय. पण संपादक म्हणून काम करताना स्वतःच्या लेखनावर आपण अन्याय करतोय याची काही खंत वाटते का?' असा प्रश्नही मी विचारला होता. त्यावेळी 'काही प्रमाणात ते खरं आहे' असं तुम्ही म्हणाला होतात. पण तुम्ही संपादकीय नियमितपणे लिहीत होतात. कधी दोन-चार पानांचं, कधी मोठं. त्याला निश्चित असा आकार नव्हता. कधी एखादी गोष्ट असायची, कधी एखादी जुनी आठवण, तर कधी भाष्य केलं जायचं. तुमचे संपादकीय लेख हे अत्यंत वाचनीय होते. तर त्यामागचा विचार काय होता. आणि त्याचा आकार असा मोकळा आहे, याबाबत काही टीका होत होती का?

– तुमच्या प्रश्नाच्या पूर्वार्धात तथ्य आहेच. कारण, लेखकाला अंतर्मुखता महत्त्वाची, तर संपादकाला बहिर्मुखता आवश्यक आहे. लेखकासारखा अंतर्मुख होऊनच मी त्या काळात वावरलो असतो, तर कुणी येणं, दुसऱ्या माणसाला भेटणं हे मला संकटच वाटलं असतं. विशेषतः ललितलेखकांच्या बाबतीत हे होतं. चांगल्या संपादकाला साहजिकच खूप फिरावं लागतं, लोकांना भेटावं लागतं. ही बहिर्मुखता अंतर्मुखतेला मारक आहे. संपादकाचं काम बऱ्याच प्रमाणात मखर सजवण्यासारखं आहे. त्यामध्ये येऊन बसणारी मूर्ती वेगळीच असते. कौतुक होतं ते विशिष्ट लेखकाचं. पण लेखकाने जे लिहिलंय, त्यावर संस्कार करण्यासाठी किती श्रम घेतले जातात हे कुणाला कळतच नाही.

यास्मिन शेख आमच्या व्याकरण सल्लागार होत्या. त्या प्रुफंदेखील तपासायच्या. त्यांच्याकडून आणि माझ्याकडून ही प्रुफं तपासली जायची. त्यात इतक्या चुका असायच्या की, लाल शाईनं कागद भरलेला असायचा. 'तुमची ही रक्तबंबाळ प्रुफं हाती आली की, मला आत्महत्या करावीशी वाटते', असं आमचा डीटीपी करणारा एकदा म्हणाला होता! तो वैतागून जायचा. पण 'आपल्या अंकात चूक दिसली की, मला आपल्या अंगावर ओरखडा उमटल्यासारखं वाटतं', असं शेखबाईंचं म्हणणं होतं. 'आम्ही पहिलं प्रुफ हेच फायनल म्हणतो. ही दुसरा कुणीतरी तपासतो. वाचकालाही अंकात चुका असल्या तर काय एवढा फरक पडतो!' असं एक संपादक मला म्हणाले होते. पण आम्हाला तसं नको होतं.

आपण प्रमाणभाषा वापरली पाहिजे, असा माझ्याप्रमाणे शेखबाईंचाही आग्रह होता. तसंच वळण अंतर्नादला पडत गेलं. हे सगळं करत असतानाही आमच्या मासिकावर टीका होत होती. पण कुठे तरी 'माझ्यातल्या लेखकाकडे दुर्लक्ष होत होतं' या तुमच्या


Date of Posting : 25-3-2024

म्हणण्यात तथ्य आहे. नंतर मी काही चरित्रं लिहिली. कारणपरत्वे मी त्या माणसांच्या संपर्कात गेलो आणि त्यांच्याविषयी काही लिहिलंच गेलं नाहीये, हे माझ्या लक्षात आलं.

शरद जोशींच्या नावानं बरीच पुस्तकं आहेत. पण ती जोशींनी ‘शेतकरी संघटक’ या संघटनेच्या मुखपत्रात लिहिलेल्या लेखांची संकलनं आहेत. त्यांतून त्यांचे विचार कळतात, पण समग्र चरित्र असं उभं राहत नाही. त्यामुळे मी त्यांचं चरित्र लिहिलं. तसं चरित्र ही मोठीच गरज होती. त्यांचा स्वतःचा त्याला विरोधच होता. तेव्हा त्या काळात लोकप्रिय असलेल्या दोन इंग्रजी पुस्तकांचा संदर्भ मी त्यांना दिला. एक, पी. साईनाथ यांचं ‘एव्हरीवन लव्हज अ गुड ड्राउट’ आणि दुसरं, रामचंद्र गुहा यांचं ‘इंडिया आफ्टर गांधी’. पहिलं पुस्तक शेतीबद्दल असूनही शरद जोशी, शेतकरी संघटना, शेतकरी आंदोलन हे शब्दच त्यात नाहीत. आणि दुसऱ्या रामचंद्र गुहांच्या पुस्तकात त्यांचा उल्लेख फक्त तीन वाक्यांत आहे. तोही महेंद्रसिंग टिकैत यांच्या जोडीने आहे. ते बड्या बागाईतदारांचे हितरक्षण करत आहेत असे मत तिथे व्यक्त झालं आहे. मी त्यांच्या कितीतरी सभांना अनवाणी, भाकरी बांधून येणारे लोक पाहिलेत. पण तरीही त्यांच्याबद्दल खूप गैरसमज विचारवंतांमधे आहेत. म्हणूनच लिहिणाऱ्या मंडळींनी त्यांच्याविषयी चुकीचं लिहिलं आहे. शरद जोशींची जीवनशैली कुठल्याही सामान्य मध्यमवर्गीय माणसापेक्षा उच्च नव्हती. कित्येक वर्षं त्यांचं स्वतःचं घरही नव्हतं. पण ‘हा बड्या बागायतदारांचा प्रतिनिधी आहे’, असा आरोप करणारे स्वतः मात्र त्यांच्यापेक्षा जास्त चैनीत जगत होते! आरोप करणारी काही माणसं दर दोन-तीन महिन्यांनी परदेशवारी करायची. मात्र शरद जोशींच्या दोन्ही मुली अमेरिकेत असून ते फक्त दोन किंवा तीन वेळा अमेरिकेत गेले. त्यांची राहणी खरंच खूप साधी होती. पण आपला समाज विचित्रच आहे, त्याला काय करणार! म्हणून मी त्यांचं चरित्र लिहिलं. रयत शिक्षण संस्थेच्या रावसाहेब शिंदे यांचंही चरित्र मी का लिहिलं? तर त्यांच्या कुटुंबानी समाजाकरता खूप काही केलं होतं. त्यांचे भाऊ अण्णासाहेब शिंदे सलग 14 वर्षं भारताचे कृषीमंत्री होते. पण त्यांच्या योगदानाबद्दल फारसं कुठे छापून आलं नव्हतं.




*एखादं नियतकालिक कसं सुरू होतं आणि कसं बंद होतं याबद्दल मराठीत आजवर कुठलं पुस्तक लिहिलं गेल्याचं माझ्या तरी ऐकिवात नाही. अशा प्रकारची मांडणी करणारं हे मराठीतील बहुधा पहिलंच पुस्तक असावं. हे सर्वंकष आहे. त्यात व्यावहारिक आणि संपादकीय असे दोन्ही भाग आहेत. साधारण 1993 ते 2023 असा तीस वर्षांचा कालखंड त्यात आलेला आहे. अंतर्नादच्या खिडकीतून मला दिसलेलं साहित्यविश्वदेखील या पुस्तकात आहे. म्हणजे शासन आणि साहित्यिक संबंध, साहित्य संमेलनं, ग्रंथालयं, साहित्याचं अर्थकारण, भविष्यात साहित्यसृष्टी कशी असेल हे सारंही या पुस्तकात आहे. उगाचच काहीतरी खोटं किंवा अवास्तव लिहून भ्रामक चित्र वाचकांपुढे उभं करणं मी जाणीवपूर्वक टाळलं आहे.*

रयत शिक्षण संस्थेतर्फे चालवल्या जाणाऱ्या 450-500 शाळांची जाणीवही शहरी लोकांना फारशी नव्हती. ते सारं वाचकांना कळावं म्हणून अशी काही चरित्रं मी लिहिली. पण माझ्या आवडीचं कथा-कादंबरी यांसारखं ललित साहित्य मात्र त्या काळात लिहू शकलो नाही, हे तुमचं म्हणणं बरोबर आहे.

**प्रश्न** : तुम्ही आत्ता संपादकाच्या भूमिकेबद्दल बोललात आणि रामचंद्र गुहा यांच्याबद्दलही बोललात. गुहांनी अलीकडेच रुकून अडवाणी या त्यांच्या प्रकाशनाच्या संपादकाबद्दल - म्हणजे लेखक आणि संपादक यांच्या नात्यावर 'कुकिंग ऑफ बुक्स' हे छोटंसं इंटरेस्टिंग पुस्तक लिहिलं आहे. त्यावर अडवाणी यांनी एकाच वाक्यात प्रतिक्रिया दिली - 'एखाद्या संपादकाला मिळालेली ही लाँगेस्ट थँक्यू नोट आहे.' तसंच या 25 वर्षांच्या काळात तुम्हाला महत्त्वाची वाटलेली, रुचलेली एखादी-दुसरी थँक्यू नोट आहे का?

- तशा अनेक आहेत. शांता शेळके यांचं एक पत्र 'एका मासिकाचा उदयास्त' या पुस्तकात पुनर्मुद्रित केलं आहे. त्यात त्यांनी लिहिलं आहे, 'एके काळी लेखकाचे संपादकांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. माझ्या सगळ्या प्रकाशकांशी माझे तसे संबंध राहिले. मी भागवत संप्रदायाची लेखिका नव्हे, पण सगळ्या भागवत बंधुंशी माझे संबंध प्रेमाचेच राहिले. अलीकडच्या काळात व्यवहाराला आलेल्या महत्त्वामुळे संपादक आणि लेखक यांच्यातल्या संबंधांना व्यावहारिक स्वरूप प्राप्त झालंय. याला अपवाद फक्त तुम्ही पती-पत्नी आहात. दुसऱ्या कोणत्याही संपादकाशी माझे असे भावबंध जुळले गेले नाहीत. माझ्यासाठी ते नातं अतिशय मोलाचं आहे.' असं पत्र साधारण 20 वर्षांपूर्वी त्यांनी मला लिहिलं होतं.

अलीकडेच माझा सत्तरावा वाढदिवस पुण्यातील डेक्कन जिमखान्यावर काही जवळच्या मित्रांनी खासगी स्वरूपात साजरा केला होता. केवळ व्हॉटसअपवर आमंत्रण असूनही त्यावेळी 60-70 जण हजर होते. त्या वेळी काही जणांनी आपल्या भावना व्यक्तही केल्या. 'भानू काळे यांना मी माझ्या पोटातून जन्म दिलेला नसला, तरीसुद्धा ते माझे मानसपुत्रच आहेत असं मी मानते', असं यास्मिन शेख तेव्हा सगळ्यांसमोर भाषण करताना म्हणाल्या होत्या. 98 वर्षांच्या एखाद्या विदुषीने असं सगळ्यांसमोर म्हणणं हे माझ्यासाठी फार मोठं प्रशस्तिपत्रक होतं. अगदी आयुष्याचं सार्थक झालं असं वाटावं, इतकं ते वाक्य माझ्यासाठी मोलाचं होतं.

**प्रश्न** : नंतरच्या काळात तुमच्या दोन लेखमाला अंतर्नादमधून प्रसिद्ध झाल्या. त्यातली 'बदलता भारत' ही जास्त स्वीकारली गेली असावी. कदाचित दुसरी लेखमाला चालू होती, तेव्हा माझंच अंतर्नाद वाचणं कमी झालं असेल. तुम्ही म्हणताय, तसा तो जरा उतरता काळही होता. पण बदलता भारत हा मासिकाचा बहरता काळ होता. शिवाय, ती कमालीची लोकप्रिय ठरलेली लेखमाला होती. त्याचं नंतर 'मौज'कडून पुस्तकंही आलं. त्याच्या पाच-सहा आवृत्त्याही निघाल्या. बदलता भारतमध्ये त्यावेळी तुम्ही मांडलेलं आज बऱ्यापैकी स्वीकारलं जातं. पण त्यावेळी तुम्हाला दिसणारा 'बदलता भारत' हा असा बेटाबेटांवरचा, तुकड्यातुकड्यांतला, ठरावीक ठिकाणांचा आहे आणि उर्वरित भारत बदललेलाच नाहीये, अशी टीका विशेषतः पुरोगामी वर्तुळात झाली. जाहीरपणे लेखी स्वरूपात नसली झाली, तरी थोडी हेटाळणीच्या स्वरूपात ती करण्यात आली. तुमच्या लेखनाबद्दल आक्षेप नव्हता. पण 'तुम्ही जो बदल दाखवताय तो तर इंडिया आहे; खरा बदलता भारत यांनी पाहिलेलाच नाहीये' असं म्हटलं गेलं. ते तुमच्यापर्यंत कसं आलं आणि त्यावरची तुमची प्रतिक्रिया काय होती?

- मला मुळात हे पटतच नाही. एक साधं उदाहरण सांगतो. आमच्या घरात आम्हा पाच भावांत रोज सकाळी महाभारत घडायचं. मारामाऱ्या व्हायच्या. त्या कशावर? शंकराचार्यांच्या अध्यात्मावर किंवा भारत-पाकिस्तान संबंध कसे सुधारता येतील यावर किंवा एखादा नेता खरा पुरोगामी आहे की प्रतिगामी यावर त्या होत नव्हत्या. आज सकाळी दूध आणायला कोण जाणार याबद्दल आमच्या मारामाऱ्या व्हायच्या! कारण त्यावेळी दुधाच्या सेंटरवर येणारं दूध जेमतेम पंधरा मिनिटांत संपायचं. दुधाचं कार्ड असायचं आणि आमच्या कार्डवर आम्हाला जेमतेम दोन बाटल्या दूध मिळायचं. दूध केंद्रावर गर्दी इतकी असायची की, अनेकदा ते दूध मिळायचंही नाही. आमच्या परिसरात एखाद-दुसरा अपवाद सोडला, तर दूध इतरत्र कुठंही उपलब्ध नसायचं. आज मात्र मी राहतो त्या पुण्यातल्या किंबहुना सगळ्या लहान-मोठ्या गावांतल्या, कोणत्याही भागात कधीही

जा, दूध मिळतं. शिवाय दुधाचा तुटवडा दूर होणं, हा बदल ग्रामीण भागापासूनच झालेला आहे. खेड्यातला शेतकरी त्याच्या गाईपासून दूध काढतो, त्याचं संकलन होतं, पुढे त्यावर प्रक्रिया होते आणि शेवटी त्याचं वितरण होतं. हे सगळं मी गुजरात, संगमनेर, श्रीरामपूर, आंध्र अशा अनेक ठिकाणी पाहिलंय. तेव्हा ग्रामीण शेतकऱ्यांत हा बदल झालेला नाही, असं म्हणणं मला पटतच नाही. 'श्वेतक्रांती' हा वरवरचा बदल नक्कीच नाही. तो बऱ्यापैकी मूलगामी असाच बदल आहे.

माझ्या लहानपणी आमच्या घरी दारावर रोज रात्री 'अम्माऽऽ तायेऽऽऽ' असं म्हणत भिकारी यायचे. त्यांना आम्ही उरलेलं शिळंपाकं अन्न द्यायचो. तशी गरज असणारे एक-दोन नाही, तर प्रचंड संख्येने भिकारी तेव्हा जागोजागी होते. आज मात्र घरात रात्रीचा स्वयंपाक उरला, तर तो कुणाला द्यायचा? हा प्रश्न आमच्या घरी पडतो. मोलकरीण, बिल्डिंगचे वॉचमन यांनाही ते शिळं अन्न नको असतं. आजूबाजूला कुठे भिकारीही नसतात. म्हणजे तशा अर्थानं भूक, उपासमार ही भारतात मला आज तरी दिसलेली नाही. आणि मी इतरांपेक्षा कमी प्रवास करतो, असं मला अजिबात वाटत नाही. अगदी वाद घालायचा म्हणून मुद्दाम उपाशी माणसं शोधूनच काढायची असा निश्चय असेल, तर कुठे तरी ती सापडतीलच! पण तशी ती जगात कुठेही सापडतील!

**प्रश्न :** अशी अनेक उदाहरणं देता येतील. उदाहरणार्थ, मोबाईलमुळे परस्परांशी संपर्क साधणं किती सोपं, कमी खर्चिक झालं आणि त्यामुळे सामान्य माणसांच्या हाती खूप काही आलं, असंही विश्लेषण करता येईल. पण याबद्दल आणि तशी टीका करणाऱ्या माणसांबद्दल तुम्हाला काय वाटतं? या प्रश्नाच्या अधिकृत उत्तराची नोंद आपल्याकडे व्हावी म्हणून केवळ आपण हा प्रश्न घेतला. आता शेवटचे दोन प्रश्न.

सुरुवातीपासून 2012 पर्यंतचा म्हणजे 17 वर्षांचा काळ अंतर्नादचा बहराचा काळ होता, असं तुम्हीच या पुस्तकात लिहिलं आहे. त्यानंतरची आठ-नऊ वर्षं हा उताराचा काळ आहे. त्याची दोन-तीन महत्त्वाची कारणं समोर दिसतात. कदाचित तुम्हाला सगळीच कारणं महत्त्वाची वाटत असतील. पण कोणत्या कारणांची तीव्रता जास्त आहे? सुरू केल्यानंतर 17 वर्षं मासिक चालवलं, याचा अर्थ तोपर्यंत तुम्ही साठीच्या उंबरठ्यावर पोहोचलात. कितीही नाही म्हटलं तरी दीर्घकाळ काम करणं अवघड होणं, शारीरिक क्षमता कमी होणं याचा परिणाम झालाच असणार. दुसरं म्हणजे, इतकं सगळं करूनही मराठी साहित्य आणि संस्कृती ही एका मर्यादेपलीकडे वाढत नाही, त्यातून फारसा काही प्रतिसाद मिळत नाही, वर्गणीदारांच्या नूतनीकरणासाठी वेगळे कष्ट घ्यावेच लागतात, लेखकांवर काम करावं लागतं, पुनर्लेखन करून घ्यावं लागतं, या प्रकारचा वैताग, त्रागा आवडीचं काम असलं तरी होतोच. तिसरं, बाहेर इतकी माध्यमं आलेली असताना एक नियतकालिक चालवण्यातून आपल्याला किंवा वाचकांना समाधान मिळणं कमी झालं. तुमच्यासाठी या तीनपैकी कशाचं महत्त्व किती होतं?

– तुम्ही सांगितलीत, ती सगळी कारणं त्यांच्या-त्यांच्या परीने योग्यच आहेत; सारख्याच महत्त्वाची आहेत. 'सांस्कृतिक समृद्धी' ज्या प्रकारे समाजात रुजायला हवी असं आम्हाला वाटत होतं, तशी ती रुजत आहे असं कुठेही आढळत नाही.

दर्जेदार साहित्य मिळत नाही हे महत्त्वाचे कारण आहेच. 'दर्जेदार' कशाला म्हणायचं हा अर्थात एक सनातन प्रश्न आहे. दर्जेदार शब्दाची नेमकी व्याख्या कुणीही, कधीही करू शकणार नाही. पण ज्याला मी 'दर्जेदार' मानतो असं साहित्य आम्हाला पुढेपुढे मिळत नव्हतं. तसं साहित्य लिहिलंच कमी जात होतं. ते अजिबातच लिहिलं जात नव्हतं, असं मी म्हणणार नाही. पण ते इतकं कमी लिहिलं जात होतं की, ते इतर सगळ्या अंकांत वाटलं गेल्यावर आमच्या वाट्याला काय उरणार?

आर्थिक कारणंही नक्कीच होती. जहिराती मिळत नव्हत्या. त्यासाठी लाचारीनं वागावं लागत होतं. अनेकदा मला ते सहन व्हायचं नाही. 'आपण जहिरात मागायला जातो म्हणजे आपण याचक आहोत आणि जाहिरात देणारा हा दाता आहे' ही भूमिका शब्दांत व्यक्त झाली नाही, तरी त्यांच्या देहबोलीत मला जाणवायची. समोर आलेली ब्याद कशी टाळता येईल हा भाव त्यांच्या चेहऱ्यावर असायचा. व्यावसायिक रचना नसली, तर पैसे वसुलीकरता विक्रेत्यांकडे जाणं हे शेवटी मालकालाच करायला लागतं. त्यामुळे मला व्यक्तिशः मानहानीकारक वाटणाऱ्या अशा अनेक गोष्टी कराव्या लागत होत्या. या

सगळ्यातून अगदी गळून जायला होत असे. पुन्हा हे सारं कोणाला सांगायची काहीच सोय नव्हती. आमचं दुःख शेवटी आम्हालाच कळणार होतं. ‘जावे त्याच्या वंशा, तेव्हा कळे’ हे खरंच आहे.

विशेष महत्त्वाचं म्हणजे हल्ली उत्तम लेखक मिळत नाहीत. वाचक तरी पुरेसे कुठे आहेत? मी मासिक सुरू केलं, तेव्हा माझी मित्रमंडळी ही साधारण चाळीशीतली म्हणजे माझ्या वयातली होती. आता ती सगळीच म्हातारी होत होत साठीच्या पलीकडे गेली आहेत. आता मी कोणत्याही साहित्यिक कार्यक्रमाला जातो, तेव्हा बहुतेक मंडळी ‘धवलकेशी’ वर्गातली असल्याचं लगेचच लक्षात येतं. बहुसंख्य लोकांना टक्कल पडलेलं उघड दिसतं. साठी काय सत्तरीच्या पुढचीच मंडळी बहुसंख्य असतात. मी कुणा लेखकाच्या घरी भेटायला गेलो, तरी त्याच्या घरातली तरुण पिढी माझ्याशी बोलत नव्हती. ‘या काका, बसा’ एवढं बोलून ते आत निघून जात. मी कोणाचा पाहुणा होतो? खूपदा त्यांच्या वडिलांचा किंवा कधीकधी अगदी आजोबांचासुद्धा! तरुण वर्ग साहित्यात नसणं हे मला खूप खटकत आलेलं आहे.

लेखकांचा विचार करा. भालचंद्र नेमाडेंची ‘कोसला’ प्रकाशित झाली, तेव्हा त्यांचं वय किती होतं? फक्त 25. शिवाजी सावंतांची ‘मृत्युंजय’ प्रकाशित झाली, तेव्हा त्यांचं वय फक्त 27 वर्षं होतं आणि हे त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या तेव्हाचे आहे. त्यांनी त्या प्रत्यक्षात लिहिल्या, तेव्हा त्यांचं वय आणखी एक-दोन वर्षं कमी असेल. गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर यांचं वय त्यांनी त्यांचं सगळ्यात उत्तम साहित्य लिहिलं तेव्हा काय होतं? ‘माणदेशी माणसे’ लिहिलं तेव्हा माडगूळकर अवघे 21 वर्षांचे होते. हे सारं मी माझ्या पुस्तकातही मांडलं आहे. त्या वयाचा आजचा तरुण मराठी साहित्यापासून किती दूर गेलाय याचा विचार करायला हवा. लिहिणाऱ्या बहुतेक लेखकांचं वय हे आज साठीच्या पुढे आहे. माणसाच्या आयुष्यात तारुण्य हा असा घटक आहे की, ज्याची भरपाई कधीच होत नाही. तुम्ही आर्थिक भरपाई करू शकाल; पण तारुण्य कुठून आणणार? तारुण्यातच सर्जनशीलतेचं प्रकटीकरण सर्वाधिक असतं. आजच्या या वयाच्या मराठी तरुणाला साहित्याशी काहीच देणं-घेणं नाही. साहित्यात साचलेपण येण्याचं हे एक प्रमुख कारण आहे. दुर्दैवाने त्याचा कधीच, कुठेच उल्लेख केला जात नाही.

**प्रश्न** : ‘उत्तम दर्जाचं लेखन पुरेसं मिळत नाही’ हेही तुम्ही अंतर्नाद उताराला लागण्याचं एक कारण सांगितलंत. माझंही स्वतःचं तेच मत आहे. पण मराठीतला खूप मोठा वर्ग तुमच्या-माझ्या या मताशी सहमत नाही. त्यांचं म्हणणं असं आहे की, तुम्ही ते लेखन बघत नाही. आमची खेड्यापाड्यांतून, दुर्गम भागांतून, बहुजन समाजातून आलेली मंडळी उत्तम दर्जाचं लिहितायेत. ते तुम्हाला दर्जेदार वाटत नाही. तुम्ही तुमचे पांढरपेशी, उच्चभ्रू, मध्यमवर्गीय निकष लावता. हा वाद कायमचा राहणार. त्यावर चर्चा करण्यात अर्थ नाही. शेवटी, एका मर्यादेनंतर अभ्यास आणि अनुभव यापेक्षा दृष्टीकोन महत्त्वाचा असतो. तुम्हाला आणि मला ज्या दर्जाचा मजकूर हवा आहे, तो पुरेसा मिळत नाहीये असं आपलं एकमत असेल; तर तुम्हाला काय शक्यता दिसते? पुढच्या काळात अशीच घसरण होत राहणार? की काही मार्ग अवलंबले, तर पुढच्या काळात चांगला मजकूर मिळू शकेल असं तुम्हाला वाटतं?

– काही उपाय आपण करू शकू. उदाहरणार्थ, साहित्याला दिल्या जाणाऱ्या अत्यल्प मानधनाचा मुद्दा घ्या. मराठी संस्कृतीत सादरीकरणाला असलेलं महत्त्व दुर्दैवानं साहित्य लेखनाला नाहीये. मुंबईला आम्ही एक कविसंमेलन आयोजित केलं होतं. ते रात्री उशिरापर्यंत रंगलं. त्यानंतर मी रात्री शिवाजी पार्कला माझ्या एका मित्राकडे राहायला गेलो. संमेलनात आलेल्या अशोक नायगावकर, इंद्रजित भालेराव, कविता महाजन, दासू वैद्य, अरूण म्हात्रे वगैरे आमंत्रित कवींना ‘मी किती मानधन दिलं’ असं त्या मित्रानं मला रात्री गप्पा मारताना विचारलं. मी काय ‘हजार-बाराशे’ असा होता तो आकडा सांगून ‘ते नेहमी घेतात, त्यापेक्षा ते कमीच आहे’ असंही म्हटलं.

त्यावर तो मित्र म्हणाला, “मग तू माझ्यावर अन्याय करत नाहीस का?”

“का? अन्याय कसला?” – मी.

“मी कथा लिहिली, तर तू मला किती मानधन देतोस?” – मित्र.

“काहीतरी रुपये ८०० वगैरे.” – मी.

"मला कथा लिहायला आठ दिवस लागतात; त्याला कविता करायला फारतर दोन-तीन तास लागतात. मला त्या कथेचं मानधन फक्त एकदाच मिळतं. तो मात्र शंभर ठिकाणी याच कविता म्हणतो आणि त्याला प्रत्येक वेळी वेगळं मानधन मिळतं. पुन्हा ते प्रत्येक वेळी त्याला मिळणारं मानधनही मला फक्त एकदाच मिळणाऱ्या मानधनापेक्षा जास्त आहे. मग हा माझ्यावर अन्याय नाही का?"

असं तो मित्र म्हणाला. तसा सगळा संवाद हसतहसतच चालला होता, त्यात कटुता अशी काही नव्हती. पण त्याचा मुद्दा खराच होता.

आणि हे फक्त कथेच्या बाबतीत नव्हे, तर एकूणच साहित्याच्या बाबतीत खरं आहे. एखादा प्लंबर, सुतार, इलेक्ट्रिशियन मराठी लेखकांपेक्षा जास्त कमवत असेल! मराठी लेखकाला दिलं जाणारं मानधन खरोखरच खूप कमी आहे, हे वास्तव आहे. सादरीकरणाला नक्कीच जास्त भाव आहे. सिनेमा वगैरेची तर गोष्ट राहूच द्या; पण दुय्यम, तिय्यम दर्जाच्या सिरियलमधली नटीही बहुतेक मराठी लेखकांपेक्षा जास्त मोठेपणा, जास्त प्रसिद्धी आणि जास्त मानधन मिळवते. अनेकदा एखाद्या कार्यक्रमाला मला बोलावलं जातं, तेव्हा दिल्या जाणाऱ्या मानधनातून माझं रिक्षाभाडंही सुटत नाही आणि कधीकधी ते दिलंही जात नाही हे वास्तव आहे. भविष्याचा विचार करताना मराठी साहित्यिकाला मिळणारं मानधन हे आजच्यापेक्षा खूप जास्त हवं, असं मला वाटतं. ही अर्थातच एक गोष्ट झाली.

दुसरी गोष्ट म्हणजे, लेखकानंही लेखनपूर्व चिंतनाला पुरेसा वेळ द्यायला हवा. हल्ली अनेक लेखकांना प्रसिद्धीची घाई झालेली असते. पटपट लिहून, काही नाही तर व्हॉट्सअपवर पाठवून, त्यावर मिळालेल्या अंगठ्यांमध्ये समाधान मिळवणारा मोठा वर्ग आहे. आपण लिहितो ते खूप दर्जेदार आहे, असं त्यांना वाटतं. आपण त्याला दर्जेदार म्हटलं नाही, तर ते नाराज होतात. खरं तर लेखनालाही रियाज लागतो. गायक गातो त्या आधी दोन-तीन तास आणि खरं तर रोजच तो गायनाचा रियाज करत असतो. कुणीही लेखक बनू शकतं, हे अर्धसत्य आहे. त्यासाठी तुमची शब्दसंपत्ती अधिक हवी, वाचन, चिंतन हेही करायला हवं. हे सगळं लेखकांना पटल्यानंतर जेव्हा लेखन केलं जाईल, तेव्हा त्याचा दर्जा नक्कीच उंचावलेला असेल.

आज लोक वाचनाकडे केव्हा वळतील? जेव्हा त्यांना वाचनातून त्यांच्या खोलवरच्या आंतरिक गरजा भागवणारं काहीतरी मिळेल तेव्हा. एखाद्या माणसाला आज नुसती माहितीच घ्यायची असेल, तर त्यासाठी गुगलवर जाऊन थोडे शब्द फक्त टाईप केले, तरी त्याला ती माहिती मिळते. इंटरनेटवर इतरही शंभर गोष्टी त्याला मिळतात. करमणूकही आता कुठेही मिळते. पूर्वीप्रमाणे ज्ञान आणि करमणूक यांसाठी त्याला साहित्याची गरज उरलेली नाही. त्यासाठी इतर माध्यमं आता अगदी हातातल्या मोबाइलवर उपलब्ध आहेत. पण आंतरिक गरजा भागवणारं, जगण्याचं बळ देणारं असं काही त्या माणसाला साहित्यातून मिळालं, तर तो ते साहित्य नक्की वाचेल. तशा स्वरूपाच्या लेखनाला आजही खूप वाव आहे आणि भविष्यातही नक्की असेल.

**प्रश्न** : अन्य माध्यमं देऊ शकत नाहीत, ते दिलं तरच नियतकालिकं टिकतील. नाहीतर रडतखडत जगतील किंवा मरतील.

– मरतील वगैरे मी म्हणणार नाही. मी मासिक बंद केलं म्हणून बाकीच्यांनीही बंद करावं असं मुळीच नाही. पण दिवसेंदिवस परिस्थिती कठीण होत आहे. सरकार स्वतः मराठी शाळा बंद करत नाही. पालकांनाच आपली मुलं इंग्रजी शाळेत घालायची आहेत. इंग्रजीमध्ये वाचणारा, लिहिणारा, विचार करणारा माणूस स्वप्नही इंग्रजीतच पाहतो. त्याची अभिव्यक्ती मराठीत होण्याकरता गरजेची असणारी भाषिक पकड आणि सामर्थ्य त्या शिक्षणातून त्याला मिळत नाही.

**प्रश्न** : 'एका मासिकाचा उदयास्त' हे तुमचं पुस्तक नुकतंच प्रसिद्ध झालं आहे. 'मौज' या मराठीतल्या अतिशय प्रख्यात प्रकाशन संस्थेकडून ते येतंय. तुमची पूर्वीची काही पुस्तकंही मौजने काढली आहेत. या पुस्तकावर मी साधनात लेख किंवा संपादकीयही लिहीन. मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रातल्या, तसंच प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांच्या क्षेत्रातल्या सगळ्यांनी हे पुस्तक वाचावं असं मला वाटतं. ते का वाचावं याबद्दल मी माझ्या लेखात लिहीन. पण हे पुस्तक लोकांनी वाचावं असं तुम्हाला का वाटतं?

– एखादं नियतकालिक कसं सुरू होतं आणि कसं बंद होतं याबद्दल मराठीत आजवर कुठलं पुस्तक

लिहिलं गेल्याचं माझ्या तरी ऐकिवात नाही. अशा प्रकारची मांडणी करणारं हे मराठीतील बहुधा पहिलंच पुस्तक असावं. हे सर्वंकष आहे. त्यात व्यावहारिक आणि संपादकीय असे दोन्ही भाग आहेत. साधारण 1993 ते 2023 असा तीस वर्षांचा कालखंड त्यात आलेला आहे. अंतर्नादच्या खिडकीतून मला दिसलेलं साहित्यविश्वदेखील या पुस्तकात आहे. म्हणजे शासन आणि साहित्यिक संबंध, साहित्य संमेलनं, ग्रंथालयं, साहित्याचं अर्थकारण, भविष्यात साहित्यसृष्टी कशी असेल हे सारंही या पुस्तकात आहे. उगाचच काहीतरी खोटं किंवा अवास्तव लिहून भ्रामक चित्र वाचकांपुढे उभं करणं मी जाणीवपूर्वक टाळलं आहे.

अनेकदा या साहित्यव्यवहारातील व्यक्ती एखाद्या पुस्तकाचा किती उत्तम खप झाला, किती कोटी रुपयांची पुस्तकं विकली गेली, किती लोकांनी कार्यक्रमाला गर्दी केली, किती मोठ्या प्रमाणावर लोक कवितासंग्रह विकत घेत आहेत अशा स्वरूपाचे चित्र माध्यमांतून रंगवायचे. त्याचा प्रतिवाद करायचा मला काहीही अधिकार नाही. कुणाचा अनुभव तसा असेल, तर मला आनंदच आहे. पण माझा अनुभव कसा वेगळा होता, ते मी या पुस्तकात लिहिलं आहे आणि तेही वाचकांपर्यंत पोचायला हवं. शिवाय या पुस्तकात असणारी एकूण साहित्यविश्वाबद्दलची निरीक्षणं वाचकाला नक्कीच काहीतरी वेगळं देऊ शकतील, असं मला वाटतं. म्हणूनही वाचकांनी हे पुस्तक वाचावं. हे पुस्तक वाचकांना खिळवून ठेवेल असा विश्वास मला वाटतो.

**प्रश्न** : या मुलाखतीचा समारोप तुमच्याकडून व्हावा असं मला वाटतंय. मी तुम्हाला पहिल्यांदा भेटलो होतो ते 2001-02 च्या दरम्यान. तेव्हा ‘तुमची आवडती कविता कुठली’ असं मी विचारलं होतं. त्यावेळी तुम्ही मला ऐकवलेल्या त्या कवितेच्या चार ओळींनी आपण शेवट करावा असं मला वाटतं.

- अवश्य. मर्ढेकरांची ती कविता मला खूप आवडते. सुरुवातीच्या ओळीच पहिला शब्द बदलून शेवटी पुन्हा येतात...

तरीही येतो वास फुलांना,
तरीही माती लाल चमकते;
खुरट्या बुंध्यावरी चढून
तरीही बकरी पाला खाते.

अस्मानावर भगवा रंग (आदर्शवाद)
आणि नागवे समोर पोर; (वास्तव)
तरीही डुलक्या घेत मोजते
ह्या दोहोंतील अंतर ढोर. (प्रयत्नवाद)

या ओळी मला नेहमीच प्रेरित करणाऱ्या आहेत. साहित्यक्षेत्रातही उद्या हेच घडू शकेल, नवा बहर येऊ शकेल. वाचनाचं माध्यम कदाचित पुस्तकांऐवजी मोबाईल हे बनेल आणि त्या माध्यमातून साहित्य वाचकांपर्यंत संक्रमित होईल. पण जोवर आपल्या मनातलं इतरांपर्यंत पोचवावं असं माणसाला वाटत राहील, तोवर कुठल्या ना कुठल्या स्वरूपात साहित्याची निर्मिती ही होतच राहील, असा मला ठाम विश्वास वाटतो.

--

भानू काळे यांना वाचनाची, लेखनाची आणि संपादनाची आवड होती, छंद होता. त्यातून त्यांना आनंद मिळत होता हे खरंच आहे. पण सुरुवातीपासून नियतकालिक ही समाजाची गरज असते अशी त्यांची पक्की धारणा होती. ती मनाशी बाळगून त्यांनी पाव शतकाहून अधिक काळ अंतर्नादच्या माध्यमातून जे योगदान दिलं, ते विशेष महत्त्वाचं आहे. ‘एका मासिकाचा उदयास्त’ हे पुस्तक ज्यांना शक्य असेल त्यांनी अवश्य वाचावं. या मुलाखतीत आलेले अनेक मुद्दे त्या पुस्तकात अधिक स्पष्टपणे आलेले आहेत आणि या मुलाखतीत येऊ न शकलेल्या अनेक गोष्टीही त्या पुस्तकात आहेत.

**भानू काळे,** पुणे
bhanukale@gmail.com
Mob 9850810091

(ही दोन भागांतील व्हिडिओ मुलाखत weeklysadhana या युट्यूब चॅनलवर पाहता ऐकता येईल. पहिला भाग 1 तास 5 मिनिटे, तर दुसरा भाग 1 तास 25 मिनिटे.)


SkinSense
Skin & Laser Clinic
Using science to enhance
youth and delay ageing.
Dr. Abhijit Desai
Cosmetic Dermatologist
and Laser Specialist
Dr. Gauri Desai
MD, Laser Specialist
Medical
State of the Art
LASERS
Skin Toning
Face Lift & Skin Tightening
Reduction of Snoring
Permanent Hair Reduction
Acne Scar Reduction
Tattoo Removal
Pigmentation Treatment
Vaginal Tightening
Spot Fat Reduction and Body Sculpting
Pore Minimisation
Texturing
Tel no.:
02224331099 / +919920977940
Address:
2nd floor, Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg,
Prabhadevi, Mumbai – 400028
Email: dr.skinsense@gmail.com | Website: www.yourskinsense.com

Registered

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2026
एन.डी.नं.आर.एन.आय. १६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2024-2026
Posted at PUNE PSO GPO 411001 / Monday / Date of Posting : 25-3-2024 / Date of Publication : 25-3-2024

पृष्ठे २००
किंमत २५० रुपये
सवलतीत रु. २००/-
(ट.ख. वेगळा)




## मराठीतील एका 'माईलस्टोन' पुस्तकाची नवी आवृत्ती आता साधना प्रकाशनाकडून

ताराबाई शिंदे-लिखित

# स्त्रीपुरुषतुलना

(यथामूल संशोधित आवृती)

## संपादक : विलास खोले

**तिसऱ्या आवृत्तीचे निवेदन**

विलास खोले यांनी संपादित केलेले व प्रतिमा प्रकाशनाने प्रकाशित केलेले 'स्त्रीपुरुषतुलना'चे हे संपादन खऱ्या अर्थाने समग्र म्हणता येईल असे आहे, त्यामुळे मागील 25 वर्षे हेच पुस्तक सर्वाधिक अभ्यासकांच्या पसंतीला उतरले. मात्र मागील तीन-चार वर्षे प्रतिमा प्रकाशन बंद असल्यामुळे हे पुस्तक आऊट ऑफ प्रिंट होते. दरम्यान 2022 मध्ये विलास खोले यांचे निधन झाले. त्यानंतर आलेली ही आवृत्ती आहे.

'स्त्रीपुरुषतुलना' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद पूर्वीच झालेला असून, भारतातील व विदेशांतील विद्यापीठांमध्ये हे पुस्तक अभ्यासक्रमाला लावण्यात आले आहे. या छोट्या पुस्तकाच्या किंबहुना 52 पानांच्या एका निबंधाच्या बळावर रामचंद्र गुहा यांनी त्यांच्या 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' या इंग्रजी पुस्तकात 19 भारतीय व्यक्तींमध्ये ताराबाई शिंदे यांचा समावेश केला आहे. म्हणून विलास खोले यांनी संपादित केलेल्या या पुस्तकाचे मोल आणखी वाढते.

भारताच्या इतिहासात एकोणिसावे शतक महत्त्वाचे मानले जाते. का, तर ते सत्तांतराचे शतक आहे, नव्या जीवनजाणिवांच्या आरंभाचे शतक आहे, वैचारिक कलहाचे शतक आहे, आत्मपरीक्षणाचे शतक आहे, परंपरेचा आंधळेपणाने स्वीकार न करता परंपरेला आव्हान देणारे शतक आहे, मूलभूत प्रश्नांची जाग आणणारे शतक आहे, परंपरेला आक्रमकपणे सामोरे जाऊन नवा विचार मांडणाऱ्यांचे शतक आहे, नव्या शक्तीच्या उपासनेचे शतक आहे, एवंच, प्रबोधनाचे शतक आहे. 'तत्पूर्वीच्या एक हजार वर्षांत जे घडले नाही' ते ज्या शतकात घडले असे शतक आहे, मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने नवनवीन लेखने व लेखनप्रकार ज्या शतकात निर्माण झाले असे शतक आहे.

या शतकाने मराठी वाङ्मयाला जी अनमोल रत्ने दिली त्यांपैकी एक म्हणजे ताराबाई शिंदे (1850-1910) यांचे 'स्त्रीपुरुषतुलना' हे पुस्तक. या पुस्तकात स्त्रीपुरुषांमधील सारा असमतोल दूर करून स्त्रीजातीला पुरता न्याय मिळवून द्यावा अशी खटपट आहे. इतके आधुनिक क्रांतिदर्शी विचार इतक्या तर्कशुद्ध पद्धतीने एका स्त्रीने मांडलेले, मराठी गद्याने पहिल्यांदाच अनुभवले. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख (1823-1892) आणि महात्मा जोतीराव फुले (1827-1890) यांच्या लेखणीने ही करामत यापूर्वी केली असली, तरी एका स्त्रीने हे धैर्य दाखविल्याचा हा पहिलाच प्रसंग म्हणावा लागेल.

संपर्क **साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 / Mob. 7058286753
sadhana.prakashan@gmail.com

शेजारील QR कोड स्कॅन करून रक्कम ट्रान्सफर करून, साधना प्रकाशनाची पुस्तके मागवता येतील.
sadhanaprakashan.in या वेबसाईटला भेट द्या.

also available at amazon.in
इ-बुक स्वरूपात
kindle वर उपलब्ध